**रस्ते, पाणी अन् भुईकोट किल्ल्यासाठी आमदार अमोल पाटील यांचा 'मास्टर प्लॅन'**

वाचा पान ८ वर

जळगाव

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६

आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६ पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६

जळगाव, मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३१ । अंक : १८४। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

# ग्रामीण भागातही महायुतीच

## जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये दणदणीत विजय

## लोकसभा ते पंचायत समिती विजयाचे वर्तुळ पूर्ण

◆ **मुंबई ९ फेब्रुवारी**

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालांत ग्रामीण महाराष्ट्रातील सत्तासमीकरणात भाजप सरस ठरली असून १२ जिल्हा परिषदांमध्ये महायुतीची सत्ता स्थापन करण्यास जनतेने कौल दिला आहे. शहरी भागात भाजपसह महायुतीने मिळवलेले यश कायम राखत महाविकास आघाडीला शहरासह ग्रामीण महाराष्ट्रातून हद्दपार केले आहे. तसेच लोकसभा ते पंचायत समिती असे विजयाचे वर्तुळ महायुतीने पूर्ण केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. या निकालातून ग्रामीण भागांत महायुतीही भक्कम झाली असल्याचे स्पष्ट झाले. शहरी भागासह ग्रामीण भागातूनही महाविकास आघाडीला जनतेने धूळ चारली आहे.



जिल्हा परिषदेतील विजयानंतर कराड येथे जल्लोष करताना भाजपा कार्यकर्ते

**कोकणात शिंदे गटाची ताकद**

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत शिवसेना शिंदे गटाने सर्वाधिक जागा जिंकत कोकणातील आपला जनाधार अजूनही अबाधित असल्याचे दाखवून दिले. कोकणातील ही कामगिरी शिंदे गटासाठी महत्त्वाची मानली जात आहे.

**पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादीचा प्रभाव**

पश्चिम महाराष्ट्रात मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचा दबदबा कायम राहिला. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत दोन्ही राष्ट्रवादी गटांनी आपापली ताकद दाखवली. कोल्हापुरात हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीने आघाडी घेतली, तर काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांनीही एकाकी लढतीत आपली राजकीय ताकद सिद्ध केली. येथे सत्ता स्थापनेसाठी बहुमताची समीकरणे गुंतागुंतीची बनली आहेत.

**सोलापूरमध्ये पारंपरिक घराणेशाहीला धक्का**

सोलापूर जिल्हा परिषदेत ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि राम सातपुते यांच्या नेतृत्वाखालील गटाने मोहिते पाटील घराण्याचे दीर्घकाळचे वर्चस्व मोडीत काढले. या निकालाने जिल्ह्यातील पारंपरिक सत्ताकेंद्राला मोठा धक्का बसला आहे.

**पुण्यात राष्ट्रवादीचे पुनरुत्थान**

महानगरपालिका निवडणुकांतील पराभवानंतर अडचणीत सापडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला पुणे जिल्हा परिषदेत मोठे यश मिळाले. ४३ जागांवर आघाडी घेत राष्ट्रवादीने ग्रामीण भागात वर्चस्व असल्याचे सिद्ध केले. भाजपला येथे केवळ आठ जागांवर समाधान मानावे लागले, तर शिवसेना शिंदे गटाला अपेक्षित कामगिरी करता आली नाही.

**सांगलीत चुरशीची लढत**

सांगली जिल्ह्यात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात काट्याची टक्कर झाली. राष्ट्रवादी १९, भाजप १६, काँग्रेस ११ आणि इतर गटांनीही महत्त्वपूर्ण जागा मिळवत सत्ता स्थापनेची समीकरणे खुली ठेवली आहेत. येथे काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीची शक्यता वर्तवली जात आहे.

**लातूरमध्ये काँग्रेसचा वरचष्मा**

लातूर जिल्ह्यात काँग्रेसने सर्वाधिक २३ हून अधिक जागांवर आघाडी घेत ग्रामीण मतदारांचा कौल आपल्या बाजूने वळवला. महानगरपालिकेप्रमाणेच जिल्हा परिषदेतही काँग्रेसला पाठिंबा मिळाल्याने पक्षाला नवसंजीवनी मिळाली आहे.

### सात जिल्ह्यांत भाजपा अव्वल

**भाजपने सात जिल्हा परिषदांमध्ये सर्वाधिक जागा जिंकत आघाडी घेतली. विशेषतः मराठवाड्यातील परभणीत भाजपने २४ जागा मिळवत स्पष्ट वर्चस्व प्रस्थापित केले. येथे राष्ट्रवादी काँग्रेसला १५ जागांवर समाधान मानावे लागले, तर शिवसेनेचे दोन्ही गट आणि काँग्रेस पिछाडीवर गेले.**

### एकूण आकडेवारी (१२ जिल्हे)

| | |
|---|---|
| **एकूण जिल्हा परिषद :** | **१२** |
| **एकूण निवडणूक विभाग :** | **७३१** |
| **एकूण जागा :** | **७३१** |
| **एकूण उमेदवार :** | **२६९७** |
| **पक्षनिहाय एकूण विजयी जागा** | |
| भाजप : | २२५ |
| राष्ट्रवादी काँग्रेस : | १६५ |
| शिवसेना : | १६२ |
| काँग्रेस : | ५५ |
| शिवसेना (उद्धव गट) : | ४३ |
| राष्ट्रवादी काँग्रेस (शप) : | २६ |
| मनसे : | २ |
| अन्य : | ४१ |
| राज्याबाहेरील नोंदणीकृत पक्ष : | ७ |
| अप्रमाणित पक्ष : | १४ |
| अपक्ष : | २० |

# विकासावर जनतेचा विश्वास

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

◆ **मुंबई, ९ फेब्रुवारी**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समितीच्या निकालात भाजपा ६० ठिकाणी नंबर एकचा पक्ष ठरला आहे. छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सांगली, धाराशिव, परभणी आणि सातारा जिल्ह्यात भाजपाचे सर्वाधिकार उमेदवार निवडून आले. १२ जिल्हा परिषदांमध्ये महायुतीचीच सत्ता येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले, शिवसेना रत्नागिरी आणि रायगडमध्ये नंबर एकवर आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यामध्ये नंबर एकवर आहे. २०१७ साली १२ जिल्हा परिषदांमध्ये भाजपाकडे १४१ जागा होत्या, पण आत्तपर्यंत घोषित झालेल्या निकालांमध्येच २३६ जागा मिळाल्या आहेत. पंचायत समितीत २०१७ साली भाजपाकडे एकूण २८४ जागा होत्या, पण आत्तापर्यंतच्या यावेळी ४१० जागा मिळाल्या आहेत. जनतेने विकासाला प्राधान्य देत विरोधकांच्या नकारात्मक प्रचाराला नाकारले. महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा महायुतीवरच आपला विश्वास दाखवला आहे. १२ जिल्हा परिषदांमध्ये महायतीतीचीच सत्ता येईल, हे निकालातून स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान मोदी यांनी ग्राम विकासाचे हाती घेतलेले कार्य आणि राज्य सरकारने राबविलेल्या विविध योजनांवर जनतेने विश्वास दाखवला आहे. आज प्रत्येक जिल्ह्यामध्ये महायुतीतील पक्षांना प्रचंड समर्थन मिळत आहे, आणि त्याचाच हा परिणाम आहे.

निवडणूक प्रचारात महाविकास आघाडी फारशी कुठे दिसत नाही. त्यामुळे आम्हालाही फारसे काही करण्याची गरज नाही. त्यांचे प्रवक्ते रोज सकाळी ९ वाजता टिप्पण्या करतात, त्यातून त्यांची मते कमी करण्याचे काम होते. लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास उडाला आहे. मुळात विरोधकांमध्ये लढण्याची इच्छाशक्ती नाही.

**"महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेने सुशासन आणि विकासाला प्राधान्य देत जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीतून महायुतीला जनादेश दिला. राज्याच्या गौरवशाली संस्कृतीच्या भावनेनुसार काम करणारी युती हवी आहे हे निकालातून स्पष्ट झाले. या विजयाबद्दल मी जनता आणि भाजपा कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.**

**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

## विचारपुष्प



शरीरधारणेसाठी आवश्यकतेनुसार उपभोगपूर्ती स्वीकारूनही सहअस्तित्वावर आच येऊ नये म्हणून संवेदनशीलतेचा अंकुश प्रभावी राखण्यासाठी आपल्या ऋषिमुनींनी उपाय सुचविले आहेत. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' या श्लोकाची प्रेरणा संवेदनशीलतेच्या अंकुशाचेच प्रतीक आहे; परंतु या अंकुशाला जनमानसात सतत जागरूक आणि प्रभावी ठेवण्यासाठी अनुकूल वातावरणनिर्मिती अत्यंत आवश्यक आहे.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

## महत्त्वाचे

### निर्देशांक ८४ हजारांवर

**मुंबई :** आठवड्याच्या पहिल्याच दिवशी देशांतर्गत शेअर बाजारात चांगली खरेदी झाली. भारत-अमेरिका यांच्यातील ऐतिहासिक व्यापार कराराचे पडसाद दलाल स्ट्रीटवर उमटले. बँक आणि धातू क्षेत्रातील समभागांनी बाजाराला चांगली साथ दिली. त्यामुळे व्यवहारांती मुंबई बाजारातील निर्देशांक ४६३ अंकांनी वाढून ८४,०४४ वर पोहोचला तर निफ्टी १७३ अंकांनी वाढून २५,८६७ वर स्थिरावला. या तेजीमागील खरे योगदान स्टेट बँकेच्या शेअर्सचे होते. एसबीआयच्या शेअरमध्ये ७ टक्क्यांची वाढ दिसून आली. त्या खालोखाल टायटन आणि टाटा स्टील या कंपन्यांनीही चांगली कमाई केली. या तेजीतही पॉवरग्रीड, एनटीपीसी, आयटीसी, आयसीआयसीआय बँक आणि इन्फोसिस यांचे शेअर्स विक्रीच्या दबावाखाली राहिले.



### देशी पिस्तूलसह आरोपीला अटक

**वाशीम :** पंचशील नगरातील एका युवकाला देशी पिस्तूलसह पकडण्यात आले आहे. ही कारवाई सोमवारी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. याबाबत पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, पंचशील नगर येथील एक इसम देशी पिस्तूल घेवून फिरत आहे. त्यावरून पोलिस निरीक्षक प्रदीप परदेशी यांच्या मार्गदर्शनात एक पथक तयार करून रवाना करण्यात आले. शोध घेतला असता तो जागमाता परिसरात असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून पथकाने तत्काळ जागमाता परिसर गाठला. तेथे एक इसम महादेवाच्या मंदिराजवळ उभा दिसला. पोलिस आल्याची चाहूल लागताच तो पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला पकडून अंगझडती घेतली असता देशी पिस्तुल, २ जिवंत काडतूस मिळाले. पवन जोरेवार असे त्याचे नाव आहे.

# महाराष्ट्रात लवकरच मेगा भरती

## नव्या पद्धतीने भरणार ७० हजार जागा : मुख्यमंत्री फडणवीस

◆ **मुंबई, ९ फेब्रुवारी**

राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील पदांचा समावेश असणार आहे. भरती प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात बैठक झाली. राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांकडे सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबवाव्यात याव्यात. मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता याला प्राधान्य असेल. राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करणार

सामान्य प्रशासन विभाग हा केवळ औपचारिक नाही, तर शासनाच्या संपूर्ण भरती प्रणालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य शासनाच्या विविध विभागात ७० हजार पदे भरल्यानंतर विभागाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर देण्याच्या सूचना केल्या.

पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाईन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरता येईल. यासाठी प्रत्येक विभागाने ब्लॉकचेन पद्धतीबरोबरच डीजीलॉकर प्रणालीत प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. त्याचबरोबर युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणे गरजेचे आहे. येणाऱ्या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्मचे नवे मॉडेल उभे राहील. यात प्रत्येक विभागाची भूमिका महत्त्वाची आहे.



मुंबईतील विंग्स स्पोर्टस् सेंटर येथे ऑल स्टार्स टेनिस बॉल क्रिकेट लीग सीझन २ च्या उद्घाटन समारंभात बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे हास्यविनोद करताना

**केंद्र सरकारचा निर्णय**

**उत्तर-पूर्वेकडील राज्यांना जोडणार**

**चीन-बांगलादेशच्या हालचालींवर ठेवणार करडी नजर**



# 'चिकन्स नेक'जवळ भूमिगत रेल्वे कॉरिडॉर

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

उत्तर-पूर्वेकडील राज्यांच्या विकासाला चालना देणे आणि बांगलादेश, चीनच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी 'चिकन्स नेक'जवळ भूमिगत रेल्वे कॉरिडॉर उभारण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, 'चिकन्स नेक' परिसरात भूमिगत रेल्वे कॉरिडॉर उभारला जाणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित वाहतूक, अखंड दळणवळण आणि सैनिकी क्षमता मजबूत करण्यासाठी हा प्रकल्प भारतासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. नवीन आर्थिक वर्षात प्रकल्पासाठी निविदा जारी करण्यात येईल आणि त्यानंतर प्रत्यक्षात काम सुरू होणार आहे. हा प्रकल्प उत्तर-पूर्व रेल्वेकडून राबवण्यात येणार आहे. प्रस्तावित प्रकल्पाचा मार्ग टिन माइल हाट-रंगापानी-बागडोगरा असा असेल. याची एकूण लांबी ३५.८ किमी असेल. हा मार्ग प्रामुख्याने भूमिगत ठेवण्यात येणार असून, संवेदनशील सिलिगुडी कॉरिडॉरमध्ये अखंड व सुरक्षित दळणवळण सुनिश्चित करणे हा याचा उद्देश आहे. पूर्वोत्तर भारताच्या मुख्य भूमीशी जोडणारा हा भाग 'चिकन्स नेक' म्हणून ओळखला जातो आणि सिलिगुडी कॉरिडॉर हा रणनीतिकदृष्ट्या देशाचा महत्त्वाचा भाग आहे. चीनसह शेजारी देशांतील घडामोडी आणि सीमावर्ती संवेदनशीलतेच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने आता या परिसरात सुरक्षा आणि दळणवळण वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.



**प्रकल्प भारतासाठी महत्त्वाचा का?**

आंतरराष्ट्रीय सीमांच्या जवळून जाणाऱ्या या भूमिगत रेल्वे मार्गामुळे सुरक्षा अडचणी, नैसर्गिक आपत्ती किंवा गर्दीच्या काळातही दळणवळण अबाधित राहील. संरक्षण दलांचे कर्मचारी, लष्करी साहित्य आणि आपत्कालीन मदत सामग्री यांची हालचाल सुरक्षितपणे करता येणार आहे.

# आजपासून बारावीची परीक्षा

◆ **पुणे, ९ फेब्रुवारी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतली जाणारी बारावीची मुख्य परीक्षा मंगळवार १० फेब्रुवारीपासून राज्यभर सुरू होत आहे. या परीक्षेसाठी यंदा विक्रमी १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, प्रशासकीय स्तरावर परीक्षेची सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

राज्यभरात ३ हजार ३८७ परीक्षा केंद्रावर ही परीक्षा पार पडणार आहे. यातील ७ लाख ९९ हजार ७७३ विद्यार्थी हे विज्ञान शाखेचे असणार आहेत. तर ३ लाख ८० हजार ६९२ विद्यार्थी हे कला शाखेची परीक्षा देणार आहेत. तर ३ लाख २० हजार ५२ विद्यार्थी वाणिज्य शाखेची परीक्षा देणार आहेत.

**१० मिनिटांची वेळ आता शेवटी!**

परीक्षेच्या पारदर्शकतेसाठी बोर्डाने यंदा एक महत्त्वाचा बदल केला आहे. यापूर्वी विद्यार्थ्यांना ११ वाजता पेपर सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे आधी प्रश्नपत्रिका वाचायला दिली जात होती. मात्र, या काळात पेपरचे फोटो काढून ते सोशल मीडियावर व्हायरल होण्याचे धोके वाढले होते. यावर उपाय म्हणून बोर्डाने मोठा निर्णय घेतला आहे.

# अन् पंतप्रधान नरेंद्र मोदी झाले शिक्षक

## 'परीक्षे पे चर्चा' अंतर्गत साधला विद्यार्थ्यांशी संवाद

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

उद्यापासून महाराष्ट्रात बारावीच्या लेखी परीक्षेला प्रारंभ होत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'परीक्षे पे चर्चा' या अभिनव उपक्रमांतर्गत सोमवारी देशाच्या विविध भागातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. देशाचे कार्यकारी प्रमुख असलेले पंतप्रधान मोदी यांनी एखाद्या कसलेल्या शिक्षकाप्रमाणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'परीक्षे पे चर्चा' कार्यक्रमाचा हा दुसरा भाग आहे. पंतप्रधानांनी परीक्षेच्या काळातील ताणतणाव, अभ्यासाचं नियोजन आणि ज्ञान आत्मसात करण्याच्या खास तंत्रांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मोदींनी विद्यार्थ्यांना सांगितले



की, "वर्गातील सर्वात ढ मुलांशी मैत्री करा आणि त्याला गणित शिकवायला सांगा. शिकवताना स्वतःला मेंदूला ताण द्या. त्यामुळे विषय तोंडपाठ होईल आणि थेट परीक्षेत फायदा होईल." मोदींनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कार्यक्रम वेगळा आणि खास असल्याचंही सांगितलं. "मी अनेक वर्षांपासून १० वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत आलो आहे. ते मला विचारतात की "भविष्यात काय करायचं." मी त्यांना सांगतो की," स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करा, मित्रांबरोबर वेगवेगळ्या क्षेत्रातील कौशल्यांचा लाभ घ्या आणि स्टार्टअप्स सुरू करा."

पंतप्रधान मोदी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना खास टिप्स दिल्या. सुट्टीवर जात असाल तर विद्यार्थी म्हणून जा, जेणेकरून तुम्हाला काहीतरी शिकता येईल. आधी निर्भय व्हा, मग नेते बना. कारण, तुमचे गुण पाहून दुसऱ्यांनाही प्रेरणा मिळेल. तसेच स्वतःवर विश्वास ठेवल्याने मनातील कोणत्याही प्रकारची भीती पळून जाते, असे मोदी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले.

### विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांसाठी आणला टिफिन

विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांसाठी खास टिफिनही आणला होता. एका विद्यार्थ्याने त्यांना चकली दिली, तर दुसऱ्याने दिली खास छत्तीसगडी खुरमी. चकली कशी तयार होते, असा प्रश्न मोदींनी विद्यार्थ्यांकडे केला असता बेसनापासून गोल आकार देऊन तळल्याची माहिती त्यांनी दिली. पंतप्रधान मोदींनी या सर्व पदार्थांचा आस्वाद घेतला आणि विद्यार्थ्यांना हाताने खायला घालून संवाद अधिक सजीव केला.हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, त्यांनी मोदींच्या अभ्यास तंत्र आणि भविष्यातील मार्गदर्शनावर भर दिला.

**श्री क्षुधाशांती सेवा संस्था**
**नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६**
*शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था*
**सकाळी १० ते ९ (जेवण पार्सल उपलब्ध)**
**मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६**
**लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा उपलब्ध**
**वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रु.**
**वरण, बट्टी ३० रु.**
**सँडविच भाकरी २० रू. नग**
**पोळी भाजी १५ रु. प्लेट**
**मेथी पराठा व चटणी १० रू.**
**मसाला पुरी २० रु.**
**पार्सल मिळेल.**
**सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे**
**ऑर्डर- एम.एम.पाटील**
**मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.**
*केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम*
**सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.**

## थोडक्यात महत्त्वाचे....



**सावळदराबारा येथे भाजपतर्फे जल्लोष**

**सावळदबारा** : फर्दापूर जिल्हा परिषद गटाचे भाजपचे उमेदवार माहीन इद्रिस मुलतानी व सावळदबारा पंचायत समिती गणाचे उत्तम चव्हाण, फर्दापूर पंचायत समिती गणातून राहुल राठोड विजयी झाल्याबद्दल सावळदबारा येथील भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालयात आतषबाजी करीत जल्लोष करण्यात आला. या वेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, रामचंद चिमणकर, गजानन दाडगे, रमेश कपाटे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**सोयगाव : भाजप अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या कन्या माहीन इद्रिस मुलतानी यांचा सोयगाव तालुक्यातील फर्दापूर जिल्हा परिषद गटातून दणदणीत विजयी जल्लोष साजरा करताना पदाधिकारी व कार्यकर्ते.**



**सोयगाव : आमखेडा गटात पुष्पाताई प्रकाश काळे यांची जिल्हा परिषद सदस्यपदी निवडून आल्याबद्दल जल्लोष साजरा करताना भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते.**



### विश्वशांती गुरुमाऊली समूहातर्फे पारायणाचा संकल्प

**जळगाव** : विश्वशांती समूहाकडून गेल्या सहा वर्षांपासून महाराजांच्या २१ पारायणाचा वर्षेभरासाठी संकल्प केला जातो. जागतिक पारायणाच्या दिवशी २१ सा वे पारायण करून संकल्प पूर्ण करतो. आठव्या वर्षातील २१ पारायणाचा संकल्प दिनेश प्रमोद काळे यांच्याकडे धार्मिक ,आनंदी वातावरणात पार पडला. सगळ्यात पहिले ११ वेळा जप आवाहन आणि प्रार्थना म्हणून पहिला अध्याय एका सुरात वाचला आणि दिलेला अध्याय मनात वाचून २१ वा अध्याय परत एका सुरात वाचून महाराजांचे अष्टक, बावन्नी आणि पसायदान म्हणून, नैवेद्य करून आरती केली. यासाठी मानिनी तपकिरे, अनुराधा तोंडूलकर, सुचिता कुलकर्णी, आणि समस्त विश्वशांती गुरू माऊलींच्या सहकार्याने पार पडले.

## निधन वार्ता



### अनिता कुलकर्णी; आज अंत्ययात्रा

**जळगाव** : येथील श्रद्धा कॉलनी परिसरातील नंदनवननगरमधील पंचवटी महादेव मंदिराजवळील रहिवासी अनिता अरुणराव कुलकर्णी (वय ७६) यांचे सोमवारी (९ फेब्रुवारी) सायंकाळी साडेसातच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी (१० फेब्रुवारी) सकाळी दहाला राहत्या घरापासून नेरी नाका परिसरातील स्मशानभूमीकडे निघेल. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. एलआयसीचे विकास अधिकारी आनंद कुलकर्णी यांच्या त्या आई होत.



### अलका कुलकर्णी

**जळगाव** : येथील महाबळ कॉलनीतील श्रीनगर भागातील रहिवासी अलका अशोक कुलकर्णी (वय ७९) यांचे सोमवारी (९ फेब्रुवारी) सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. अशोक कुलकर्णी यांच्या पत्नी, तर मनोज कुलकर्णी यांच्या त्या आई होत.

# झेलम एक्स्प्रेसमधून दागिन्यांची बॅग लंपास

## गुन्हेगार जेरबंद; साथीदाराचा शोध सुरू

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

धावत्या रेल्वेतून प्रवाश्यांच्या बॅगा व किमती मुद्देमाल लंपास करणाऱ्या एका अट्टल गुन्हेगाराला एलसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले. त्याचा अन्य एक साथीदाराचा शोध घेतला जात आहे.

रविवारी ( ८ फेब्रुवारी) अयोध्या (उत्तरप्रदेश) येथील आनंद मोर्या हे झेलम एक्सप्रेसमधुन प्रवास करीत होते. जळगाव ते भुसावळ दरम्यान धावत्या रेल्वेतून अज्ञात इसमाने त्यांची बॅग चोरुन नेली होती. या बॅगेत एक लाख ६५ हजार रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने असा ऐवज होता. यासंदर्भात आनंद मोर्य यांनी इटारसी रेल्वे पोलिसात तक्रार शुन्य नंबरने दाखल केली. त्यानंतर या तक्रारीचा गुन्हा भुसावळ रेल्वे पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला होता.

ही चोरी जळगाव येथील रेकॉर्डवरील गुन्हेगाराने त्याच्या साथीदाराच्या मदतीने केला अशी खात्रीशीर माहिती एलसीबीचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी तत्काळ पथक नेमुन संशयितांचा शोध मोहिमेला सुरुवात केली. पथकाने समीर शेख फिरोज उर्फ गोल्डन (वय २१,रा. फातेमानगर, अल्फरा मशीदजवळ जळगाव) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. तसेच या गुन्ह्यात त्याचा साथीदार सोनु जयसिंग बागडे (रा. जाखनीनगर, कंजरवाडा) हादेखील सोबत होता,अशी माहिती पथकाला दिली. त्यानुसार त्याचा साथीदाराचा पोलिसांनी शोध सुरू केला आहे.



समीर शेख याला पुढील तपासकामी भुसावळ रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन केले.

पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी अपर पोलीस अधिक्षक अशोक नखाते यांच्या मार्गदर्शनात एलसीबीचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्याकडील पथकातील पोलीस उपनिरीक्षक शरद बागल, पोलीस अंमलदार अतुल वंजारी, अकरम शेख, विजय पाटील, नितीन बाविस्कर, किशोर पाटील, रवींद्र कापडणे यांनी ही कारवाई केली.



# बॉलबॅडमिंटन स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात भाग्यश्री सोनी, पूनम भोई यांची निवड

**मुक्ताईनगर** : मुक्ताईनगर तालुका एज्युकेशन सोसायटी मुक्ताईनगर संचलित श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय मुक्ताईनगर येथील दोन खेळाडू भाग्यश्री कृष्णा सोनी आणि पूनम बाळू भोई यांची चेन्नई, तामिळनाडू येथे होणाऱ्या अखिल भारतीय पातळीवरील आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव बॉल बॅडमिंटन महिला संघात निवड झाली.

या स्पर्धा ११ ते १५ फेब्रुवारी दरम्यान अण्णा विद्यापीठ चेन्नई, तामिळनाडू येथे होत असून यात सहभागी होण्यासाठी विद्यापीठाचा संघ ८ फेब्रुवारी रोजी रवाना झाला आहे . भाग्यश्री सोनी व पूनम भोई यांचा प्राचार्य प्रो. डॉ.एच.ए. महाजन, उपप्राचार्य डॉ. वंदना चौधरी यांनी पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजीव साळवे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. अतुल बढे, प्रा.आर आर. किनगे, क्रीडा संचालक डॉ. प्रतिभा ढाके उपस्थित होते.

भाग्यश्री व पूनम यांच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा ॲड. रोहिणी खडसे- खेवलकर, उपाध्यक्ष नारायण चौधरी, सचिव सी.एस.चौधरी, संचालक मंडळ, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, खेळाडू यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. माजी राष्ट्रीय खेळाडू पंकज खिरोडकर, राहुल बोदडे, कृष्णा साळुंखे व इतर खेळाडूंचे विशेष सहकार्य मिळाले.

# रावेर वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. धनराज पाटील

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, ९ फेब्रुवारी**

वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. धनराज पाटील, उपाध्यक्ष ॲड. तुषार चौधरी, सचिव ॲड. के.बी. खान, तर सहसचिव म्हणुन ॲड. जे. व्ही. दांडगे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.



वकील संघाचे मावळते अध्यक्ष ॲड सुरज चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली वकील संघाची बैठक पार पडली. यात सन २०२६-२७ करीता रावेर वकील संघाची नविन कार्यकारणी घोषीत करण्यात येवून अध्यक्ष ॲड. धनराज पाटील, उपाध्यक्ष ॲड. तुषार चौधरी, सचिव ॲड. के. बी. खान, सहसचिव ॲड. जे. व्ही. दांडगे यांची तसेच कार्यकारणी सदस्य जेष्ठ सदस्य ॲड. आर. एन. चौधरी, ॲड.व्ही.एम.गडे, ॲड. रमांकात महाजन, ॲड. अमोल आर. कोंघे, ॲड. मेघनाथ चौधरी, ॲड. दिपक एस. तायडे, ॲड. समशेरअली सैय्यद, ॲड. मोहन कोचुरे, ॲड. शिवदास कोचुरे, ॲड. सलीम तडवी, ॲड. शेख मुजाहिद, ॲड. नितीन आर. चौधरी, महिला सदस्य ॲड. विद्या सोनार व ॲड. सुवर्णा रावेरकर यांची कार्यकारणी सदस्य म्हणुन निवड करण्यात आली.

यावेळी वकील संघाचे जेष्ठ सदस्य ॲड. एस. एम. युसुफ, ॲड.एस. एस. सैय्यद, ॲड. प्रविण पाचपोहे, ॲड. व्ही. पी. महाजन, ॲड. एम.बी चौधरी, ॲड. योगेश गजरे, ॲड. सुभाष धुंदले, ॲड. डी. डी.ठाकुर, ॲड. विनोद कोंघे, ॲड. जगदीश महाजन, ॲड.एस. एस.जोशी, ॲड. बि. डी. निळे, ॲड. एस. बी. सांगळे, ॲड. किशोर पाटील, ॲड. दिपक गाढे, ॲड. उदय सोनार, ॲड. संदीप मेढे, ॲड. एल के शिंदे, ॲड. दिपक गाढे, ॲड. प्रविण पाटील, ॲड. निलेश महाजन, ॲड. प्रमोद पाटील, ॲड. आर. ए. पाटील, ॲड. राजकुमार लोखंडे, ॲड. राकेश पाटील, ॲड. सुभान शेख, ॲड. सलीम जामलकर, ॲड.स्वप्नील सोनार, ॲड. अमोल नाईक, ॲड. तुषार माळी, ॲड. जितेंद्र प्रजापती, ॲड. आनंद वाघोदे, ॲड. चेतन भालेराव, ॲड. दिपक निळे, ॲड.संदेश पाटील आदि उपस्थित होते.



# संत गजानन महाराज मंदिरात प्रकट दिनानिमित्त कार्यक्रम

## बांभोरी येथे भजनांसह कथा निरूपण, महाप्रसादवाटप

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

शहराजवळील बांभोरी येथे श्री संत गजानन महाराज मंदिरात संत गजानन महाराज प्रकट दिन उत्सव रविवारी उत्साहात साजरा करण्यात आला. ३ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या प्रकट दिनाच्या सोहळ्यात आठवडाभर विविध कार्यक्रम झाले.

दररोज पहाटे काकड आरतीपासून भजनांना आरंभ होत होता. हभप देवदत्त मोरदे महाराज यांनी कथा निरूपण केले. तसेच महिला भजनी मंडळाचे सुश्राव्य भजन आणि संत गजानन विजय ग्रंथाचे पारायण होऊन दुपारच्या सत्रात संत गजानन विजय चरित्र ग्रंथाचे निरूपण होत होते. यावेळी महापौर दीपमाला काळे, माजी नगराध्यक्ष बंडू काळे, नगरसेवक अमित काळे, नगरसेवक विशाल सुरेश भोळे, ॲड. गजेंद्र पाटील, नगरसेवक डॉ. चंद्रशेखर पाटील, चंद्रशेखर अत्तरदे आदी गजानन भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. या मंदिराचे संस्थापक अध्यक्ष हभप देवाचार्य अण्णा महाराज पाटील व पुष्पाबाई पाटील यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. प्रकट दिन उत्सवानिमित्त एक हजारावर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला, असे या मंदिराचे संस्थापक अध्यक्ष हभप देवाचार्य अण्णा महाराज पाटील यांनी सांगितले.

# आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी सुजल शुक्लाची निवड

## भुसावळ येथील दादासाहेब देविदास भोळे महाविद्यालयाची खेळाडू

**भुसावळ** : येथील दादासाहेब देविदास नाम देव भोळे महाविद्यालयाची खेळाडू सुजल शुक्ला तृतीय वर्ष बी. सी. ए. आंतर महाविद्यालयीन स्पर्धा व आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धा एस.एस.बी.टी अभियांत्रिकी महाविद्यालय बांभोरी जळगांव येथे पार पडली. या स्पर्धेत यशस्वी झाल्याने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ फुटबॉल संघात निवड झाली असून अवधेश प्रतापसिंग विद्यापीठ रीवा, मध्यप्रदेश येथे होत असलेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धासाठी निवड झाली आहे. सलग तीन वर्ष विद्यापीठ संघात निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ राजू फालक यांनी अभिनंदन केले. यावेळी प्रा. डॉ. संजय चौधरी, विद्यापीठ क्रीडा संचालक प्रा. डॉ. दिनेश पाटील, निवड समिती सदस्य प्रा अख्तर खान, प्रा. डॉ. विनय पवार, क्रीडा समिती सदस्य प्रा. डॉ. ए. आर. सावळे, प्रा .एस. डी. चौधरी, प्रा. डॉ. जे. बी. चव्हाण, प्रा .डॉ. आर. बी. ढाके, प्रा. डॉ. जी. पी. वाघुळदे, प्रा. दीपक जैस्वार, प्रकाश सावळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



# शासकीय महिला रुग्णालयातील बाळ-बाळंतिणीला ब्लँकेट वाटप

## पौर्णिमा वूमेन्स फाउंडेशनतर्फे रमाई जयंतीनिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

पौर्णिमा वूमेन्स फाउंडेशनतर्फे माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त मोहाडी येथील शासकीय महिला रुग्णालयातील बाळ-बाळंतिणींना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

पौर्णिमा वूमेन्स फाउंडेशन दरवर्षी त्यागमूर्ती माता रमाई जयंती महिलांसाठी सामाजिक कार्यक्रम घेत साजरी करीत असते. गतवर्षी फाउंडेशनतर्फे आदिवासी पाड्यावर महिलांना १०० साड्यांचे वाटप करण्यात आले होते. रांगोली प्रशिक्षणही देण्यात आले होते. यंदा माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पौर्णिमा वूमेन्स फाउंडेशनतर्फे मोहाडी येथील १०० खाटांच्या शासकीय महिला रुग्णालयात ब्लँकेट वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय अधीक्षक डॉ. किरण सोनवणे, स्त्रीरोगतज्ज्ञ गुरुप्रसाद वाघ, सहाय्यक अधिसेविका संगीता शिंगाडे, फाउंडेशनच्या अध्यक्षा शालिनी बिऱ्हाडे यांच्यासह सभासद भगिनी उपस्थित होत्या.

प्रसूती रुग्ण महिलांना ब्लँकेट, चहा- बिस्कीट देण्यात आले. ज्या रमाईंनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता दीन-दलितांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या बाबासाहेब आंबेडकरांना सहकार्य केले, त्यांच्या जयंतीनिमित्त महिलांसाठी अशा प्रकारचे समाजोपयोगी कार्यक्रम पौर्णिमा वूमेन्स फाउंडेशनतर्फे घेण्यौत येतात. महिलांसाठी स्कूटर प्रशिक्षणही घेण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पौर्णिमा वूमेन्स फाउंडेशनच्या भगिनींसह रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# सेंट्रल रेल्वे मजदूर संघाचे सोलापूरमध्ये अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ९ फेब्रुवारी**

सेंट्रल रेल्वे मजदूर संघाचे तीन दिवशीय ४० वे अधिवेशन सोलापूर येथे पार पडले. या अधिवेशनात रेल्वे कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

मुंबई येथील महाप्रबंधक कार्यालयात येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णकृती पुतळा बसवणे. नवीन पेंशन योजना रद्द करून जुनी पेंशन योजना, ८ वा वेतन आयोग लागू करणे आदी २९ ठराव मंजूर करून नेशनल फेडरेशन ऑफ रेलवेमन, नवी दिल्ली कडे पाठविण्यात आले. यावेळी मध्य रेल्वे विभागातून रेल्वे कर्मचारी उपस्थित होते.

सेंट्रल रेल्वे मजदूर संघाची नवीन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी डॉ.प्रविण बाजपेयी तसेच भुसावळ डिव्हिजनमध्येही इरफान, एस. बी. पाटील, किशोर कोलते यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. यात भुसावळ विभाग कार्यकारिणीत डिव्हिजनल चेअरमन शेख मोहम्मद इरफान, सेक्रेटरी एस. बी. पाटील, हेडक्वार्टर सेक्रेटरी ए. के. तिवारी, सेक्रेटरी (वर्कशॉप) किशोर कोलते, डिव्हिजनल समन्वयक दीपक शर्मा, हेड कार्टर सहा. महामंत्री धीरेन्द्र पटसारिया, संगठक गणेश सिंह, डिव्हिजनल अध्यक्ष अलका चौधरी, वर्किंग कमिटी सदस् सुंदरम झा, हरीश तिवारी, प्रमोद महाशब्दे, पुष्पेंद्र कापडे, दीपक अढाएंगे, उमाकांत बाउस्कर, एच.ए.सरोदे, राजेंद्र वर्मा, आर.डी.नांदुरकर, सिद्धार्थ पवार, प्रशांत वानखेड़े यांचा समावेश आहे.

# बौद्ध संस्थांना अनुदानासाठी २० पर्यंत अर्जाबाबत आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या आणि संस्थेमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा अधिक बौद्ध समाजातील विश्वस्त किंवा सदस्य असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत २०२५-२६ साठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक बौद्ध संस्थांनी अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. अर्ज स्वीकारण्याची मुदत २० फेब्रुवारीपर्यंत असून, मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

दरम्यान, शासन निर्णय ७ ऑक्टोबर २०२४ अन्वये या योजनेंतर्गत पायाभूत सोयी-सुविधांसाठीची अनुदान मर्यादा रुपये २ लाखांवरून वाढवून रुपये १० लाख करण्यात आली आहे. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांची यादी अल्पसंख्याक विकास विभागाच्या www.maharastra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक संस्थांनी मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन उच्चस्तरीय निवड समिती सदस्य सचिव तथा जिल्हा नियोजन अधिकारी भरत सांळुके यांनी केले आहे.

**Change In Name**

I have changed my name from **PRATIBHA SACHIN RANSHEVRE** to **PRATIBHA VIJAY NAIK.**

घर असो वा शेत झेनिथ पाईप सेवेत...
भारतात प्रथम क्रमांकावर असलेले बिर्लाचे एक उत्पादन
झेनिथ
स्टील पाईप
जी.आय.पाईप
एम.एस.पाईप
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

जा.क्र./ACC-1/ १८ /२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव विभाग, जळगाव
दिनांक ०६/०२/२०२६

**चौकशी जाहिर नोटीस**

**नोंदणी अर्ज क्र.- ०६/२०२६**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक- **सतीमाता सेवा संस्था, कुन्हे बु// ता. अमळनेर जि. जळगांव**
**श्री. भरतसिंग त्र्यंबक पाटील,** ...**अर्जदार**
कुन्हे बु.।। ता. अमळनेर जि.जळगाव

सर्व संबंधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, जळगाव विभाग, जळगाव हे वर नमुद केलेल्या नोंदणी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम-१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

३. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे.
४. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सादर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत : (वर्णन) :-** रु.,५,५११/-
**ब) स्थावर मिळकत (वर्णन):-** काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिद्ध तारखेपासून **तीस** दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशारितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहा. धर्मदाय आयुक्त जळगांव यांचे शिक्क्यानिशी आज दि- ०६/०२/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक (न्याय शाखा),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**जळगांव विभाग, जळगाव.**

नमुना क्र.७५ जा.क्र./ACC/ ३४३ /२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव विभाग, जळगांव मायादेवी मंदिरासमोर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जवळ,
हतनुर वसाहत, महाबळ रोड, जळगांव
दि. २९/१/ २०२६

**चौकशी जाहिर नोटीस**

**चौकशी अर्ज क्र. ०६/२०२६**
**सार्वजनिक न्यासाचे नांव व- गावलोक महादेव देऊळ लासुरे, ता. पाचोरा. जि. जळगांव**
**सुदाम पतिंगराव देवरे** ...**अर्जदार**

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगांव विभाग जळगांव वर नमुद केलेल्या फेरफार अर्जा संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुदयांवर चौकशी करणार आहेत.

**अर्जदार यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये गावलोक महादेव देऊळ लासुरे, ता. पाचोरा. जि. जळगांव या नांवाने न्यास नोंदणी करण्यासाठी नोंदणी अर्ज दाखल केलेले आहे. स्थावर मालमत्ता- मौजे लासुरे, ता.पाचोरा, जि. जळगांव येथील अनुक्रमांक १, मालमत्ता क्र.१ एकुण क्षेत्रफळ ७०० चौरस फुट, जमीन ५२ बांधकाम १३८१ मध्ये दगड, चुना सिमेंट स्वरुपात महादेव देऊळ मंदिराचे बांधकाम झालेले आहे. तसेच उर्वरित मिळकत ही सभागृहासाठी मोकळी ठेवण्यात आलेली आहे. तरी त्यास चतुःसिमा पुर्वेस- पाण्याची टाकी, पश्चिम- मोकळी जागा, शनी मंदिर, उत्तर - बहुळा नदी, दक्षिण- रोड व रस्ता** तरी सदरच्या नोंदणी अर्जा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द तारखेपासुन तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त जळगांव यांचे शिक्क्या निशी आज दिनांक २९/०१/२०२६ रोजी दिली. **सही/-**

**(शक्तीकुमार आर पाटील)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**जळगांव विभाग, जळगांव**
शिक्का

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com



नवी दिल्लीतील डीटीए तमिळ शाळेला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर सुरक्षेचा उपाय म्हणून विद्यार्थ्यांना तातडीने वर्गाबाहेर काढण्यात आले

# बांगलादेशात हिंसाचार; पाच ठार

## बीएनपी-जमाती इस्लामीचे कार्यकर्ते भिडले, ६५ जखमी

◆ **ढाका, ९ फेब्रुवारी**

बांगलादेशात १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुरू असलेल्या प्रचारादरम्यान हिंसाचार उफाळला. पटुआखली जिल्ह्यात बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपी आणि जमात-ए-इस्लामीच्या कार्यकर्त्यांत झालेल्या वादानंतर रविवारी रात्री दोन गटात हिंसक संघर्ष झाला, यात पाच नागरिक ठार, तर ६५ पेक्षा अधिक जखमी आहे. या भागात सोमवारीदेखील वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आल्याने संचारबंदी लागू करण्यात आली.

पटुआखली जिल्ह्यात बीएनपी कार्यकर्त्यांनी जमात-ए-इस्लामीवर मतदारांना पैसे वाटल्याचा आरोप केला. पोलिसांनी हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांत हाणामारी झाली. घटनेची माहिती मिळताच बीएनपी कार्यकर्ते निषेध करण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. दरम्यान, जमात-ए-इस्लामीनेही आपल्या समर्थकांना बोलावले. दोन्ही बाजूंमध्ये हिंसक संघर्ष झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. हिंसाचाराचे पडसाद इतरही जिल्ह्यात पसरले असून, सोमवारी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी अनेक भागात तोडफोड आणि जाळपोळ केली. यामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. सध्या चार जिल्ह्यात तणावाची परिस्थिती असून संचारबंदी लागू करण्यात आली. हिंसाचाराच्या प्रकरणात दहा लोकांना अटक केली असून, इतरांचा शोध सुरू आहे.



### देशभरात अनेक ठिकाणी निदर्शने

निवडणुकांच्या घोषणेनंतर बांगलादेशात हिंसाचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. देशभरात अनेक ठिकाणी निदर्शने सुरू आहेत. काही ठिकाणी भारतविरोधी घोषणा दिल्या जात आहेत. गेल्या सहा आठवड्यांत, बांगलादेशात निवडणुकीशी संबंधित ५० पेक्षा अधिक हिंसाचाराच्या घटना झाल्या असून, यात २५ नागरिकांचा मृत्यू तर, दीडशेहून अधिक लोक जखमी झाले.

### हिंदूंच्या सुरक्षेचे आश्वासन

हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यासाठी मानवाधिकार आयोगाच्या अंतर्गत एक विशेष स्वतंत्र तपास कक्ष स्थापन करण्याचे आश्वासन बीएनपीने दिले आहे. या कक्षाला धार्मिक द्वेष, सांप्रदायिकता, अल्पसंख्याकांचा छळ आणि सर्व प्रकारच्या ओळख-आधारित भेदभाव, हिंसाचार आणि दडपशाही प्रभावीपणे रोखण्यासाठी स्वतंत्र चौकशी करण्याचे अधिकार असतील.

### बीएनपीचे पारडे जड

निवडणुकीत बीएनपीला जोरदार आघाडी मिळण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांनी वर्तवली आहे. देशातील ३०० जागांपैकी २९२ जागांवर हा पक्ष निवडणूक लढवत आहे. वृत्तसंस्थेशी बोलताना बीएनपीचे प्रमुख तारिक रहमान म्हणाले की, त्यांच्या पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या जागा जिंकण्याचा विश्वास आहे. दुसरीकडे जमात-ए-इस्लामी, ११ पक्षांच्या युतीचा भाग म्हणून ही निवडणूक लढवत आहे.

# संसदेसह राजधानीतील शाळांना बॉम्बची धमकी

**दिल्लीला खलिस्तान बनवण्याचा इशारा**

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

राजधानी दिल्लीतील नऊ शाळांना सोमवारी सकाळी बॉम्बने उडवण्याच्या धमकीचे ई-मेल मिळाले. ई-मेलमध्ये दावा करण्यात आला होता की १३ फेब्रुवारी रोजी दुपारी १.११ वाजता संसदेत स्फोट होईल आणि दिल्लीला खलिस्तान बनवले जाईल.

ई-मेलमध्ये दहशतवादी अफजल गुरु आणि पंजाबला खलिस्तान संबोधण्याचाही उल्लेख होता. धमकी मिळाल्यानंतर शाळांमध्ये सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

दिल्ली फायर सर्व्हिसनुसार, सकाळी वेगवेगळ्या भागांतील शाळांमधून आपत्कालीन कॉल आले. त्यानंतर अग्निशमन दलाचे बंब, बॉम्बशोधक पथक आणि श्वान पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले.

धमकीच्या ई-मेलमध्ये लिहिले होते, अफजल गुरुच्या स्मरणार्थ दिल्ली खलिस्तान बनेल. १:११ वाजता स्फोट होईल, १३ फेब्रुवारी रोजी १:११ वाजता संसदेत स्फोट होईल. ई-मेलचे स्थान आणि स्त्रोत शोधण्यासाठी सायबर पथके सक्रिय करण्यात आली. तसेच, राजधानीतील संवेदनशील भागांमध्ये सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. कोणत्याही शाळेतून कोणतीही संशयास्पद वस्तू जप्त करण्यात आलेली नाही.

# एपस्टीन फाईल्सने जगभरात खळबळ

**● दहा देशांमध्ये राजीनामे, ८० जणांची चौकशी ● अमेरिकेपासून युरोपपर्यंत परिणाम**

◆ **न्यूयॉर्क, ९ फेब्रुवारी**

अमेरिकेत लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीनशी संबंधित गुप्त कागदपत्रे समोर येताच जगभरात खळबळ उडाली आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाने ३० जानेवारी रोजी सुमारे ३० लाख पानांची कागदपत्रे जारी केली आहेत. त्यानंतर १० देशांमधील १५ हून अधिक मोठ्या अधिकाऱ्यांना पद सोडावे लागले आहे. ८० हून अधिक शक्तिशाली लोकांवर चौकशी सुरू आहे.

या फाईल्समध्ये नेते, राजदूत, अब्जाधीश आणि शाही कुटुंबांची नावे समाविष्ट आहेत. ईमेल, फ्लाईट लॉग आणि संपर्क नोंदींमध्ये ७०० ते १००० प्रभावशाली लोकांचा उल्लेख आहे. अनेक प्रकरणांमध्ये अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाचे आरोपही आहेत. कागदपत्रांमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन आणि हिलरी क्लिंटन यांसारखी उच्च-प्रोफाइल नावे वेगवेगळ्या संदर्भांमध्ये समोर आली आहेत.

**सर्वाधिक हादरले युरोप**

एपस्टीनच्या खुलास्यानंतर युरोपमध्ये सर्वाधिक खळबळ उडाली आहे. सुमारे १० देशांमध्ये राजीनाम्यांचे सत्र सुरू झाले आहे. सर्वाधिक ब्रिटनमध्ये ३ अधिकाऱ्यांना पद सोडावे लागले. माजी राजदूत पीटर मँडेलसन, सल्लागार ॲडम पेरी आणि पंतप्रधान कीर स्टार्मर यांचे चीफ ऑफ स्टाफ मॉर्गन मॅकस्वीनी यांनी राजीनामा दिला. नॉर्वेच्या राजदूत मोना जूल, अमेरिकेतील कामगार मंत्री ॲलेक्स एकोस्टा आणि एमआयटी लॅब प्रमुख जोइची इतो यांनी राजीनामा दिला.

### नायजेरियात भरधाव ट्रकचा अपघात; ३० ठार

**कानो :** नायजेरियाच्या उत्तर भागातील कानो राज्यात एका भीषण रस्ता अपघातात किमान ३० लोकांचा मृत्यू झाला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्रवाशांना घेऊन जाणारा ट्रक महामार्गावर वेगाने जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. या घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत आणि त्यांना कानोमधील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात क्वानार बार्डे शहराजवळील गेझावा स्थानिक सरकारी क्षेत्रात झाला.

# नरगिस यांना सात वर्षांची शिक्षा

**देशाविरुद्ध अपप्रचार केल्याचा आरोप**

◆ **तेहरान, ९ फेब्रुवारी**

इराणच्या रिव्होल्यूशनरी कोर्टाने नोबेल शांतता पुरस्कार विजेत्या आणि मानवाधिकार कार्यकर्त्या नरगिस मोहम्मदी यांना सात वर्षांपेक्षा जास्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. त्यांना राज्याविरुद्ध कट आणि प्रपोगंडा या प्रकरणांमध्ये दोषी ठरवण्यात आले आहे.

शिक्षेसोबत दोन वर्षांचा अंतर्गत हद्दपारी आणि प्रवास बंदीदेखील लादण्यात आली आहे. मोहम्मदी फेब्रुवारीपासून उपोषणावर आहेत. त्या २०२२ मध्ये महसा अमिनीच्या मृत्यूनंतर झालेल्या निदर्शनांच्या प्रमुख समर्थक राहिल्या आहेत.

यापूर्वी त्या १३ वर्षांची शिक्षा भोगत होत्या आणि आरोग्याच्या कारणांमुळे तात्पुरत्या सुटकेवर होत्या. मानवाधिकार संघटनांनी या शिक्षेचा निषेध केला आहे. हा निर्णय अशा वेळी आला आहे, जेव्हा इराण अमेरिकेशी अणुकार्यक्रमावर चर्चा करत आहे.

नरगिस मोहम्मदी यांची २०२३ मध्ये नोबेल शांतता पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या इराणमधील दुसऱ्या महिला आहेत. इराणमध्ये महिलांविरुद्ध होणारे अत्याचार आणि राजकीय कैद्यांशी होणारे गैरवर्तन याविरुद्ध लढा दिल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता. त्यांनी इराणमध्ये फाशीच्या शिक्षेविरुद्धही आवाज उठवला होता.

# पाकिस्तानने मित्र देशांना विकली भंगार हत्यारे

## अजरबैजान, युक्रेन आणि सौदीला गंडा

◆ **इस्लामाबाद, ९ फेब्रुवारी**

आर्थिक डबघाईला आलेला पाकिस्तान आता शस्त्रास्त्र विक्रीच्या नावाखाली जगाची फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे. पाकिस्तानकडूनदारूगोळा आणि शस्त्रे खरेदी करणाऱ्या देशांची चिंता आता कमालीची वाढली आहे. एका नवीन अहवालानुसार, पाकिस्तानने अजरबैजानला पुरवलेला दारूगोळा केवळ निकृष्ट दर्जाचाच नाही, तर अनेक दशके जुना आणि गंजलेला असल्याचे उघड झाले आहे. या खुलाशामुळे जागतिक स्तरावर पाकिस्तानच्या डिफेंस एक्सपोर्टची अब्रू वेशीवर टांगली गेली आहे.

आर्मेनियासोबतच्या तणावामुळे अजरबैजान आपला मित्र देश असलेल्या पाकिस्तानकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे खरेदी करतो. मात्र, पाकिस्तानने या मैत्रीचा फायदा घेत अजरबैजानला चक्क गंजलेले गोळे धाडले आहेत. पाकिस्तानकडून आलेल्या शस्त्रास्त्रांमध्ये गंज लागणे, प्रोपेलेंट लोडमध्ये कमतरता आणि चुकीची मापे यांसारख्या गंभीर त्रुटी आढळल्या आहेत.

**रेंजमध्येही मोठी फसवणूक**

केवळ गुणवत्ताच नाही, तर तांत्रिक क्षमतेबाबतही पाकिस्तानने अजरबैजानची दिशाभूल केली आहे. पाकिस्तानने तोफेच्या गोळ्यांची जी रेंज सांगितली होती, प्रत्यक्षात युद्धाच्या मैदानात ते गोळे केवळ ४० ते ६० टक्केच अंतर कापू शकले आहेत. म्हणजेच, शत्रूवर लांबून मारा करण्याचा अजरबैजानचा डाव पाकिस्तानच्या निकृष्ट शस्त्रांमुळे सपशेल फसला आहे.

### सौदीने आता भारताला दिले प्राधान्य

पाकिस्तानच्या या ठकबाजीचा बळी केवळ अजरबैजानच ठरलेला नाही. रशियाविरुद्धच्या युद्धात युक्रेनने पाकिस्तानकडून १५५ मिमीचे गोळे खरेदी केले होते. मात्र, हे गोळे तोफेच्या नळीतच वेळेआधी फुटल्याने युक्रेनच्या महागड्या तोफांचे नुकसान झाले. एकेकाळी शस्त्रास्त्रांसाठी पाकिस्तानवर अवलंबून असलेला सौदी अरब आता सावध झाला आहे. पाकिस्तानची फसवणूक लक्षात आल्यानंतर सौदीने आता भारताकडून दारूगोळा खरेदी करण्यास सुरुवात केली आहे.



नागा समुदायाच्या व्यक्तीला मारहाण झाल्याच्या घटनेनंतर मणिपूरमधील उखरूल जिल्ह्यातील लिटान गावात हिंसाचार उफाळून आला. समाजकंटकांनी जाळपोळ लुटालूट करीत अनेक घरांना आग लावली

# अयोध्या हल्ल्याचा कट रचणारा दहशतवादी फरिदाबाद तुरुंगात ठार

**काश्मिरी कैद्याकडून धारदार शस्त्राने हल्ला**

◆ **फरीदाबाद, ९ फेब्रुवारी**

फरीदाबादमध्ये एक मोठी घटना समोर आली आहे, जिथे जिल्हा कारागृहात बंद असलेल्या दहशतवादी आरोपी अब्दुल रहमानची हत्या करण्यात आली. अरुण चौधरी या काश्मिरी कैद्याने त्याच्या डोक्यावर धारदार वस्तूने अनेक वार केले. हल्ल्यानंतर लगेचच तुरुंग प्रशासन हादरले आणि जखमी अब्दुल रहमानला रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

मृत अब्दुल रहमान २० वर्षांचा होता आणि मूळचा उत्तरप्रदेशातील अयोध्या जिल्ह्यातील मिल्कीपूरचा रहिवासी होता. गुजरात आणि हरयाणा स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ) च्या संयुक्त कारवाईत त्याला २ मार्च २०२५ रोजी फरिदाबादमधील पाली गावाजवळ अटक करण्यात आली होती. अटकेच्या वेळी त्याच्याकडून दोन हातबॉम्ब जप्त करण्यात आले होते, जे नंतर सुरक्षा यंत्रणांनी यशस्वीरित्या निकामी केले.

### दोघेही होते एकाच कोठडीत

तुरुंग प्रशासनाने सांगितले की, आरोपी अरुण चौधरी आणि अब्दुल रहमान यांना एकाच कोठडीत ठेवण्यात आले होते. दोघांमधील वाद कसा सुरू झाला याचा तपास सध्या सुरू आहे. हल्ल्यात वापरलेल्या धारदार वस्तूच्या उत्पत्तीबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. फरीदाबाद पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदन तपासणीसाठी पाठवला आहे आणि आरोपी अरुण चौधरीची कठोर चौकशी केली जात आहे.

## चित्रपट वार्ता

### मराठमोळ्या 'बालभारती'चे गाणे प्रदर्शित



**मुंबई :** शाळेमध्ये आपण प्रत्येकाने बालभारती या पुस्तकातूनच शिक्षण घेतले आहे. बालभारती हे पुस्तक महाराष्ट्र बोर्डामध्ये मराठी विषयासाठी आहे. बालभारतीच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त प्रेक्षकांच्या भेटीला बालभारती गीत आले आहे. बालभारतीला यावर्षी एकूण ६० वर्षे पूर्ण झाले आहे, त्यानिमित्त हे खास गाणे तयार करण्यात आले आहे. गेल्या अनेक पिढ्या बालभारतीच्या माध्यमातून आपले शिक्षण घेत आहेत. प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये बालभारतीसोबत एक नाळ जोडली गेली आहे. आता त्याच बालभारतीचे एक गाणे नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले आहे. बालभारतीच्या गाण्याला लोकप्रिय गायिका वैशाली सामंतचा आवाज लाभला असून अवधूत गुप्तेने संगीत दिले आहे. तर दासू वैद्य यांनी या गाण्याला शब्द दिले आहेत. या गाण्याच्या माध्यमातून बालभारतीच्या पुस्तकासोबत प्रत्येकाच्या जोडलेल्या आठवणी आणि भावना या गाण्यातून सुंदरपणे उलगडण्यात आले आहेत.

### 'रणपती शिवराय'ची शिवजयंती योजना




**मुंबई :** आजकाल जाहिरातींचा आणि विविध योजनांचा जमाना आहे. अशीच एक आकर्षक योजना 'रणपती शिवराय स्वारी आग्रा' या चित्रपटाच्या टीमने आणली आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षकांचा समूह जितक्या मोठ्या संख्येने जाईल तितक्या जास्त संख्येने तिकीट दरात सवलत मिळेल. शिवजयंतीच्या निमित्ताने ही विशेष योजना आणली आहे. सध्या या चित्रपटाने थियेटरमध्ये बऱ्यापैकी गर्दी खेचण्यात यश मिळवले आहे. ६ फेब्रुवारीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात अभिजीत श्वेतचंद्रने शिवरायांची भूमिका साकारली आहे. ती प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. त्याच्या जोडीला मृणाल कुलकर्णी, समीर धर्माधिकारी, अजय पूरकर, दिग्पाल लांजेकर, स्मिता शेवाळे, पुनीत इस्सर, विराजस कुलकर्णी, योगेश सोमण, अक्षय वाघमारे, ऋषी सक्सेना हे दमदार कलाकारही चित्रपटात आहेत.

### पुन्हा शाहिदसोबत झळकणार रश्मिका

**मुंबई :** शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना आगामी चित्रपट 'कॉकटेल २'मुळे चर्चेत आहेत, ज्याचे चित्रीकरण नुकतेच पूर्ण झाले. कृती सेनन देखील या चित्रपटाचा भाग आहे. ताज्या माहितीनुसार, शाहिद आणि रश्मिका आणखी एका चित्रपटासाठी एकत्र येत आहेत. शीर्षक नसलेल्या आगामी चित्रपटासाठी दोघांशी चर्चा केली असता, त्यांनी लगेच होकार दिला. शाहिद आणि रश्मिका 'बधाई हो आणि 'मैदान चे दिग्दर्शक अमित रविंद्रनाथ शर्मा यांच्या पुढील चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. या रोमँटिक चित्रपटाचे चित्रीकरण याच वर्षी ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यापासून सुरू करतील. सध्या अभिनेता शाहिद आपल्या आगामी 'ओ रोमियो' चित्रपटाच्या प्रचारात व्यस्त आहे, जो १३ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होत आहे.




### बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

◆ **मुंबई, ९ फेब्रुवारी**

माजी आमदार बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील आरोपी आकाशदीप सिंगला सोमवारी मुंबई उच्च न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला. पंजाबचा रहिवासी आकाशदीप हा या प्रकरणात जामीन मिळालेला पहिला आरोपी आहे. न्यायालयीन सुनावणीदरम्यान आकाशदीपच्या वकिलांनी युक्तिवाद केला की एजन्सींकडे त्याच्याविरुद्ध कोणतेही ठोस पुरावे नाहीत. बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबईत गोळ्या घालून हत्या करण्यात आली.

न्यायाधीश नीला गोखले यांच्या खंडपीठाने स्पष्टपणे सांगितले की आरोपीला जामीन मंजूर केला जात आहे, परंतु त्याचा इतर आरोपींच्या जामीन अर्जांवर परिणाम होणार नाही.

# वर्षभरात ९९ टक्के नोकऱ्या गिळंकृत करणार एआय




◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. आज लोक एआय-संचालित उपकरणांच्या मदतीने सर्व प्रकारची कामे करत आहेत. तथापि, तो दिवस दूर नाही जेव्हा एआय, केवळ मदतनीस म्हणून आपल्याला मदत करण्याऐवजी, आपली जागा घेईल. तसेच एका वर्षात ९९ टक्के मानवी नोकऱ्या घेईल, असा इशारा प्रसिद्ध आर्टिफिशियल इंटेलिजेंस संशोधक डॉ. रोमन याम्पोल्स्की यांनी दिला आहे.

याम्पोल्स्की यांच्या मते, २०४५ पर्यंत समाज अशा तांत्रिक बिंदूवर पोहोचू शकतो जिथून परत येणार नाही. आर्टिफिशियल जनरल इंटेलिजेंस, ऑटोमेशन आणि इतर मुद्द्यांवर विस्तृतपणे बोलताना, डॉ. रोमन याम्पोल्स्की म्हणाले की येणारे बदल मागील औद्योगिक परिवर्तनांपेक्षा पूर्णपणे वेगळे असतील. संगणक शास्त्रज्ञ डॉ. याम्पोल्स्की हे मूळचे लॅटवियाचे आहेत आणि सध्या ते लुईव्हिल विद्यापीठात प्राध्यापक आहेत. त्यांनी एआय सुरक्षा आणि जोखीम यावर १०० हून अधिक शैक्षणिक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. त्यांनी अलिकडेच स्टीव्हन बार्टलेट यांनी आयोजित केलेल्या 'द डायरी ऑफ अ सीईओ' या विषयावर भाषण दिले.

### कोणतेही शारीरिक श्रम स्वयंचलित करणे शक्य

**डॉ. याम्पोल्स्की म्हणाले, पाच वर्षांत, कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम स्वयंचलित केले जाऊ शकतात. म्हणून, आपण अशा जगाकडे पाहत आहोत जिथे बेरोजगारी आपण यापूर्वी कधीही न पाहिलेल्या पातळीवर असेल. मी १० टक्के बेरोजगारीबद्दल बोलत नाही, तर ९९ टक्के बेरोजगारीबद्दल बोलत आहे.**

### हस्तकौशल्याचे उद्योग बचावणार

**मानवनिर्मित वस्तूंच्या प्रेमामुळे काही नोकऱ्या जाऊ शकतात. ज्यांना अजूनही हस्तनिर्मित वस्तू आवडतात त्यांच्यासाठी तुम्हाला एक छोटी बाजारपेठ मिळू शकते. दरम्यान, एआयचे निरीक्षण आणि नियमन करण्याशी संबंधित नोकऱ्या देखील राहतील. डॉ. याम्पोल्स्की म्हणाले की दीर्घकाळात एआयवर पूर्णपणे नियंत्रण ठेवणे अशक्य असू शकते, परंतु ते म्हणाले की मानवी देखरेखीमुळे बदलाची गती मंदावू शकते.**



## अग्रलेख...

# ‘प्रपोगंडा’ आणि ‘परसेप्शन’च्या पलीकडे

समाजाला संघटित करण्याचे काम वेळखाऊ आहे. ते झोकून देऊनच करावे लागते. हा फावल्या वेळेतील उद्योग नाही हे ज्याला कळले, त्याला संघकार्य समजले असा स्पष्ट संदेश संघकार्याशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या मनात व्रतस्थ भावनेतून रुजलेला असतो. संघकार्य आणि समाजसेवा यामधील अंतर या भावनेमुळे स्पष्ट होते. आजकाल समाजसेवा हा पूर्णवेळ व्यवसाय मानला जातो. त्यासाठी विशेष प्रशिक्षण घ्यावे लागते, पदव्या प्राप्त केल्या की समाजसेवक म्हणून ‘पात्रता’ प्राप्त होते, पण अशी समाजसेवा हा कदाचित उपजीविकेचा उद्योग असू शकतो. व्रतस्थ भावनेने समाजसेवा करावयाची असेल, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नावाच्या संघटनेच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा सखोल अभ्यास करावयास हवा. संघ ही समाजसेवा ‘शिकविणारी’ संस्था नसून सेवेचा संस्कार ‘घडविणारी’ संघटना आहे, याची खात्री पटल्यानंतर संघकार्याचे समाजजीवनातील महत्त्व स्पष्ट होते. संघाच्या शताब्दीनिमित्त मुंबईत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या ‘संघप्रवासाची १०० वर्षे- नवे क्षितिज’ या संवाद व्याख्यानमालेचे मुंबईतील तिसरे दोन दिवसांचे सत्र ज्यांनी अनुभवले, त्यांना संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीची, संघविचारांची आणि संघसंस्कारांची ओळख करून घेण्यास मोठी मदत झाली असेल. आपल्याला संघ समजला असे मानणाऱ्यांनाही संघ संपूर्ण समजलेला नसतो, अशा स्थितीत, संघाविषयी प्रामाणिकपणे काही जाणून घ्यायचे असेल, तर संघकार्यात सहभागी होऊनच अनुभव घ्यावा लागेल. गेल्या शंभर वर्षांत संघाने देशात काय केले, हे जाणून घेण्याची उत्सुकता आता समाजात वाढत असताना, सरसंघचालकांच्या संवादात्मक व्याख्यानमालेतून अनेकांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे नेमकी उलगडत गेली आहेत. संघ हा राजकीय पक्ष नाही, त्यामुळेच, ही संघटना कोण्या एका राजकीय पक्षाचे काम करण्यासाठी स्थापन झालेली नाही. बऱ्याचदा संघाविषयीचा हा गैरसमज हेतुत: पसरविला जातो. संघ म्हणजे नेमके काय आहे, हे जाणून घ्यायचे असेल, तर, संघ म्हणजे नेमके काय नाही, हे समजून घेणे आवश्यक आहे. सरसंघचालकांच्या या संवाद कार्यक्रमातून संघ म्हणजे नेमके काय नाही, याचीही उत्तरे मिळून गेल्याने, संघाविषयी वाद-प्रवाद पसरवून नाहक समाजात संभ्रम माजविण्याचे राजकीय डावपेचदेखील यापुढे फारसे प्रभावी ठरणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. देशात आजवर अनेक चांगली कामे झालीत. यापुढेही ती होत राहतील. ती सर्व कामे एकट्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने केली असे नाही. चांगली कामे करणाऱ्या अनेक व्यक्ती, संस्था, संघटनांनी या देशाला सत्कार्याचे संस्कार दिले आहेत. ही चांगली कामे अखंडपणे पुढे चालत राहावी आणि व्यवस्थितपणे पूर्ण व्हावीत यासाठी अन्य कोणाशीही स्पर्धा न करता, कोणाचाही विरोध न करता, देशासाठी काम करणाऱ्या संघटनेचे नेमके रूप, कार्य आणि उद्दिष्ट शतकपूर्तीच्या निमित्ताने समाजासमोर आले आहे. सरसंघचालकांची ही व्याख्यानमाला म्हणजे केवळ संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा आढावा नव्हता आणि संघकार्याची ओळख समाजाला करून देण्याचा प्रचारकी कार्यक्रमही नव्हता. भारताच्या अनेक शतकांच्या इतिहासाची, सामाजिकतेची, संस्कृतीची आणि परंपरेच्या वारशाची ओळख करून देताना, हाच वारसा सोबत घेऊन भारताच्या भविष्याच्या वाटचालीची दिशा ठरविणाऱ्या विचारांची देवाणघेवाण होती. नवी दिल्ली, बंगळुरू, कोलकाता या महानगरांपाठोपाठ सरसंघचालकांच्या उद्बोधन मालिकेचे अखेरचे सत्र मुंबईत पार पडले आणि संघाच्या वाटचालीसोबतच, देशाच्या भविष्याविषयीची संघदृष्टीदेखील स्पष्ट झाली आहे. संघाच्या प्रेरणेतून सुरू असलेल्या एक लाख ३० हजारांहून अधिक सेवाकार्यातून संघाने ही वाटचाल नि:संदिग्धपणे आचरणातही आणली आहे, हेदेखील या संवादातून स्पष्ट झाले आहे. जे जे देशहिताचे, देशासाठी चांगले, ते काम करत राहणे हा सरसंघचालकांच्या शब्दांतील संघविचार मोजक्या शब्दांतील असला, तरी त्यातील नेमकेपणा मात्र, शंभर वर्षांच्या वाटचालीची आणि भविष्यातील निर्धाराची व्यापक ओळख करून देतो. दोन दिवसांच्या या सत्रामध्ये श्रोता या नात्याने सहभागी झालेल्यांना संघकार्याची गरज नेमकी स्पष्ट व्हावी, यासाठी सरसंघचालकांचे हे उद्बोधन महत्त्वाचे ठरले आहे.

हा देश ज्ञान, विज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीवर असेल, आर्थिकदृष्ट्या संपन्न असेल आणि कोणत्याही परकीय आक्रमणास समर्थपणे परतवून लावण्याच्या शक्तिसंपन्नतेने अजिंक्य ठरेल, ही संघाची धारणा आहे. असा देश घडविणे हे संघकार्य आहे, ही संघाच्या कार्यकर्त्यास मिळणारी शिकवण आहे. भारत हा केवळ भौगोलिक सीमांनी जखडलेला एक भूभाग नाही, तर या देशाला संस्कृतीचा वारसा आहे, इथल्या जनजीवनाला विचारांची बैठक आहे आणि इथल्या जीवनशैलीचे एक वेगळेपण आहे. संस्कृती, समाजगट, उपासनापद्धती आणि भाषा, यामध्ये प्रांतशः भेद असूनही ही जीवनशैली एकात्म आहे. ही एकात्मता म्हणजे भारताचे राष्ट्रजीवन आहे आणि ते समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रतिबिंबित होईल असा समाज निर्माण करणे हे संघाचे ध्येय आहे. कारण, कोणत्याही राष्ट्राचे श्रेष्ठत्व, तेथील समाज किती सुसंस्कृत, शक्तिशाली आणि वैचारिकदृष्ट्या संपन्न आहे, यावर निर्भर होत असते. अशा समाजनिर्मितीचे काम संघाने हाती घेतले आहे. केवळ राजसत्तेच्या माध्यमातून हे काम साधता येत नाही, ही संघाची भावना असल्यामुळेच संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांनी राजकारणापासून अलिप्त राहून संघकार्यासाठी स्वत:स समर्पित केले होते. जागरूक, संघटित लोकशक्तीचा राजसत्तेवर अंकुश राहावा आणि नैतिकतेच्या आधारावर उभ्या असलेल्या राजसत्तेकडून नैतिक भावाने देश चालविला जावा, असे संघ मानतो. देश चालविण्याकरिता ज्या काही वेगवेगळ्या व्यवस्था आवश्यक असतात, त्यापैकी राजसत्ता ही एक आवश्यक व्यवस्था असल्यामुळे, समाजजीवनात नैतिकतेच्या बळावर चालविल्या जाणाऱ्या व्यवस्था उभ्या करण्याच्या कामाप्रमाणेच, राजसत्तेत सहभागी होऊन संघाच्या स्वयंसेवकांनी ही व्यवस्था राबवावी असे संघाने ठरविले, पण भारतीय जनता पक्ष नावाचा राजकीय पक्ष म्हणजे संघ नव्हे आणि तो पक्षदेखील संघाचा नव्हे. या पक्षामध्ये संघाचे अनेक स्वयंसेवक आहेत आणि संघसंस्कार ही त्यांच्या राजकारणाची दिशा आहे. संघ आणि भाजप यांच्या नात्याचे हे नि:संदग्ध नेमकेपण सरसंघचालकांनी स्पष्ट केल्याने, संघाविषयी संभ्रम पसरविणाऱ्या राजकारणाची धार बोथट होणार यात शंका नाही. संघ आणि भाजप यांच्यातील नात्याबाबतची ही संघाची भूमिका नवी नाही. स्वयंसेवकांनी नैतिकतेच्या बळावर राजसत्तेत सहभागी होऊन देश चालवावा ही संघाची भूमिकादेखील नवी नाही. तरीही, आजदेखील संघ म्हणजे काय नाही, हे माहीत नसलेल्यांकडूनही संघाविषयी संभ्रम माजविला जात असताना, ही भूमिका नव्याने अधोरेखित होणे गरजेचे होते. सरसंघचालकांच्या या उद्बोधनातून ती मांडली गेली आहे. सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, स्वबोध व स्वदेशी आणि नियम-कायद्याचे पालन ही समाजपरिवर्तनाची सहजसाध्य साधने आहेत, हा विचार समाजसेवेच्या पुस्तकी शिक्षणातून शिकविला जाणार नाही. सज्जनशक्तीला बळ देण्यासाठी आवश्यक असलेले हे संस्कार म्हणजेच ‘पंचपरिवर्तन’ आहे आणि केवळ भाषणे देऊन असे परिवर्तन होणार नाही. त्यासाठी घराघरांत जावे लागेल, आपल्या घरापासून सुरुवात करावी लागेल आणि त्यासाठी अधिकचा वेळ न देता, आपल्या जीवनशैलीचा भाग म्हणून त्याकडे पाहावे लागेल. भाषा, भूषा, भजन, भोजन, भ्रमण आणि भवन हे आपले स्वत:चे असले पाहिजे, हा आपल्या जीवनशैलीचा, आपल्या घरापासून सुरू झालेला संस्कार अमलात आणला की स्वबोध होऊन परिवर्तनाची सुरुवात होते. संघ काय करतो, याचे नेमके उत्तर देणाऱ्या या उद्बोधनातून समाजपरिवर्तनाचा सोपा मार्ग सहजपणे उलगडला आहे. जे काही करावे ते प्रामाणिकपणे, उत्कृष्टपणे आणि नि:स्वार्थबुद्धीने देशहितासाठी करावे आणि त्या कृतीचा प्रारंभ स्वत:पासून करावा हा संघसंस्कार घेऊन परतलेल्या श्रोत्यांना या उद्बोधनातून मिळालेली नवी दृष्टी परिवर्तनाच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरेल, यात शंका नाही.

## आंतरराष्ट्रीय

# बलुचिस्तानमधील धुमसती आग

**प्रा. जयसिंग यादव**

बलुचिस्तानात नुकत्याच झालेल्या हल्ल्यानंतर ४० तास चाललेल्या प्रत्युत्तर कारवाईत पाकिस्तानी सुरक्षा दलांनी दोनशे जणांना ठार मारले आहे. यामध्ये ३१ नागरिक, १७ सुरक्षा कर्मचारी आणि ‘बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए)’च्या १४५ लढवय्यांचा समावेश आहे. बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनी राजधानी क्वेटा येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, दहशतवादाविरुद्धच्या युद्धात हा पाकिस्तानचा आतापर्यंतचा सर्वाधिक बळींचा आकडा आहे. बलुची लोक ‘बीएलए’ लढाऊंना रसद पुरवत आहेत. व्हायरल व्हिडीओने पाकिस्तान सरकारचे दावे उघड केले. यापूर्वी क्वेटा, ग्वादर, मुस्तुंग आणि नोशकी अशा अनेक जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी बलूच हल्ले झाले होते. ‘बलूच लिबरेशन आर्मी’ (बीएलए) ने हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे सैन्य, पोलिस आणि दहशतवादविरोधी युनिट्सनी मोठ्या प्रमाणात ऑपरेशन सुरू केले. या हल्ल्यानंतर लगेच पाकिस्तानी सैन्याने कोणताही पुरावा न देता हे हल्ले भारत पुरस्कृत आहेत, असा आरोप केला होता. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी या दाव्याचा पुनरुच्चार केला आणि म्हटले की, हल्लेखोरांचे भारताशी संबंध आहेत. भारताने पाकिस्तानचे निराधार आरोप फेटाळून लावले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, हे दावे केवळ पाकिस्तानच्या अंतर्गत अपयशांवरून लक्ष विचलित करण्यासाठी करण्यात आले असून पाकिस्तानची ही जुनी युक्ती आहे. प्रत्येक हिंसक घटनेनंतर निराधार आरोप करण्याऐवजी, पाकिस्तानने या प्रदेशातील आपल्या लोकांच्या दीर्घकालीन मागण्यांकडे लक्ष केंद्रित करावे. पाकिस्तानची दडपशाही, क्रूरता आणि मानवी हक्कांचे उल्लंघन करण्याची परंपरा सर्वज्ञात आहे. ‘बीएलए’ने म्हटले आहे की, त्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांना लक्ष्य करून ‘ऑपरेशन हेरोफ’चा दुसरा टप्पा सुरू केला आहे. लष्कराने दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये ४१ बंडखोरांना ठार मारल्याचा दावा केल्यानंतर एका दिवसात ही घोषणा करण्यात आली. त्यांच्या सैनिकांनी नोश्की येथील ‘काऊंटर टेररिझम डिपार्टमेंट’ (सीटीडी) मुख्यालय ताब्यात घेतले आणि ‘फ्रंटियर कॉर्प्स युनिट’ उद्ध्वस्त केले. त्यात अनेक पाकिस्तानी सैनिकांचा मृत्यू झाला.

१९४७ मध्ये मोहम्मद अली जिना यांनी मीर अहमद खान यांच्यासह बलुचिस्तानला स्वतंत्र देश म्हणून स्थापित करण्यासाठी प्रयत्नांचे नेतृत्व केले. १२ ऑगस्ट १९४७ रोजी बलुचिस्तानला स्वतंत्र म्हणून घोषित केले; परंतु सुरक्षा पाकिस्तानकडे सोपवण्यात आली. मार्च १९४८ मध्ये पाकिस्तानने बलुचिस्तानला आपल्यात विलीन केले. त्यामुळे तेथील लोक संतप्त झाले.



जिनांनी आपले जीवन भारताचे दोन भागांत विभाजन करण्यासाठी समर्पित केले. एकेकाळी महात्मा गांधी यांचे अनुयायी असलेले जिना १९०६ ते १९२० पर्यंत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. १९२० मध्ये काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनानंतर ते काँग्रेसपासून वेगळे झाले आणि मुस्लिम लीगशी त्यांनी पूर्णपणे जुळवून घेतले. येथेच जिना भारताचे दोन भागांत विभाजन करण्याच्या वेडेपणात अडकले. बलुचिस्तानदेखील याचा बळी पडला. दुसऱ्या महायुद्धानंतर, ब्रिटिश आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले. ते आता भारतावर राज्य करू शकत नाहीत, हे त्यांच्या लक्षात आले. संपूर्ण भारतात स्वातंत्र्यासाठी बंड सुरू झाले. त्यानंतर ब्रिटिशांनी भारत सोडण्याचा निर्णय घेतला. जिना मुस्लिमांसाठी वेगळ्या देशाच्या मागणीवर ठाम होते. त्याच वेळी, कलातमध्ये, नंतर बलुचिस्तानमध्येही वेगळ्या देशाच्या स्वातंत्र्याची मागणी तीव्र झाली. १९४६ मध्ये ब्रिटिशांनी भारत सोडत असल्याचा निर्णय घेतला तेव्हा कलातचे खान मीर अहमद खान यांनी जिना यांना ब्रिटिशांसमोर आपला खटला सादर करण्यासाठी सरकारी वकील म्हणून नियुक्त केले. त्यांना विश्वास होता की, मुस्लिम मातृभूमीची मागणी करणारे जिना ब्रिटिशांसमोर त्यांची मागणी चांगल्या प्रकारे मांडू शकतील. ४ ऑगस्ट १९४७ रोजी दिल्लीमध्ये बलुचिस्तान नावाचा एक नवीन देश स्थापन करण्यासाठी एक बैठक बोलावण्यात आली. मीर अहमद खानसह जिना आणि जवाहरलाल नेहरूदेखील या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत जिना यांनी कलातच्या स्वातंत्र्याची बाजू मांडली. ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनीही कलातला भारत किंवा पाकिस्तानचा भाग बनण्याची आवश्यकता नाही, हे मान्य केले. स्वतंत्र बलुचिस्तान तयार करण्यासाठी कलात, खारान, लास बेला आणि मकरन हे चार जिल्हे विलीन करण्याचा सल्ला जिना यांनी दिला होता. ११ ऑगस्ट १९४७ रोजी कलात आणि मुस्लिम लीग यांच्यात बलुचिस्तानला स्वतंत्र देश म्हणून स्थापित करण्याचा करार झाला. तथापि, एक अडचण अशी होती की, बलुचिस्तानची सुरक्षा पाकिस्तानकडे सोपवण्यात आली. शेवटी, १२ ऑगस्ट रोजी कलातच्या खानने बलुचिस्तानला स्वतंत्र देश घोषित केले.

‘बलूच नॅशनॅलिझम’ या आपल्या पुस्तकात खान मोहम्मद जिना आणि खान यांच्यातील भेटीचे वर्णन करतात. बैठकीत जिना यांनी खान यांना बलुचिस्तान पाकिस्तानात विलीन करण्याचा आग्रह केला. कलातच्या शासकाने नकार दिला. त्यांनी सांगितले की, बलुचिस्तान हा अनेक जमातींमध्ये विभागलेला देश आहे आणि तो एकटाच निर्णय घेऊ शकत नाही. बलुचिस्तान स्वतंत्र देश राहावा की पाकिस्तानात सामील व्हावा हे तेथील लोकांचे निर्णय असेल. वचन दिल्याप्रमाणे, खान बलुचिस्तानला गेले आणि त्यांनी विधानसभेची बैठक बोलावली. त्यात पाकिस्तानात विलीन होण्यास विरोध होता. पाकिस्तानकडून दबाव वाढू लागला. परिस्थिती समजून घेत खान यांनी ‘कमांडर-इन-चीफ’ ब्रिगेडियर जनरल परवेझ यांना सैन्याची जमवाजमव करण्याचे आणि शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा व्यवस्था करण्याचे आदेश दिले. जनरल परवेझ डिसेंबर १९४७ मध्ये शस्त्रे मिळविण्यासाठी लंडनला आले. ब्रिटिश सरकारने सांगितले की, पाकिस्तानच्या परवानगीशिवाय त्यांना कोणतीही लष्करी मदत मिळणार नाही. १८ मार्च १९४८ रोजी जिना यांनी खारान, लास बेला आणि मकरन वेगळे करण्याची घोषणा केली. दुष्का एच. सय्यद यांनी त्यांच्या ‘द ॲक्सेक्शन ऑफ कलात : मिथ ॲण्ड रिॲलिटी’ या पुस्तकात लिहिले आहे की, जिना यांच्या निर्णयाने कलातला सर्व बाजूंनी वेढले होते. जिना यांनी अनेक बलूच सरदारांना त्यांच्या बाजूने एकत्र केले. त्यामुळे खान यांना कोणताही मार्ग उरला नाही. त्यानंतर खान यांनी भारतीय अधिकाऱ्यांना आणि अफगाण शासकांना मदतीसाठी आवाहन केले; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. २७ मार्च १९४८ रोजी ‘ऑल इंडिया रेडिओ’ने परराष्ट्र विभागाचे सचिव व्ही. पी. मेनन यांनी उद्धृत केले, की कलातच्या खानने विलयासाठी भारताशी संपर्क साधला होता; परंतु भारत सरकारने ही विनंती नाकारली. तथापि, तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल आणि तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी नंतर हे विधान नाकारले. २६ मार्च रोजी पाकिस्तानी सैन्याने बलुचिस्तानात प्रवेश केला. खान यांच्याकडे जिना यांच्या अटी मान्य करण्याशिवाय पर्याय नव्हता; परंतु या ताब्यामुळे बलुचिस्तानच्या लोकसंख्येच्या मोठ्या वर्गात पाकिस्तानबद्दल द्वेष निर्माण झाला. बलुचिस्तान केवळ २२७ दिवस स्वतंत्र राहिला. खान यांचे भाऊ प्रिन्स करीम खान यांनी नंतर बलूच राष्ट्रवादींचा एक गट संघटित केला. त्यांनी १९४८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध पहिले बंड सुरू केले. पाकिस्तानने १९४८ चे बंड चिरडले. करीम खानसह अनेक लोकांना अटक करण्यात आली. बंड दडपले गेले असेल; पण ते कधीच संपले नाही. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी सुरू झालेल्या या बंडाला नवीन नेते मिळत राहिले. त्यांनी १९५०, १९६० आणि १९७० च्या दशकात पाकिस्तानी सरकारला आव्हान देणे सुरू ठेवले. २००० पर्यंत, पाकिस्तानविरुद्ध बलुचिस्तानची चार बंड झालीत. २००५ मध्ये, बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) ची स्थापना झाली आणि आजपर्यंत बलुचिस्तानचे लोक त्यांच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहेत.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# सुंदर स्वच्छ गाव, शहर आणि शाळा

गेल्या दशकात अनेक मूलभूत बदल घडताना दिसत आहेत. पायाभूत सुविधा, शिक्षण, तंत्रज्ञान, प्रशासन आणि सामाजिक जाणीव या सगळ्या पातळ्यांवर नव्या धोरणांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. २०१६ मध्ये सुरू झालेल्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी स्मार्ट सिटीज मिशनअंतर्गत १० वर्षांत देशातील ३१ शहरे पूर्णपणे ‘स्मार्ट’ झाली असून महाराष्ट्रातील पुणे आणि सोलापूर या दोन शहरांचा या यशस्वी यादीत समावेश आहे. स्मार्ट सिटी संकल्पनेपासून ते ‘मिशन निर्लेखन’सारख्या शिक्षणप्रधान मोहिमांपर्यंत तसेच ग्रामपंचायतींच्या आदर्श ठरावांपासून ते मोबाईल-टीव्हीपासून मुक्त सायंकाळ घडविण्याच्या निर्णयांपर्यंत हा सगळा प्रवास केवळ योजनांचा नसून मानसिकतेतील बदलाचाही आहे. बुलढाणा जिल्हा या बदलांचा साक्षीदार ठरत आहे. पुणे व सोलापूरसारख्या महाराष्ट्रातील शहरांचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश होणे ही बाब राज्यासाठी महत्त्वाची मानावी लागेल. सुरुवातीला केवळ महानगरांपुरती मर्यादित असलेली स्मार्ट सिटी संकल्पना आता मध्यम आणि लहान शहरांपर्यंत विस्तारताना दिसते.

स्मार्ट सिटी म्हणजे केवळ डिजिटल फलक, सीसीटीव्ही कॅमेरे किंवा ॲप्स नव्हेत तर नागरिकांना मूलभूत सुविधा, सुरक्षितता, पारदर्शक प्रशासन आणि पर्यावरणपूरक विकास यांचा समन्वय साधणारी जीवनपद्धती आहे. या पृष्ठभूमीवर स्मार्ट राज्य ही संकल्पना केवळ शहरांपुरती मर्यादित न राहता ग्रामीण व निमशहरी भागांपर्यंत पोहोचली तर त्याचा थेट लाभ बुलढाण्यासारख्या जिल्ह्यांनाही होऊ शकतो. जिल्ह्यात मोठे आयटी पार्क किंवा मेट्रो नसतील पण इथे जर शिक्षण व्यवस्था सक्षम झाली, ग्रामपंचायतींचा कारभार पारदर्शक झाला आणि समाजात संवाद वाढला तर हा जिल्हा स्वतःच्या पातळीवर स्मार्ट ठरू शकतो. स्मार्टनेस म्हणजे काचांच्या इमारती नव्हेत तर माणसाच्या विचारातील बदल आहे, ही जाणीव बुलढाण्यात हळूहळू रुजताना दिसते. बुलढाणा जिल्ह्यातील तब्बल १ हजार ४०० शाळांमध्ये मिशन निर्लेखन मोहीम राबवली जात आहे ही बाब आशादायक आहे. प्राथमिक शिक्षणात वाचन-लेखन-गणित या मूलभूत कौशल्यांवर भर देण्याचा हा प्रयत्न आहे. देशभरात साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी गुणवत्तेचा प्रश्न आजही ऐरणीवर आहे. अनेकदा विद्यार्थी शाळेत जातात परंतु वाचन किंवा साधे गणित नीट जमत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मिशन निर्लेखनमुळे शिक्षक प्रशिक्षण विद्यार्थ्यांचे स्तरनिहाय मूल्यमापन आणि पालकांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न होत आहे. ग्रामीण भागात ही मोहीम केवळ शैक्षणिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ ठरू शकते. ग्रामीण विकास विभागाच्या निर्देशांनुसार जिल्ह्यातील १,४०० शाळांमधून जीर्ण आणि असुरक्षित संरचना काढून टाकण्यासाठी एक व्यापक मिशन निर्लेखन मोहीम सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन जुन्या वर्गखोल्या, इमारती, शौचालये आणि पाण्याच्या टाक्या ३१ मार्च २०२६ पर्यंत काढून टाकण्याचे उद्दिष्ट आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था शालेय व्यवस्थापन समित्या आणि पालकांची भूमिका महत्त्वाची ठरते. सामाजिक शिस्तीचा प्रयोग करण्यासाठी सायंकाळी ठरावीक वेळेला मोबाईल व टीव्ही बंद ठेवण्याचा तसेच त्यासाठी दररोज सायरन वाजवण्याचा ठराव हा निर्णय अनेकांच्या भुवया उंचावणारा असला तरी विचार करायला भाग पाडणारा आहे. दररोज सायंकाळी ७ ते ८.३० या दीड तासाच्या कालावधीत कुटुंब वेळ पाळण्याचा ठराव राहुरी (जिल्हा अहमदनगर) नगरपरिषदेने एकमताने मंजूर केला आहे. आजच्या डिजिटल युगात स्क्रीनवर घालवला जाणारा वेळ प्रचंड वाढला आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळेच याच्या आहारी जात आहेत. या पृष्ठभूमीवर काही काळ का होईना कुटुंबाने एकत्र बसावे, संवाद साधावा, मुलांनी अभ्यास करावा किंवा मैदानी खेळ खेळावेत हा उद्देश नाकारता येणार नाही. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात असलेल्या टाकरखेड ग्रामपंचायतीने विधवांच्या उन्नतीसाठी पाऊल टाकले. विधवा प्रथामुक्त गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन मानस फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी. एस. लहाने यांनी केले. ग्रामपंचायत सरपंच लता डहाके व ग्रामसेविका एस. पी. माने यांनी पुढाकार घेत महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या तालुक्यातील वळती ग्रामपंचायतीने घेतलेला ‘आदर्श संवाद ठराव’ हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासातील उल्लेखनीय म्हणावा लागेल. ग्रामसभांमध्ये केवळ ठराव मंजूर करण्यापुरते मर्यादित न राहता ग्रामस्थांमध्ये संवाद चर्चा आणि मतभेद मोकळेपणाने मांडण्याची परंपरा रुजवण्याचा हा प्रयत्न आहे. लोकशाही केवळ मतदानापुरती नसून सततच्या संवादातून ती समृद्ध होते.

९८८१७१७८२८

## इतस्तत:

# अर्थसंकल्पातून रोजगार संधी...!

**दत्तात्रेय आंबुलकर**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी अर्थसंकल्पात नमूद केलेल्या महत्त्वपूर्ण तरतुदींमध्ये उद्योग-व्यवसायाच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्ससह सेमीकंडक्टर क्षेत्राला चालना देणे, निवड उद्योग क्षेत्राला उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहनपर राशी देणे, एमएसएमई क्षेत्राच्या वाढीसाठी दहा हजार कोटी रुपयांची केलेली विशेष तरतूद इ.चा प्रामुख्याने समावेश करता येईल. याशिवाय, क्षेत्रनिहाय आरोग्य क्षेत्र व उपचार - औषध निर्माणाद्वारे आरोग्यसेवा क्षेत्राला मोठे पाठबळ देण्यात आले असून, अर्थसंकल्पीय तरतुदींनुसार, नव्या व्यवसाय संधींसह रोजगारवाढीला निश्चितपणे चालना मिळणार आहे. याशिवाय, विविध व्यवसायांशी निगडित अशा मूलभूत सुविधा व बांधकाम, रस्तेबांधणी, वाहतूकसेवा, उत्पादन-विक्री याद्वारे नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

यासंदर्भात ‘क्वेस कॉर्प’चे मुख्य कार्यकारी अधिकारी लोहित भाटिया यांच्या मते, नव्या अर्थसंकल्पामध्ये एकूणच मूलभूत बांधकाम व सुविधा क्षेत्रात व्यापक व्यवसायवाढ करून, त्यासाठी आवश्यक अशा कौशल्य विकासाद्वारे विविध क्षेत्रांमध्ये रोजगारांची वाढ निश्चितपणे होणार आहे. त्यांच्या मते, नव्या व महत्त्वपूर्ण तरतुदींमध्ये संगणक-सेवा क्षेत्रांतर्गत डेटा सेंटर्स, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवे व्यवसाय, आरोग्यसेवांसह वृद्धांवरील उपचार, हायस्पीड कॉरिडॉर्स यासारखे मोठे व महत्त्वाकांक्षी प्रकल्प, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासह विदेशातील पर्यटन यासारख्या उद्योगांना मोठा वाव मिळणार आहे. यातूनच आपली व्यावसायिक अर्थव्यवस्था नजीकच्या भविष्यात कौशल्यांवर आधारित रोजगार देण्यासाठी अधिक सक्षम होण्याचा दावा लोहित भाटिया यांनी केला आहे. जागतिक स्तरांवर पाकिस्तानसह विविध देशांशी झालेल्या अथवा अद्याप सुरू असणाऱ्या युद्धांच्या पृष्ठभूमीवर आपल्या अर्थव्यवस्थेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात सावधपूर्ण भूमिका घेत यशस्वीपणे मात केली, असे मत ‘रॅनस्टॅड इंडिया’चे मुख्य आर्थिक सल्लागार नागेश बेस्कूर यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, नव्या अर्थसंकल्पातील नव्या आर्थिक तरतुदींचा फायदा बायोफार्मा, सेमीकंडक्टर्स, वस्त्रोद्योग व त्याची निर्यात, प्रगत जाहिरात क्षेत्र, याशिवाय नव्या क्षेत्रातील संशोधन क्षेत्राला होणार आहे.



नागेश बेस्कूर यांच्या मते, सरकारने नव्याने घोषित केलेल्या ‘बायोफार्मा शक्ती’ यांसारख्या प्रगत उद्योगांना पूरक अशा धोरणांमुळे मोठा लाभ मिळणार आहे. हीच बाब ‘सेमीकंडक्टर - मिशन २’ यासारख्या उद्योगांना प्रामुख्याने लागू असून, केंद्रीय स्तरावर नजीकच्या काळात आरोग्यसेवा क्षेत्राचा विस्तार, टेक्सटाईल पार्क, प्रगत तंत्रज्ञान विकास केंद्र इत्यादींना लागू असून, त्यांच्यानुसार ही सारी नवी व नव्याने विकास होणारी व्यवसाय क्षेत्रे नव्या कौशल्य विकासाच्या माध्यमातून वाढत्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणारी ठरणार आहेत. अर्थसंकल्पात स्पष्टपणे नमूद केल्यानुसार, उत्पादन क्षेत्राला नव्याने दिलेले पाठबळ, प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञानावर देण्यात आलेला भर, कौशल्य विकासवाढीच्या माध्यमातून उद्योगपूरक वातावरणाची निर्मिती इ.मुळे रोजगाराच्या नव्या संधींची भर पडणार आहे. या नव्या धोरणात्मक निर्णयांच्या परिणामी, उद्योगांसाठी गुंतवणुकीची भर व त्यातून रोजगारनिर्मिती या उभयतांना चालना मिळेल. या संदर्भात अधिक तपशिलात गेल्यास असे स्पष्ट होते की, अर्थसंकल्पीय तरतुदींचा थेट परिणाम ज्येष्ठांसाठी आरोग्यसेवा क्षेत्र, विविध प्रकारचे अद्ययावत मनोरंजन व्यवसाय व त्याशिवाय उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने वाढत्या प्रमाणावर आवश्यक ठरलेले डिझाईन क्षेत्रामध्ये मोठ्या संख्येने व विविध स्तरांवर रोजगार उपलब्ध होऊ शकतात. हे निवडक व्यवसाय इतर उद्योग-व्यवसायांच्या तुलनेत माफक आर्थिक गुंतवणुकीतून सुरू करता येतात. त्यामुळे नवागतांसह स्टार्टअप उद्योगांना आता मिळणाऱ्या प्रोत्साहनातून विविध स्तरांवर रोजगार निश्चितपणे उपलब्ध होऊ शकतात.

‘केपीएमजी’चे ज्येष्ठ विषयतज्ज्ञ नारायणन रामस्वामी यांनी स्पष्ट केल्यानुसार, नव्या व प्रगत तंत्रज्ञान आणि संगणकीय पद्धतींवर आधारित व्यवसायवाढीला आता चालना मिळणार आहे. त्यांच्या मते, या वयोगटात अव्वल क्षमतेसह नावीन्य व सुधारणांवर आधारित बौद्धिक क्षमता मोठी असते. त्याच वेळी त्यांच्या नव्या, छोटेखानी; पण महत्त्वाच्या अशा स्टार्टअप स्वरूपातील लघु; पण महत्त्वाच्या व्यवसायांची सुरुवात करण्यासाठी कमी आर्थिक गुंतवणुकीसह सुरुवात करता येते. त्यामुळे लवकरच अशा नावीन्यपूर्ण स्टार्टअप उद्योगांची संख्या वाढून रोजगारनिर्मिती नक्कीच होणार आहे.

नारायणन रामस्वामी यांच्यानुसार, या नव्या व बदलत्या औद्योगिक-व्यावसायिक बदलांमुळे भारत आणि भारतीयांच्या कौशल्यांद्वारे मिळणाऱ्या नव्या व मोठ्या रोजगार संधींचा लाभ भारतासह इतर विकसित आणि विकसनशील देशांना पण निश्चितपणे होणार आहे. याच्याच परिणामी, आता भारतीयांच्या कौशल्य-कामगिरीला जागतिक पातळीवर मान्यता मिळू लागली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. या मुद्द्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योग-व्यवस्थापनासाठी उच्च व्यवस्थापकीय पदांवर भारतीय व्यवस्थापक-विषयतज्ज्ञांची निवड करणाऱ्या प्रमुख कंपन्यांनी पण या मुद्द्याला दुजोरा दिला आहे. ‘टीमलीज’च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीती शर्मा यांच्यानुसार, प्रगत भारतातील विकसित कौशल्य-कामगिरीमुळेच भारताच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळाली, याची नेमकी दखल जागतिक पातळीवरील उद्योग-व्यवसायासह वित्तीय संस्थांनी घेतली असून, त्याचे पडसाद यापूर्वीच दिसायला लागले असून, त्याचे दूरगामी व सकारात्मक परिणाम निश्चितपणे दिसणार आहेत. दरम्यान, यावेळच्या अर्थसंकल्पात ‘एमएसएमई’ क्षेत्रासाठी दहा हजार कोटी रुपयांच्या विशेष तरतुदींसह मोठे आर्थिक पाठबळ दिले आहे. लघुउद्योगांमध्ये रोजगारनिर्मिती क्षमता असते, हे एक अनुभवसिद्ध सत्य आहे. त्यातही नव्या व बदलत्या व्यावसायिक स्थितीनुसार भारतीय लघुउद्योग क्षेत्राने, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राने जी मोठी मजल गाठली, त्याचा उपयोग आता नव्या अर्थसंकल्पामुळे रोजगारवाढीसाठी होऊ घातला आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### प्रेम की भ्रम? व्हॅलेंटाईन संस्कृतीमागील वास्तव

आज खरे प्रेम हे एका विशिष्ट दिवसापुरते मर्यादित न राहता संपूर्ण आयुष्यभर जपले जाणारे मूल्य असायला हवे. प्रेम म्हणजे केवळ आकर्षण, जवळीक किंवा शारीरिक ओढ नसून त्यामागे जबाबदारी, आदर आणि निष्ठा असणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीत प्रेमाला संयम, त्याग आणि कर्तव्याची जोड दिली गेली आहे. मात्र आजच्या घडीला या सगळ्या मूल्यांकडे दुर्लक्ष करून क्षणिक भावना आणि भावनात्मक आवेगालाच प्रेम समजले जात आहे, ही चिंतेची बाब आहे. युवक-युवतींनी समाजमाध्यमांवर दिसणाऱ्या चमकदार चित्रांमागील वास्तव ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येक नातं सोशल मीडियावर दाखवण्यासारखं किंवा प्रदर्शनासाठी नसतं. खरे नाते हे गुप्त, सुरक्षित आणि दोघांच्या सन्मानावर आधारलेले असते. त्यामुळे भावनांच्या भरात कोणताही निर्णय न घेता, विचारपूर्वक आणि सजगपणे वागणे हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे. हल्लीच्या तरुण वर्गासाठी फेब्रुवारी महिना विशेष महत्त्वाचा मानला जातो. हा महिना ‘प्रेमाचा महिना’ म्हणून ओळखला जातो. विशेष म्हणजे पाश्चात्त्य देशांनाही आश्चर्य वाटेल असा ‘प्रेमाचा सप्ताह’ भारतात ७ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारीदरम्यान मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. रोझ डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे आणि शेवटी व्हॅलेंटाईन डे असा हा संपूर्ण आठवडा साजरा केला जातो. प्रत्यक्षात, एवढ्या प्रमाणात हे दिवस विदेशातही साजरे केले जात नाहीत. यावरून भारतीय तरुणाईवर पाश्चात्त्य संस्कृतीचा किती खोलवर प्रभाव पडलेला आहे, हे स्पष्ट होते. मात्र प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे साजरे केलेले प्रेम खरोखर टिकते का? प्रेम म्हणजे जिथे आपुलकी, विश्वास आणि समजूतदारपणा असायला हवा, तिथे आज बाजारूपणाची अंध स्पर्धा सुरू आहे. प्रेम व्यक्त करण्यासाठी चॉकलेट, महागड्या भेटवस्तू आणि आकर्षक शुभेच्छापत्रांनाच अधिक महत्त्व दिले जात आहे. आजच्या तरुण पिढीला आपले ऐतिहासिक दिवस आठवण करून द्यावे लागतात, पण हे विदेशी ‘डे’ मात्र मोठ्या उत्साहाने आणि न चुकता साजरे केले जातात, ही खेदाची बाब आहे. १४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डेच्या पृष्ठभूमीवर प्रेमाच्या नावाखाली अनेक आक्षेपार्ह आणि बीभत्स प्रकार घडताना दिसत आहेत. ‘लव्ह जिहाद’सारख्या गंभीर आणि संवेदनशील घटना समाजात घडत असताना देखील या दिवसाचे अंधानुकरण थांबताना दिसत नाही. त्यामुळे व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा दिवस नसून अनेक अर्थांनी ‘काळा दिवस’ ठरत असल्याचे म्हणणे गैर ठरणार नाही. या दिवसांच्या निमित्ताने विदेशी कंपन्या मोठ्या प्रमाणावर आपला व्यवसाय वाढवत आहेत आणि भारतीय जनता मात्र भावनिक पातळीवर फसवली जात आहे. या फसवणुकीला बळी केवळ तरुणीच नाहीत, तर तरुणांनाही यामध्ये सावध राहण्याची गरज आहे. कारण या डेच्या आडून आमिष दाखवून लव्ह जिहाद, धर्मांतरण तसेच विविध प्रकारच्या फसवणुकीचे प्रकार वाढताना दिसत आहेत. म्हणूनच आता वेळ आली आहे की तरुणांनी स्वत: जागरूक राहून आपल्या मित्रमंडळींनाही जागरूक करावे. समाजात पसरत चाललेल्या या अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी सजगता आवश्यक आहे.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**

## वाचक पत्रे

### महाशिवरात्रीला शिवभक्ती करूया

माघ वद्य चतुर्दशी हा भगवान शिव देवतेचा ध्यानातून समाधीकडे जाण्याचा काळ असतो. या काळात शिव तत्त्व वातावरणातील हलाहल म्हणजे रज-तम स्वीकारत नाही. साहजिकच रज-तमाचे वातावरणातील प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढते आणि त्याचा त्रास मानवाला होऊ नये, यासाठी हिंदू धर्मात महाशिवरात्री हे व्रत सांगितले आहे. व्रतस्थ राहणे, पवित्र जलाने स्नान करणे, संकल्प सोडून उपवास व जागरण करणे आणि शिवपूजन करणे ही या व्रताची प्रमुख अंगे आहेत. या दिवशी शिवोपासना अधिकाधिक करावी ज्यामुळे आपल्याकडून शिवतत्त्व अधिक प्रमाणात ग्रहण होईल व रज-तमयुक्त वातावरणापासून आपले रक्षण होईल. शिवतत्त्व आकर्षित करणारी रांगोळी काढणे, ॐ नमः शिवाय हा नामजप सतत करणे, शिव मंदिरात जाऊन नंदी दर्शन, शृंगदर्शन, शिवपूजन करणे, शिवाला थंड जल, दूध किंवा पंचामृताने स्नान व अभिषेक करणे, पांढऱ्या अक्षता, पांढरी फुले, बिल्वदल, भस्म यासह शिवाचे पूजन करणे, केवडा किंवा चमेलीचे अत्तर अर्पण करून उदबत्तीने ओवाळणे, शिवपिंडीला सोमसूत्री प्रदक्षिणा घालणे या कृतींमुळे शिवतत्त्व अधिक आकर्षित होते. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि व्रत हा विज्ञानावर आधारित आणि ईश्वरप्राप्तीच्या दिशेने पुढे नेणारा आहे. पण तो साजरा करताना आपण अंतर्मुख असणे अपेक्षित आहे. उंची, रंगीबेरंगी वस्त्रे, चित्रविचित्र केशभूषा, प्रेक्षणीय दिसण्यासाठीच्या हालचाली व चेहऱ्यावरील रंगरंगोटी यामुळे स्वत:सह इतरांचीही वृत्ती बहिर्मुख होते. यापेक्षा शबरी, भक्त प्रल्हाद, ध्रुव बाळ यांचे चेहरे आठवून आपण त्यांच्यासारखी भक्ती एक दिवस तरी करूया.

**छाया मिराशी**

# टेनिसभक्तांचे चारधाम...

**टेनिसमधील ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धांना सुरुवात झाली असून, आता वर्षातील चारही स्पर्धा एकामागोमाग एक पार पाडतील. टेनिस हा श्रीमंताबरोबरच, 'जेंटलमॅनचा खेळ' म्हणून ओळखला जातो. मात्र, या खेळातही काही खोडकर खेळाडू असतात, त्यांच्या विक्षिप्त वागण्याचा त्रास क्रीडा जगताला होतो. या खेळातील स्पर्धा आणि खेळाडूंच्या कामगिरीचा घेतलेला आढावा...**

**क्रीडाविश्व**
**श्रीपाद पेंडसे**

आपण चारधाम ही पवित्र ठिकाणे मानतो आणि तेथे जाऊन आल्यावर आपण स्वतःला कृतकृत्य मानतो. तसाच काहीसा प्रकार लॉन टेनिसभक्तांचाही असतो. या टेनिसपटूंचं चारधाम म्हणजे, चार प्रतिष्ठित ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धा. ग्रॅण्ड स्लॅमच्या चार मोठ्या आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत, चौफेर विजय मिळवण्याचे आव्हान टेनिसपटूंना दिले जाते.

असे हे चारधाम : त्या ग्रॅण्ड स्लॅमच्या स्पर्धांमधली 'ऑस्ट्रेलियन ओपन' ही वर्षातील पहिली स्पर्धा, जानेवारीमध्ये निळ्या रंगाच्या हार्ड कोर्टवर खेळली जाते. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे दरवर्षी खेळवण्यात येणारी ऑस्ट्रेलियन ओपन ही स्पर्धा, या वर्षी दि. १२ जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी या कालावधीत झाली. मे-जून या कालावधीत पॅरिस, फ्रान्स येथे 'फ्रेंच ओपन' ही लाल मातीच्या मैदानावर खेळली जाणारी स्पर्धा, यावर्षी दि. १८ मे ते दि. ७ जूनदरम्यान होईल. आंतरराष्ट्रीय टेनिस

स्पर्धेतील सर्वांत लोकप्रिय असलेली विम्बल्डन स्पर्धा जून-जुलै या कालावधीत, लंडनमधील गवताच्या मैदानावर खेळवण्यात येते. ही विम्बल्डन स्पर्धा यावष दि. २९ जून ते दि. १२ जुलैदरम्यान होणार आहे. या स्पर्धांमधील 'यूएस ओपन' ही चौथी आणि शेवटची ग्रॅण्ड स्लॅम टेनिस स्पर्धा, न्यूयॉर्कमधील फ्लशिंग मिडोज येथील हार्ड कोर्टवर यावष दि. ३१ ऑगस्ट ते दि. १३ सप्टेंबरदरम्यान होईल. तर, अशा त्या ग्रॅण्ड स्लॅम टेनिस स्पर्धेतील, महिलांची ११४वी ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धा शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी झाली, तर पुरुषांची रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी झाली.

उन्हाळी टेनिस : मेलबर्न येथे 'ऑस्ट्रेलियन ओपन' स्पर्धेच्या काळात प्रचंड उन्हाळा असतो. त्यामुळे त्याचा त्रास टेनिसपटूंना सहन करावा लागतो. साधारणतः सकाळी ७-७.३०च्या सुमारास सामने सुरु होत असल्याने, पहिल्या काही सामन्यांत त्रास होत नाही. पण ऊन चढल्यावर मेलबर्नचं किमान तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत जातं. मैदानांवरील छप्पर उघडेच असल्याने, खेळाडूंना त्रास होतो. यानिक सिन्नरसारख्या दिग्गज टेनिसपटूच्या पायांचे स्नायू आखतात. प्रारंभीच्या सेटमधे उष्णतेमुळे त्याच्या शरीरातील बहुतेक ऊर्जा खर्च झाली होती. परिणामतः त्याच्यावर सामना गमावण्याची वेळ आली असती, पण त्याच्या विनंतीवरून खेळ थांबवून 'रॉड लेवर' मैदानात असलेले छप्पर मग लावण्यात आले. कोर्टवरील वातानुकुलन यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली. त्यानंतर मात्र सिन्नेरने नव्या जोमाने खेळ केला. पुढील सामने मात्र सावधगिरीने खेळवले गेले.

कार्लोस अल्काराझ ठरला 'ऑस्ट्रेलियन ओपन' विजेता : 'ऑस्ट्रेलियन ओपन'मधील अंतिम सामना, २५वा ग्रॅण्ड स्लॅम जिंकण्याच्या प्रयत्नांत असलेल्या, तसेच आपल्या कारकिदतील ११व्या ऑस्ट्रेलियन ओपन खेळणाऱ्या अनुभवी सर्बियन नोव्हाक जोकोविच आणि स्पेनच्या कार्लोस अल्काराझ यांच्यात झाला. त्यात अनुभवी जोकोविचचा पराभव करून, कार्लोस अल्काराझने ऑस्ट्रेलियन ओपन २०२६चे विजेतेपद पटकावले.

करिअर ग्रॅण्ड स्लॅम : या विजयासह अल्काराझने आपला सातवा ग्रॅण्ड स्लॅम किताब जिंकला आणि करिअर ग्रॅण्ड स्लॅम पूर्ण करणारा, इतिहासातील सर्वांत कमी वयाचा पुरुष खेळाडूही ठरला. २२ वर्षे, २७२ दिवस असे वय असणाऱ्या कार्लोस अल्काराझने, तब्बल ८८ वर्षांपूव २२ वर्षे, ३६३ दिवसांच्या वयाच्या डॉन बज याचा विक्रम मोडला. अल्काराझने यापूव यूएस ओपन-२०२२, विम्बल्डन-२०२३, २०२४, फ्रेंच ओपन-२०२४, २०२५, आताची ऑस्ट्रेलियन ओपन-२०२६ असे चारही ग्रॅण्ड स्लॅम जिंकून करिअर ग्रॅण्ड स्लॅम पूर्ण केली. कार्लोसपूव डॉन बज, रॉड लेवर, रॉय एमर्सन, आंद्रे अगासी, रॉजर फेडरर, राफेल नडाल आणि नोव्हाक जोकोविच यांनीही करिअर ग्रॅण्ड स्लॅम पूर्ण केली. एका खेळाडूने आपल्या कारकिदत चारही प्रमुख स्पर्धांचे विजेतेपद मिळवणे, म्हणजेच करिअर ग्रॅण्ड स्लॅम होय. एकाच वर्षात या चारही स्पर्धा जिंकल्यास, त्याला 'कॅलेंडर ग्रॅण्ड स्लॅम' म्हणतात. रॉजर फेडरर, राफेल नदाल, नोव्हाक जोकोविच, आणि आत्ताचा कार्लोस अल्काराझ, हे सारे टेनिसपटू करिअर ग्रॅण्ड स्लॅम विजेते आहेत.

अहंकारी/रागीट टेनिसपटू : जानेवारी २०२२ची 'ऑस्ट्रेलियन ओपन'ची एक घटना अनेकांना कदाचित आठवत असेल. 'कोविड'चे लसीकरण न करण्याचा हट्ट धरून बसलेल्या जोकोविचला, ऑस्ट्रेलियन न्यायालयाने हद्दपार करण्याच्या सरकारी आदेशाचे समर्थन केले होते. जोकोविचने हा निर्णय स्वीकारत, काही तासांनंतर मेलबर्नहून संयुक्त अरब अमिराती गाठले.

'यूएस ओपन'चा बोध घ्यावा खेळामध्ये कधीही काहीही होऊ शकतं, कुणीही विजयाचा सिकंदर नसतो. ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून गोल्डन स्लॅम करण्यास निघालेल्या सिकंदर जोकोविचच्या हाती, ऑलिम्पिकचं कांस्यपदक तेव्हाही लागलं नव्हतंच. काही वर्षांपूवच्या अमेरिकन ओपन स्पर्धेत लाईन रेफ्रींना चेंडू मारल्याबद्दल, जोकोविचवर कारवाई करण्यात आली आणि त्याला स्पर्धेतून बाहेर काढण्यात आले होते. अमेरिकन ग्रॅण्ड स्लॅम संघटनांनी नियमाचा भंग केलेल्या जोकोविचला शिक्षा केली होतीच. जोकोविचप्रमाणे अजून दोघेजण अहंकारी मानले गेले आहेत. त्यातील एक आहे, जॉन मॅकेन्रो आणि दुसरा निक किर्गियोस. जॉन मॅकेन्रो हा आपल्या कारकिदत पंचांशी वाद आणि रागीट स्वभावासाठी प्रसिद्ध होता. निक किर्गियोस याने जरी एकेरी ग्रॅण्ड स्लॅम जिंकले नसले, तरी कोर्टवरील गैरवर्तन आणि वादग्रस्त विधानांमुळे त्याच्याही नावाची चर्चा असे. ऑस्ट्रेलियाचा निक किर्गियोसची २०१९ची अशीच एक घटना आहे. अमेरिकन ओपन ग्रॅण्ड स्लॅम टेनिस स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत, निक किर्गियोसने अॅन्टॉईन हाँगवर मात केली. या लढतीला सुरुवात होण्याआधीच त्याची पंचांशी शाब्दिक चकमक उडाली होती. निक किर्गियोसच्या जसच्या कॉलरवर 'जस्ट डू यू...' असा संदेश लिहिला होता, ज्यावर पंचांनी आक्षेप घेतला. ''वर केलेली कॉलर दुमड; म्हणजे संदेश झाकला जाईल,'' असे पंच सांगत होते. मात्र निक किर्गियोसने ''असे मी का करू? त्य मागे कोणता नियम आहे, तो सांगा. पटले, तरच कॉलर दुमडणार,'' अशी भुमिका घेतली. संबंधित खुलासा केला जात नाही, तोपर्यंत लढतीत भाग घेणार नाही, असाच काहीसा पवित्रा त्याने घेतला. अखेर नियम सांगितल्यावर लढतीला सुरुवात झाली. त्या 'जस्ट डू यू' या संदेशाचा मराठी मतितार्थ होतो, स्वतःसारखेच राहा, स्वतःची मज चालवा, स्वतःचेच ऐका!






हा संदेश निकच्या बंडखोर शैलीशी जुळणारा आहे हे कमी होते की काय, म्हणून निक किर्गियोसने आणखी एका मुद्द्यावरून पंचांशी भांडण उकरून काढले. त्याने सामना जिंकल्यावर पंचांनी 'गेम' अशी घोषणा केली; पण प्रतिस्पर्ध्याने निर्णयाविरुद्ध 'रिव्ह्यू' मागितला. यावर निक किर्गियोस अडून बसला. ''पंचांनी 'गेम' पार पडल्याची घोषणा केल्यावर प्रतिस्पध 'रिव्ह्यू' मागूच कसा शकतो?'' असा प्रश्न करून, त्याने पुन्हा आडकाठी केली. याचा विरोधही त्याने जोरदार ओरडून व्यक्त केला. ''तुम्ही याविषयी निरीक्षकांशीच बोला,'' या मागणीवरच निक अडून बसला. अखेर निकला पुन्हा नियम समजावण्यात आला अणि सामाना पुढे सरकला. बरेचसे खेळाडू त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसोबतच त्यांच्या अशा वादग्रस्त स्वभावासाठीही, क्रीडा इतिहासात ओळखले जातात.

'ऑस्ट्रेलियन ओपन' महिला एकेरी : ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ मधील महिला एकेरीचा अंतिम सामना दि. ३१ जानेवारी रोजी झाला. या सामन्यात जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडू असलेल्या एरिना सबालेंकाचा पराभव करून, एलिना रायबाकिना 'ऑस्ट्रेलियन ओपन' विजेतेपद जिंकणारी कझाकस्तानची पहिली महिला खेळाडू ठरली आहे.

आम्हीतरी मागे का! : अहंकारी व रागीट असणे, ही पुरुषांचीच मक्तेदारी नाही; काही स्त्रियाही या रांगेत आहेत. अमेरिकन कोको गॉफला, यावेळच्या 'ऑस्ट्रेलियन ओपन'च्या महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत पराभवाचा फटका बसला. या पराभवानंतर कोको गॉफने स्वतःची रॅकेट आपटत मोडून, नाराजी व्यक्त केली होती. ''भावनेच्या भरात रॅकेट जमिनीवर आपटून मोडली, तर त्यात गैर ते काय,'' असा उलट सवालही तिने केला. तसेच, ती घटना दूरचित्रवाणीवर वारंवार दाखवल्याबद्दल संबंधित वाहिनीलाही फटकारलं. ''लहान मुलं-मुली टेनिस सामने बघत असतात; त्यांच्यापुढे असे वर्तन अयोग्यच ठरते. पण भावनांना वाट करून देणेही महत्त्वाचंच आहे; ते विचार मनात साठवून ठेवण्यापेक्षा अशा कृतीतून वेळीच काढून टाकलेले बरे,' असे कोको गॉफचे म्हणणे. २०२२मध्ये रोमानियाच्या इरिना कॅमोलिया बेगूहिनेही रागाच्या भरात, रॅकेट चक्क प्रेक्षकांत भिरकावली होती. ती एका लहान मुलाच्या जवळ पडली, अचानक झालेल्या घटनेनं तो मुलगा रडला होता.

सार्वजनिक खासगीपण : ''टेनिस कोर्टच्या पलीकडे खेळाडूंचे खासगी आयुष्य जपलं गेलं पाहिजे. आम्ही टेनिसपटू म्हणजे प्राणिसंग्रहालयात ठेवलेले प्राणी नव्हेत,'' अशी संतप्त प्रतिक्रिया, पोलंडची टेनिसपटू इया स्वियाटेक हिने व्यक्त केली. नोव्हाक जोकोविचसारखा अनुभवी टेनिसपटूही इयाशी सहमत आहे. टेनिसपटूंच्या या नाराजीस कारण ठरले, ते कोको गॉफने रॅकेटचे प्रकरण! ''सध्या लॉकररुम वगळता टेनिसपटूंना खासगी आयुष्यच राहिलेले नाही. ही परिस्थिती खरोखरच वाईट आहे,'' असे गॉफने म्हटले होते.

क्या हार मे क्या जित मे : हा वरील प्रकार टेनिसमध्येच घडतो असे नाही. जिंकल्यावरही क्रीडासाहित्य सर्वांसमोर भिरकावतानाचा प्रकार ऑक्टोबर २०२५ मध्ये आपण अनुभवला आहेच की!

बुद्धिबळात प्यादे किंवा राजा प्रेक्षकांमध्ये भिरकावणे ही खिलाडूवृत्ती नसलेली, उन्मादी वर्तणूक मानली जाते. जी अनेकदा रागाच्या भरात घडते. अमेरिकेचा ग्रॅण्डमास्टर हिकारू नाकामुरा याने भारताच्या डी. गुकेशविरुद्धची लढत जिंकल्यावर, आनंदाच्या भरात गुकेशचा राजा प्रेक्षकांमध्ये भिरकावला होता. बुद्धिबळासारख्या शांत आणि शिस्तबद्ध खेळातही अशी वर्तणूक दिसणे, हे अपेक्षित नसते. अशी कृती क्रीडाभावनांच्या विरोधी असल्याने, त्यावर टोकाची टीका होते. इंग्रजी शब्दकोशात ग्रॅण्ड स्लॅममधील 'स्लॅम'चा अर्थ 'खोलीत खोलीबाहेर फणकाऱ्याने जाणे,' असा मराठीमध्ये आहे, तर 'शक्तिशाली प्रहार' असा हिंदीत आहे. या नात्याने 'ग्रॅण्ड स्लॅम'ला असे वर्तन करणाऱ्यांचे तरी काय चुकलंय? असे उपहासाने आपण म्हणूच शकतो.

खेळाडूंची हीदेखील जबाबदारी : काही पालक आपल्या कुटुंबातील लहान मुलांसमवेत प्रत्यक्ष क्रीडांगणावर, तसेच दूरचित्रवाणीवरील सामने बघायला बसतात. ती मुलं ते सामने बघताना, दोन गोष्टी त्यातून नकळत शिकतात. एक म्हणजे त्या क्रीडाप्रकारातील बारकावे आणि दुसरे म्हणजे त्या खेळाडूंचे वर्तन. ते खेळाडू कसं खेळतात, त्या खेळाडूंची शैली, ढब, वेशभूषा, याचबरोबर ते खेळाडूंचे वर्तन याचेही निरीक्षण् करतात. ही मुलं त्यांच्यासारखेच वागण्याचा प्रयत्न करतात. अशा परिस्थितीत त्या खेळाडूंची जबाबदारी वाढते. कारण प्रेक्षकांमधील अनेक युवक-युवती त्यांना पाहूनच त्यांचे तंतोतंत अनुकरण करणारे, इंग्रजीत म्हणतात तसे 'कॉपी कॅट' होत असतात. म्हणून खेळाडू हा समाज घडवणारा एक महत्त्वाचा घटक असतो, हे क्रीडापटूने आवर्जून ध्यानात ठेवले पाहिजे. जसे तुमचे अनुकरण करणाऱ्यांवर वाईट प्रभाव पडणार नाही, असे वर्तन ठेवणे हीच एका खऱ्या चांगल्या खेळाडूची जबाबदारी असते. तसेच योग्य अयोग्यचे ज्ञान पुढच्या पिढीला देणे, ही पालकांचीही जबाबदारी आहे असे म्हणणे सयुक्तिक नाही का ठरणार!

**(लेखक माजी खेलकूद आयाम प्रमुख, पश्चिम महाराष्ट्र प्रांत, जनजाती कल्याण आश्रम आणि माजी हॉकीपटू आहेत.)**

**९४२२०३१७०४**

# स्मार्ट वीजमीटर : अचूक बिलिंग आणि वीजदरात सवलतीची नामी संधी

तंत्रज्ञान हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला असून, काळानुसार त्यात सातत्याने बदल होत आहेत. यांत्रिक उपकरणांपासून ते डिजिटल आणि स्मार्ट तंत्रज्ञानापर्यंतचा प्रवास आपण सर्वच क्षेत्रांत अनुभवत आहोत. घड्याळ, टीव्ही, रेडिओ, कॉम्प्युटर, मोबाइल यांसारख्या साधनांप्रमाणेच आता वीज मोजणीच्या क्षेत्रातही स्मार्ट तंत्रज्ञानाने प्रवेश केला आहे. याच पार्श्वभूमीवर महावितरणकडून राज्यातील ग्राहकांसाठी स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) वीजमीटर बसवण्यात येत आहेत. ९ ते २३ फेब्रुवारीदरम्यान स्मार्ट मीटर पंधरवडा साजरा होत आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया स्मार्ट मीटरचे फायदे...

महावितरण ही राज्यातील सुमारे तीन कोटी १६ लाख ग्राहकांना वीजपुरवठा करणारी शासकीय कंपनी असून, वीजबिलांच्या अचूकतेला आणि पारदर्शकतेला तिने नेहमीच प्राधान्य दिले आहे. यापूर्वी फोटो मीटर रीडिंग, मोबाइल ॲपद्वारे रीडिंग, केंद्रीकृत



बिलिंग प्रणाली यांसारखे उपक्रम राबवून ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ केला आहे. आता त्याच प्रवासाचा पुढचा टप्पा म्हणजे स्मार्ट टीओडी मीटर होय.

स्मार्ट टीओडी मीटरचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे स्वयंचलित आणि अचूक मीटर रीडिंग. जुन्या पद्धतीत मानवी हस्तक्षेपामुळे चुकांची शक्यता असायची, अंदाजे बिल दिले जायचे किंवा रीडिंग न मिळाल्यास तक्रारी निर्माण व्हायच्या. स्मार्ट मीटरमुळे हे सर्व प्रश्न संपुष्टात येणार असून, दरमहा अचूक वापरानुसारच बिल तयार होणार आहे. घर बंद असले, कंपाउंड लॉक असले तरीही रीडिंग आपोआप घेतले जाणार आहे.

या मीटरमधील टीओडी प्रणालीमुळे वीजदरात थेट सवलत मिळणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ६ या कालावधीत वापरलेल्या विजेसाठी प्रतियुनिट ८० पैसे ते १ रुपया सवलत देण्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजुरी दिली आहे. ही सवलत १ जुलै २०२५ पासून लागू झाली असून, घरगुती ग्राहकांसाठी ही मोठी दिलासादायक बाब आहे. घरगुती ग्राहकांचे वीजबिल स्मार्ट टीओडी मीटरमुळे आणखी कमी होणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे, हे स्मार्ट मीटर महावितरणकडून शंभर टक्के मोफत बसविण्यात येत आहेत. यासाठी ग्राहकांकडून कोणतेही शुल्क घेतले जात नाही. तसेच हे मीटर पोस्टपेडच असून, सध्याप्रमाणेच मासिक बिलिंग प्रणाली कायम आहे. स्मार्ट मीटरमुळे वीजदर वाढतील, असा काही लोकांमध्ये गैरसमज पसरविला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात घरगुती ग्राहकांचे वीजदर प्रथमच कमी झाले आहेत.

सौरऊर्जेच्या दृष्टीनेही स्मार्ट टीओडी मीटर उपयुक्त आहेत. नेटमीटर प्रणालीमुळे छतावरील सौर प्रकल्पातून निर्माण होणारी व वापरली जाणारी वीज तसेच ग्रीडला दिलेली अतिरिक्त वीज याचा अचूक हिशेब ठेवता येतो. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेंतर्गत सौर प्रकल्प बसवणाऱ्या ग्राहकांसाठी हे मीटर विशेष फायदेशीर ठरणार आहेत.

एकूणच, स्मार्ट टीओडी मीटर म्हणजे अचूक बिलिंग, पारदर्शकता, वीजदरातील सवलत आणि ग्राहक-सुविधांचा संगम आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून स्मार्ट मीटर बसविणे ही काळाची गरज असून, त्याचा थेट फायदा वीजग्राहकांनाच होणार आहे. ग्राहकांनी हे मीटर बसवण्यासाठी सहकार्य करून अचूक बिलांचा व सवलतींचा लाभ घ्यायला हवा.

**- ज्ञानेश्वर आर्दड**
**(जनसंपर्क अधिकारी, महावितरण)**

# महिला शेतकऱ्यांच्या डिजिटल सक्षमीकरणासाठी आजपासून 'महाविस्तार एआय' विशेष मोहीम

## कृषी माहितीचा पुरेसा लाभ मिळत नसल्याची दरी भरून काढण्याचा उद्देश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ डिसेंबर**

मुंबई येथे होणाऱ्या आगामी ॲग्री एआय शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर तसेच आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त, राज्यातील महिला शेतकऱ्यांचा डिजिटल समावेश वाढविण्यासाठी १० ते १४ फेब्रुवारीदरम्यान 'महाविस्तार एआयद्वारे महिला शेतकऱ्यांचा डिजिटल समावेश' ही विशेष राज्यव्यापी मोहीम राबविण्यात येणार आहे.

शेती व संलग्न कामांमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असतानाही त्यांना वेळेवर व विश्वासार्ह कृषी माहितीचा पुरेसा लाभ मिळत नसल्याची दरी भरून काढणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. महाविस्तार एआय शेतकरी ॲपच्या माध्यमातून पीक अवस्थेनुसार सल्ला, स्थानिक हवामानावर आधारित मार्गदर्शन, कीड व रोगांबाबत तत्काळ इशारे तसेच एआय-आधारित चॅटबॉटद्वारे सोप्या भाषेत कृषी सल्ला उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

कीड-रोग ओळखीसाठी छायाचित्रावर आधारित प्रणाली व व्हॉईस-आधारित सेवा विकसित करण्यात येत असून, त्यामुळे महिला शेतकऱ्यांसाठी ॲपचा वापर अधिक सुलभ होणार आहे. मोहिमेदरम्यान प्रत्येक गावात महिला शेतकऱ्यांसाठी विशेष प्रात्यक्षिके आयोजित केली जाणार आहेत. जमीन मालकी हक्काचा विचार न करता शेती किंवा संबंधित कृषी कामात सहभागी असलेली कोणतीही महिला 'महिला शेतकरी' म्हणून पात्र राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

स्मार्टफोन नसलेल्या महिलांसाठी गट-आधारित प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात येणार असून, कृषी ताई, कृषी सखी, पशुसखी, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, पोक्रा व इतर योजनांतील शेतीशाळा तसेच कृषी व कृषी विज्ञान महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहभागातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. महिला शेतकऱ्यांच्या गरजेनुसार कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येणार असून, महाविस्तार ॲपची माहिती देणारे लघु व्हिडिओ सोशल मीडियाच्या माध्यमातूनही प्रसारित केले जाणार आहेत. या उपक्रमामुळे राज्यातील महिला शेतकऱ्यांचा अर्थपूर्ण डिजिटल समावेश साध्य होईल, असा विश्वास विभागीय कृषी सहसंचालक संभाजी ठाकूर यांनी व्यक्त केला आहे.

# श्रेयलंपटतेचा कळस

**वेध**
**कौस्तुभ वीरकर**

मुंबईच्या महापौर म्हणून रितू तावडे यांच्या नावाची घोषणा होताच काहींचा राजकीय पोटशूळ जागा झाला. भाजपने हा निर्णय घेतल्यावर उबाठा गटाच्या छातीतील धडधड वाढली. कारण ही निवड म्हणजे गेल्या काही वर्षांत रचलेल्या राजकीय कुभांडावरची मारलेली जबरदस्त थाप होती. झाले असे की, उबाठा आणि मनसेमुळेच भाजपला मराठी चेहरा द्यावा लागल्याचा दावा, संजय राऊतांनी करत, नेहमीप्रमाणेच श्रेयलंपटतेचा कळस गाठला. पण भाजपने महापौर मराठी आणि हिंदूच असणार, हे आधीच जाहीर केल्याने यात ठाकरे द्वयींच्या श्रेयाचा प्रश्न येतोच कुठे? स्वतःच स्वतःची पाठ थोपटण्याची सवय असणाऱ्यांनी जनतेच्या स्मरणशक्तीला इतकेही गृहीत धरू नये!

रितू तावडे यांनी निवड झाल्यावर माध्यमांशी बोलताना मुंबईतील बांगलादेशी घुसखोरीवर ठाम भूमिका घेतली. त्यामुळे या भूमिकेवरही टीका करताना राऊत यांनी ''आधी मोदींनी बांगलादेशला यावषच्या अर्थसंकल्पात निधी का दिला? तेथील हिंदूंना मारण्यासाठी का?'' असा सवाल केला. त्यांचा हा प्रश्न अज्ञानाचा, बौद्धिक दिवाळखोरीचा आणि जाणीवपूर्वक गोंधळ घालण्याचा उत्कृष्ट नमुना ठरावा. अंतर्गत सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणातील आर्थिक मदत या दोन गोष्टींमधील गुणात्मक फरक समजण्याइतपत तरी विवेक उबाठा गटाकडे शिल्लक आहे की तोही सत्तेसोबतच संपुष्टात आला, हाच एकमेव प्रश्न ! राऊत यांनी केलेली टीका वरकरणी घुसखोरीवरची असली, तरी मतपेटी हातातून निसटत चालल्याच्या भीतीचा त्याला दर्प आहेच. मुस्लीम मतांसाठी लांगूलचालन करत हिंदुत्वाचा त्याग करणारे, आमचे आणि तुमचे हिंदुत्व म्हणत हिंदूंमध्ये जाणीवपूर्वक फूट पाडणारे, आज अचानक हिंदुत्वावर व्याख्यानं झोडू लागले आहेत. ज्यांनी हिंदू समाजाची विभागणी करण्यातच समाधान मानले, त्यांची आज एकसंघ हिंदू मतदार जागा झाल्याने पाचावर धारण बसली आहे. गेल्या काही वर्षांत मुंबईतील वाढत्या बांगलादेशी घुसखोरीविरोधात यांनी कधी 'ब्र'ही काढला नाही; मात्र आज कोणी प्रत्यक्ष कारवाईची भाषा करतोय, तर त्याच्याविरोधात विखार ओकला जातो. वास्तविक उबाठा गटाला पडलेला प्रश्न देशाचा नाही, मुंबईचा नाही, तर तो आहे सत्तासुखाचा! हिंदुत्वाचा सौदा करून मतपेटी सुरक्षित राहील, हा उबाठा गटाचा भ्रम आता फुटला आहे. उबाठासाठी आजचे वास्तव हेच आहे की, सत्ता हातातून गेली आहे आणि एकाधिकाराची ठेकेदारीही!

# आडनावाचेच गांधी

तेलंगणातील काँग्रेस सरकार अल्पसंख्याकांच्या पाठिंब्याने सत्तेत आल्याचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांचे वक्तव्य आणि गरज पडल्यास मुस्लीम लोकसंख्येचा संपूर्ण डेटा सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याची तयारी, तसेच चार टक्के मुस्लीम आरक्षणासाठी सुरू असलेली धडपड या साऱ्या घडामोडींनी काँग्रेसचा राजकारणातील लांगूलचालनाचा चेहरा पुन्हा एकदा उघडा पडला आहे. कधीकाळी 'समावेशकता' आणि 'सर्वधर्मसमभाव'च्या घोषणा देणारा पक्ष, आज प्रत्यक्षात मात्र उघडपणे मतपेटींच्या तुष्टीकरणाच्या मार्गावर चालतो आहे. भारतीय राजकारणात काँग्रेस काही काळ मध्यम मार्ग स्वीकारणारा, समाजातील विविध घटकांमध्ये समतोल राखणारा पक्ष म्हणून स्वतःची पाठ थोपटत असे. स्वातंत्र्योत्तर काळात धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय एकात्मता यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावाही त्यांनी केला. मात्र, कालांतराने ही भूमिका बदलत गेली. त्यानंतर लपून-छपून त्यांनी मुस्लीम लांगूलचालनाचा एककलमी कार्यक्रम स्वीकारला.

आज रेवंत रेड्डी यांचे सरकार उघडपणे त्याचीच री ओढत आहे. चार टक्के मुस्लीम आरक्षणाचा मुद्दा हा थेट मतांच्या गणिताशी जोडलेला आहे. आरक्षणाची संकल्पना सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणावर आधारित असावी, हा घटनात्मक गाभा आहे. मात्र धर्माच्या आधारे आरक्षणाचा आग्रह धरणे, हे घटनात्मक मूल्यांनाच छेद देणारे आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसची दुहेरी भूमिका अधिक ठळकपणे समोर येते. अल्पसंख्याकांच्या बाबतीत 'समूह' म्हणून विचार केला जात असताना, हिंदूहिताच्या चर्चेच्या वेळी मात्र 'समग्र हिंदू' समाजाकडे पाहण्याऐवजी त्यांना जातींच्या चौकटीत विभागण्याचे पातक काँग्रेस वारंवार करताना दिसते. राहुल गांधी यांच्या भाषणांतून हे चित्र स्पष्टपणे उमटते. कधी ओबीसी, कधी दलित, कधी आदिवासी अशा वेगवेगळ्या चौकटींत हिंदू समाजाचे तुकडे करून, राजकीय प्रयोग काँग्रेस करताना हल्ली दिसते. 'फोडा आणि राज्य करा' ही नीती भारतीय नागरिकांसाठी आणि राजकारणासाठीही नवी नाही आणि या नीतीने देशाला मात्र मोठे नुकसान सहन करावे लागते. मात्र, भाट चारण्याच्या गदत राहण्याची सवय असलेल्यांना हे सत्य सांगणार कोण? फक्त 'गांधी' आडनाव लावल्याने सत्यावर प्रेम करता येत नाही, हेच खरे!

# शहाणपण देगा देवा!

**जगाच्या पाठीवर**
**मुकुल आव्हाड**

जगभरामध्ये सध्या 'जेन-झी'चा बोलबोला सुरू आहे. एका बाजूला ही पिढी करिअरच्या दृष्टीने नवा विचार मांडत, नवीन वाट निर्माण करीत आहे. तर, दुसऱ्या बाजूला देशविदेशांतील राजकीय शक्तींना, दमनशाहीला आव्हान देण्याचे कामसुद्धा यांच्याच माध्यमातून केले जात आहे. प्रत्येक नवी पिढी ही आशेचा किरण असते. समाजासमोरचे कठीण प्रश्न नवी पिढी सोडवेल या आशेने, या पिढीतील तरुणांकडे बघितले जाते. यात लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे, प्रत्येक पिढी ही त्या त्या काळाचे आपत्य असते. त्यामुळे त्या त्या पिढीच्या कार्यशैलीचे, यश-अपयश समजून घेण्यासाठी तत्कालीन समाजव्यवस्था लक्षात घेणे गरजेचे. 'जेन-झी'च्या या विविध कंगोऱ्यांना स्पर्श करण्याचे कारण म्हणजे, एका अहवालानुसार 'जेन-झी' ही कदाचित अशी इतिहासातील पहिलीच पिढी आहे, जिची शैक्षणिक प्रगती आणि बुद्ध्यांक त्यांच्या आधीच्या पिढीपेक्षा कमी आहे.

अमेरिकेतील शिक्षणतज्ज्ञ तथा न्यूरोसायंटिस्ट असलेले डॉ. जेरेड कूनी हॉर्व्हथ यांनी, अमेरिकन सिनेटसमोर यासंदर्भातील माहिती सप्रमाण नुकतीच प्रस्तुत केली. हॉर्व्हथ यांनी काही काळ यावर संशोधन केले असून, त्यांच्या या दाव्यानंतर आता शैक्षणिक क्षेत्रात चर्चेला उधाण आले आहे. वास्तविक २०व्या शतकामध्ये 'फ्लिन इफेक्ट' नावाचा एक सिद्धांत मांडला गेला. त्यानुसार, चांगल्या पोषण आहारामुळे आणि सुधारलेल्या शिक्षण पद्धतीमुळे, प्रत्येक नवीन पिढीचा बुद्ध्यांक आधीच्या पिढीपेक्षा जास्त असतो. मात्र, २१व्या शतकामध्ये हा आलेख खाली आलेला दिसतो. संशोधकांच्या मते, 'जेन-झी'च्या बाबतीत हा वेग वेगाने मंदावला असून, त्यांची शैक्षणिक कामगिरी खालावली आहे. आता या घसरणीचे सर्वांत मोठं कारण म्हणजे स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा अति वापर! इंटरनेटच्या युगामध्ये जन्मलेल्या या पिढीच्या हातात स्मार्टफोन तुलनेने लवकर हाती आला. पारंपरिक शिक्षणपद्धतीमध्ये प्रत्यक्षात शिकणे, लोकसमूहाच्या सान्निध्यात शिक्षण घेणे, यातून व्यक्तीचा सर्वांगीण विकासाला चालना मिळे. मात्र, तंत्रज्ञानचा शिरकाव ज्यावेळी वर्गामध्ये झाला, त्याक्षणी या प्रत्यक्ष अनुभूतीचे शिक्षण टप्प्याटप्प्याने बंद होऊ लागले.

'कोविड' काळात तर शिक्षणक्षेत्र पूर्णपणे ढवळून निघाले. स्मार्टफोन, इंटरनेट, या गोष्टींचं रूपांतर मूलभूत गरजांमध्ये झालं. लॉकडाऊनमुळे प्रत्यक्ष वर्ग बंद होऊन, ऑनलाईन शिक्षण सुरू झाले. परिणामी विद्यार्थ्यांच्या मूलभूत गणिती क्रिया, वाचन आणि लेखनाच्या कौशल्यात मोठीच तफावत निर्माण झाली. केवळ परीक्षेसाठी अभ्यास करणे आणि माहिती 'गुगल'वर शोधणे या सवयींमुळे, त्यांच्या स्वयंशिक्षणाला मर्यादा आल्याचे निरीक्षण, तज्ज्ञांनी नोंदवले आहे. यासंदर्भात एड-टेक कंपन्यांवरसुद्धा हॉर्व्हथ यांनी भाष्य केले आहे. ते म्हणतात की, आजच्या घडीला अर्ध्याहून अधिक वेळ हा स्मार्टफोनवरून गोष्टी शिकण्यात जात आहे. वास्तविक हा पारंपरिक शिक्षणाला पर्याय असू शकत नाही; कारण आपल्या मेंदूची मूळ रचना ही सक्रिय शिक्षणातून गोष्टी समजून घेण्याची आहे. ३० सेकंदाच्या एखाद-दुसऱ्या रिलमुळे आपल्याला माहिती मिळू शकेल; परंतु त्या माहितीचे ज्ञानामध्ये रूपांतर कसे होईल, याचा यानिमित्ताने विचार होणे आवश्यक आहे. यासंदर्भात कॉर्पोरेट कंपन्यांमधील व्यवस्थापकांच्या मते, या पिढीच्या तरुणांमध्ये तांत्रिक ज्ञान उत्तम असले तरी त्यांच्यात कौशल्यांचा अभाव, समोरासमोर बसून संवाद साधणे, टीका सहन करणे किंवा कामाच्या ठिकाणी शिस्त पाळणे या बाबतीत ही पिढी संघर्ष करताना दिसते. स्पर्धेच्या युगामध्ये टिकून राहण्यासाठी जी कौशल्ये आवश्यक आहेत, ती कमावण्यासाठी त्यांना वेळ देणे आवश्यक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

याचा अर्थ 'जेन-झी' पिढी अक्षम आहे, असे नव्हे. मात्र परिवर्तनाची वाट जोखताना, तंत्रज्ञान आणि अनुभूती या दोन्ही गोष्टींचा मेळ साधण्याचा विचार करणे आवश्यक आहे. हॉर्व्हथ यांचा विरोध हा शिक्षणातील तंत्रज्ञानाला नाही. मात्र, त्याचबरोबर मुलांची जिज्ञासा टिकवणारी शिक्षणव्यवस्था कशी निर्माण करता येईल, याचा विचार होणे गरजेचे आहे, असं ते सांगतात. तंत्रज्ञानात सर्वाधिक प्रगत आणि सामाजिक प्रश्नांवर जागरूक असलेली आपली पिढी आता 'शहाणपणा'च्या वाटेवर नवी दिशा कसा प्रवास करणार, हे येणारा काळच ठरवेल.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### रंगोत्सव सेलिब्रेशनतर्फे कला स्पर्धेत ६०० विद्यार्थी सहभागी

**धुळे** : रंगोत्सव सेलिब्रेशनतर्फे (मुंबई) आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कला स्पर्धा उत्साहात पार पडल्या. स्पर्धेत टॅटू, स्केच, रंगभरण, हस्ताक्षर, ग्रीटिंग कार्ड आदी कलाप्रकारांचा समावेश होता. शहरातील विविध शाळांमधील सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शहरातील सेंट अँटनी स्कूलमध्ये रंगभरण स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. फादर विल्सन रोड्रिक्स यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनानंतर स्पर्धेला प्रारंभ झाला. या वेळी विविध शाळांतील कलाशिक्षक उपस्थित होते. रंगोत्सव सेलिब्रेशनच्या इव्हेंट डायरेक्टर तसेच जिजामाता शाळेच्या योगशिक्षिका मनीषा कमलेश पाटील यांनी स्पर्धेचे नियोजन केले. शहरातील कनोसा कॉन्व्हेंट, जयहिंद इंग्लिश स्कूल, मयूर शाळा, बाफना शाळा, पोतदार स्कूल, सेंट अँथनी स्कूल, श्री जी स्कूल, सिंदुरल स्कूल, गरुड स्कूल आदी शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला. विविध वर्गांनुसार विद्यार्थ्यांना स्केचिंग, रंगभरण, निसर्गचित्र, कार्टून, मिकी माउस, टॅटू डिझाइन आदी विषय देण्यात आले. विद्यार्थ्यांनी कल्पक व सुबक चित्रे सादर केली.



### 'इकॅम कप २०२६' क्रिकेट स्पर्धेचा उत्साहात प्रारंभ

**धुळे** : इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (इकॅम) धुळेनंदुरबार विभाग यांच्या वतीने आयोजित इकॅम कप २०२६ क्रिकेट स्पर्धेचा प्रारंभ उत्साहात झाला. स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सायस दराडे, इकॅम महासमितीचे अध्यक्ष देवांग ठाकूर तसेच महासचिव अमरनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी सहभागी झाले होते. स्पर्धेतील सामने पॉवर प्ले टर्फच्या देवपूर परिसरातील नेताजी ग्राउंडे खेळविण्यात येत आहेत. स्पर्धेमुळे धुळे, नंदुरबार विभागातील इलेक्ट्रिकल कंत्राटदारांमध्ये आपुलकी, संघभावना, टीम स्पिरिट तसेच खेळाडूवृत्ती वाढीस लागेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. क्रिकेट महोत्सवाच्या निमित्ताने इकॅमचे सर्व सभासद, कंत्राटदार तसेच नागरिकांनी उपस्थित राहून सामान्यांचा आनंद घेतला.

### होळनांथे येथील विजय कुंभार देशसेवेसाठी कर्तव्यावर रुजू

**धुळे** : शिरपूर तालुक्यातील होळनांथे येथील रहिवासी व धुळे जिल्हा कुंभार समाज सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते अशोक कुंभार यांचे सुपुत्र विजय अशोक कुंभार याने महाराष्ट्र सुरक्षा बलमध्ये यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करून देश सेवेत कर्तव्यावर रुजू झाला आहे.



विजय हा बारावी उत्तीर्ण झाल्यावर पोलीस भरती, इंडियन आर्मी तसेच एमएफएस भरतीची तयारी करत होता. त्याचे पोलीस खात्यात नोकरी करण्याचे स्वप्न होते. तो गतवर्षी एमएफएसमध्ये भरती झाला. पुण्यात प्रशिक्षण पूर्ण करून तो आता सेवेत हजर झाला. त्याचे वडील अशोक कुंभार हे ट्रॅक्टरचालक असून, आई शेतीकाम करते. मोठा भाऊ असून, तोही गावात कामधंदा करून उदरनिर्वाह करतो. प्रतिकूल परिस्थितीत विजयने शासकीय नोकरी प्राप्त केली आहे. या यशात आई वडील, भाऊ, काका, काकू, आजी आजोबा यांची विजयला मोलाची साथ मिळाली. विजय कुंभार याचा शासकीय नोकरीत लागल्याने धुळे जिल्हा कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किशोर कुंभार यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला.

### अन् वैयक्तिक आनंद सोहळे दुय्यम : संदीप बच्छाव

**पिंपळनेर (साक्री)** : स्वतःचा वाढदिवस साजरा करणे ही वैयक्तिक आनंदाची गोष्ट असू शकते. मात्र, समाजहिताचे ध्येय जोपर्यंत पूर्ण होत नाही, तोपर्यंत वाढदिवस साजरा करणे माझ्यासाठी अशुभ आहे, अशा शब्दांत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज समितीचे अध्यक्ष संदीप बच्छाव यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.



दहिवेल येथील समाजसेवक संदीप बच्छाव यांनी एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी आदर्श समोर ठेवला आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान आणि त्यांचे कार्य येणाऱ्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरावे, यासाठी भव्यदिव्य स्मारक उभे राहणे ही काळाची गरज आहे. केवळ हार-तुरे आणि शुभेच्छा स्वीकारण्यापेक्षा, महाराजांच्या विचारांचा वारसा जपणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. जोपर्यंत हे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही, तोपर्यंत वैयक्तिक आनंदाचे सोहळे दुय्यम राहतील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### मुंबईत १७ मार्चला डाक पेन्शन अदालत

**धुळे** : डाक विभागाच्या निवृत्तिवेतनधारक, कुटुंब निवृत्तिवेतनधारकांसाठी ५८ वी डाक पेन्शन अदालतीचे आयोजन मुंबई येथील मुख्य पोस्टमास्तर जनरल कार्यालयात १७ मार्चला सकाळी अकराला करण्यात आले आहे, अशी माहिती येथील डाकघर प्रवर अधीक्षकांनी दिली.

## खेळाडूंच्या ५ टक्के आरक्षणासाठी 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणाली विकसित

**धुळे** : राज्यातील खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने 'क्रीडा ई-प्रमाण' ही अद्ययावत प्रणाली विकसित केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या या प्रणालीमुळे आता खेळाडूंच्या प्रमाणपत्रांची पडताळणी मानवी हस्तक्षेपाशिवाय डिजिटल पद्धतीने होणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील यांनी दिली.

धुळे जिल्ह्यात कार्यरत असलेल्या व राज्य व राष्ट्रीय स्पर्धाचे आयोजन करणाऱ्या सर्व एकविध क्रीडा संघटनांनी क्रीडा ई-प्रमाण प्रणालीचा लाभ तळागाळातील खेळाडूपर्यंत पोहचविण्यासाठी सूचनांचे पालन करावे.जिल्ह्यातील खेळाडूना नवीन प्रणालीबाबत अवगत करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. खेळाडूंनी क्रीडा ई- प्रमाण प्रणालीवर आपला आधार संलग्न आयडीद्वारे लॉगीन करुन नोंदणी करणे अनिवार्य राहील. खेळाडूंनी सादर केलेली माहिती आणि संघटनेने ब्लॉकचेनवर अपलोड केलेली हॅश यांची प्रणालीद्वारे स्वयंचलित पडताळणी होईल. यामुळे खेळाडूंना यापुढे पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही.

तांत्रिक कारणास्तव एखाद्या खेळाडूचे प्रमाणपत्र नामंजूर झाल्यास तक्रार करण्याची व तक्रारीनंतरही खेळाडूस प्रमाणपत्र न मिळाल्यास ३० दिवसांच्या आत ऑनलाइन अपील करण्याची सोय उपलब्ध आहे. क्रीडा ई-प्रमाण प्रणाली खेळाडूंच्या ५ टक्के आरक्षणाच्या लाभाशी निगडित असल्याने संघटनांनी वेबसाइटवर खेळाडूंची माहिती अपलोड करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी पाटील यांनी केले आहे.

# वनहक्क म्हणजे सन्मान, सुरक्षितता अन् सर्वांगीण विकासाची नवी वाट

## मंत्री डॉ. अशोक वुईके : नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयात वनजमीन पट्टे वाटप सोहळा उत्साहात

**नंदुरबार** : जनतेशी विश्वासाचा संवाद, शासन- प्रशासनातील समन्वय आणि प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेतले, तर वनहक्क कायद्याचा खरा लाभ थेट आदिवासी कुटुंबांपर्यंत पोहोचतो. वनहक्क म्हणजे केवळ कागदोपत्री अधिकार नव्हे, तर सन्मान, सुरक्षितता आणि विकासाची सुरुवात आहे, असे प्रतिपादन आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात रविवारी मंत्री डॉ. वुईके यांच्या हस्ते वनजमीन पट्टे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला, त्या वेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमास आमदार आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, नाशिक आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त दिनकर पावरा, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी अनय नांवदर (तळोदा), चंद्रकांत पवार (नंदुरबार), प्रमोद पाटील (धुळे), नीलेश माळी आदी उपस्थित होते.

मंत्री डॉ. वुईके यांनी नंदुरबार जिल्ह्यात वनहक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासनाने उचललेल्या पावलांचे विशेष कौतुक केले. अनुसूचित जमातीच्या बांधवांना वनहक्क देण्यात प्रभावी कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकारी म्हणून डॉ. मिताली सेठी यांची ओळख राज्यभर निर्माण झाली आहे, असे गौरवोद्‌गार त्यांनी काढले. वनहक्क मालकी पट्टे देणे ही आदिवासी विकास विभागाची मुख्य जबाबदारी असली, तरी वनविभाग, महसूल विभाग आणि जिल्हा प्रशासन यांच्यातील सुसंवाद व समन्वयामुळेच ही प्रक्रिया गतिमान झाल्याचे मंत्री डॉ. वुईके यांनी स्पष्ट केले. सविस्तर आढावा घेतल्यानंतर एक हजाराहून अधिक प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली, ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे ठळक उदाहरण असल्याचेही त्यांनी नमूद केले.



सामूहिक वनहक्क असलेल्या दावेदारांसमोरील अडचणी अधोरेखित करत मंत्री डॉ. वुईके म्हणाले की, सामूहिक वनहक्कांसाठी सामूहिक सातबारा असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजनांचा लाभ मिळत नाही. जोपर्यंत वैयक्तिक मालकी वनहक्क मिळत नाही, तोपर्यंत लाभ मर्यादित राहतो. त्यामुळे या विषयावर स्पष्ट आणि एकसमान मानक कार्यपद्धती तयार करण्याची नितांत गरज आहे. तसेच ज्या लाभार्थ्यांना वैयक्तिक वनहक्क मिळाले आहेत, त्यांच्या मोजणी, सीमा निर्धारण आणि नोंदणीसंबंधी प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश देताना त्यांनी सांगितले की, मोजणी होणार नाही, सीमा ठरणार नाहीत, तोपर्यंत प्रश्न सुटणार नाहीत. म्हणूनच राज्यात प्राधान्य घेऊन नंदुरबार जिल्ह्याने मोजणीचे प्रश्न मार्गी लावणे अत्यावश्यक आहे. शासन आणि प्रशासनातील समन्वयातील दरीचा सर्वाधिक त्रास वनहक्क मालकांनाच सहन करावा लागतो, असे नमूद करून त्यांनी स्पष्ट केले की, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, ही वनहक्क मालकांची रास्त अपेक्षा आहे. जर लाभ मिळत नसेल, तर केवळ बैठका घेण्याला अर्थ राहत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना विश्वासात घेऊनच त्यांच्या मतदारसंघात कार्यक्रम राबवावेत, असेही त्यांनी सांगितले.

### जिल्ह्यातील वनजमीनधारकांना वनपट्ट्यांचे वाटप

नवापूर तालुक्यातील ८, शहादा तालुक्यातील ६, अक्राणी तालुक्यातील ३९ पैकी ५ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मंत्री डॉ. वुईके यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते वनपट्ट्यांचे वाटप करण्यात आले. तसेच नाशिक येथील शबरी वित्त व विकास महामंडळांतर्गत लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटपही करण्यात आले. त्यात महिला सबलीकरण योजनेचे ६ महिलांसह कृषी आणि संलग्न सेवा योजनेंतर्गत ७ लाभार्थ्यांना धनादेश देण्यात आले.लघुउद्योग १ लाभार्थी, लहान उद्योगधंदे- ५ लाभार्थी व हॉटेल-ढाबा योजनेत एका लाभार्थीला लाभ देण्यात आला.

आदिवासी विकास विभागाच्या धारणीसारख्या प्रकल्पांमधून जिल्हाधिकारी व प्रशासनाने शासकीय आश्रमशाळांना आदर्श नमुना स्वरूप दिल्याचा उल्लेख करत, अशा उपक्रमांचे अनुकरण इतर जिल्ह्यांनी करावे, असे आवाहन मंत्री डॉ. वुईके यांनी केले. राज्यात एक हजार ७७१ शिक्षकांची भरती झाल्यामुळे आदिवासी भागातील शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राणी दुर्गवती महिला सबलीकरण योजनेबाबत मंत्री वुईके म्हणाले की, आदिवासी महिला केवळ स्वयंरोजगार करणाऱ्या नव्हे, तर इतरांना रोजगार देणाऱ्या सक्षम उद्योजिका व्हाव्यात, यासाठी शासन कटिबद्ध असून, या उद्दिष्टासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

अनेक वर्षांनंतर झालेल्या या वनजमीन पट्टे वाटप कार्यक्रमामुळे आदिवासी बांधवांच्या हक्कांना नवे बळ मिळाले असून, वनहक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीत नंदुरबार जिल्हा राज्यासाठी प्रेरणादायी आदर्श ठरत असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे.

**वनपट्टे मिळाल्याची समाधानाची बाब**

कार्यक्रमात आमदार आमशा पाडवी यांनी, उशिरा का होईना, काहींना का होईना वनपट्टे मिळाले, ही बाब नक्कीच समाधानाची असून, यासाठी प्रशासनाचे अभिनंदन करावे लागेल. तसेच ज्या प्रकरणांमध्ये काही त्रुटी राहिल्या असतील, त्या सर्वांची समितीमार्फत सखोल चौकशी करून पात्र लाभार्थ्यांना वनपट्टे देण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

आमदार पाडवी म्हणाले की, ज्यांच्याकडे अद्याप वनपट्टे नाहीत, अशा आदिवासी बांधवांना वनविभागाकडून मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अशा कुटुंबांना तातडीने न्याय मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वनपट्टे मिळाल्यानंतर लाभार्थ्यांनी महामंडळाकडून व्यवसायासाठी मिळणाऱ्या अनुदानाचा योग्य व प्रामाणिक वापर करावा आणि मिळालेल्या संधीचे सोने करावे, असे आवाहन त्यांनी केले. वनपट्ट्यांच्या गैरवापरास ठाम विरोध दर्शविताना आमदार पाडवी म्हणाले की, वनपट्टे विकायचे नाहीत. त्याऐवजी बिरसा मुंडा कृषी विकास योजनेतून विहीर घ्यावी, शेतात कोणते पीक योग्य ठरेल याचा विचार करून शेती करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले. वनहक्क म्हणजे केवळ जमीन नव्हे, तर पुढील पिढ्यांच्या सुरक्षित आणि स्वाभिमानी भवितव्याचा पाया आहे, असे सांगत त्यांनी आदिवासी बांधवांना दीर्घकालीन विकासाचा दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले.



## माता रमाईंचा त्याग समाजासाठी सदैव प्रेरणादायी

### शहाद्यातील सिद्धार्थनगरात जयंतीनिमित्त कार्यक्रमात मान्यवरांचा सूर

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ९ फेब्रुवारी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात खंबीरपणे साथ देणाऱ्या आणि दीन-दलितांच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या त्यागाची मूर्ती माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती येथील सिद्धार्थनगर (कुकडेल) भागात उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमात माता रमाईंच्या त्यागाचा वारसा पुढे नेण्याचा आणि समाजाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमापूजनाने झाली. या वेळी परिसरातील बौद्ध उपासक आणि उपासिकांनी एकत्र येत प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर उपस्थितांनी मिळून सामूहिक बुद्धवंदना आणि धम्मवंदना ग्रहण केली, ज्यामुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले.

सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे माता रमाईंच्या संघर्षावर आधारित गायनाचा कार्यक्रम होता. उपस्थित बौद्ध उपासिका आशाबाई कुवर, सुनंदाबाई मोघे, हिराबाई पवार, आरतीबाई सामुद्रे, रंजना कुवर, कविता कुवर, योगिता बैसाणे, वंदना बैसाणे, रोहिणी जगदेव, भारती जगदेव, अरुणा जगदेव, सिंधूबाई कुवर, रेखाबाई कुवर, लक्ष्मीबाई अहिरे, कल्पना कुवर, सुमनबाई भालेराव, नंदिनी कुवर, सविताबाई अहिरे आणि विमल कुवर यांनी गीतांतून माता रमाईंचा जीवनप्रवास उलगडला. त्यांच्या गीतांतून रमाईंचे कष्ट आणि डॉ. बाबासाहेबांना त्यांनी दिलेली साथ याचे भावुक वर्णन करण्यात आले.

याप्रसंगी समाजातील विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यामध्ये निवृत्त प्राथमिक शिक्षक नरेंद्र कुवर आणि नवनिर्वाचित नगरसेवक मुनेशचंद्र जगदेव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. समाजाप्रति असलेल्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करणाऱ्या व्यक्तींचा हा गौरव युवापिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिल कुवर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुरेंद्र कुवर, राजू अहिरे, संजय कुवर, गणेश कुवर, आकाश कुवर, विजय कुवर यांच्यासह सिद्धार्थनगरमधील रहिवासी उपस्थित होते. कार्यक्रमात माता रमाईंच्या त्यागाचा वारसा पुढे नेण्याचा आणि समाजाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

## शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी आता १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत

**नंदुरबार** : शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय वसतिगृहांमध्ये २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेशासाठी आता मुदतवाढ देण्यात आली असून, व्यावसायिक व बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग, अनाथ, दिव्यांग, आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आता १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक सुंदरसिंग वसावे यांनी दिली.

जिल्ह्यातील मुलांचे एक व मुलींचे एक, अशा दोन शासकीय वसतिगृहांसाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेसाठी वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ऑनलाईन अर्ज ६ ते १५ फेब्रुवारीदरम्यान भरता येईल. १६ ते १८ फेब्रुवारीदरम्यान अर्जांची छाननी, तर २० फेब्रुवारीला प्रथम निवड यादी प्रसिद्ध होईल. निवड यादीनुसार प्रवेश घेण्याची अंतिम मुदत २६ फेब्रुवारी असेल.

पात्र विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://hmas.mahait.org या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत आणि आवश्यक कागदपत्रे संबंधित वसतिगृहाचे गृहपाल किंवा कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडे जमा करणे अनिवार्य आहे. जिल्ह्यातील बारावीनंतर उच्चशिक्षण घेणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी शहरातील टोकरतलाव रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनातील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक संचालक वसावे यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांनो, परीक्षेची भीती, न्यूनगंड बाळगू नका

### प्राचार्या पाटील : शहाद्यातील पाटील महाविद्यालयात निरोप कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ९ फेब्रुवारी**

परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी पुरेशी झोप, योग्य आहार घ्यावा. फास्ट फूड, बाहेरचे उघड्यावरील अन्नपदार्थ खाणे टाळावे. परीक्षेची कोणतीही भीती, न्यूनगंड मनात बाळगू नये. परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे, असे आवाहन प्राचार्या सुरेखा पाटील यांनी केले.

येथील (कै.) सौ. जी. एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालय व शेठ व्ही. के. शहा विद्यालयातील दहावी व बारावीच्या विद्यार्थांना निरोप व कॉपीमुक्त परीक्षेची शपथ देण्यात आली. त्या वेळी प्राचार्या पाटील बोलत होत्या. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सूचनेनुसार सर्व परीक्षा केंद्रांत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराला थारा मिळणार नाही. पालकांनीही परीक्षा काळात पाल्यावर अतिरिक्त ओझे देऊ नये, पाल्य ताणतणावमुक्त राहण्यासाठी घरातील वातावरण आनंदी ठेवावे. त्यांना मानसिक आधार द्यावा. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या वेळेपूर्वी केंद्रात उपस्थित राहणे स्पष्ट केले. या परीक्षा केंद्रात बारावीचे विविध शाळांतील, शाखांतील एकूण एक हजार ५४८ विद्यार्थी प्रविष्ट होत आहेत. या वेळी उपमुख्याध्यापक एस. आर. जाधव, उपप्राचार्य पी. बी. पटेल आदींसह विविध विभागप्रमुख उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त परीक्षेची शपथ घेतली.

## शहाद्यात वाहनाच्या प्रखर प्रकाशामुळे कारला अपघात

### तरुणीचा जागीच मृत्यू; तिघे जखमी

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ९ फेब्रुवारी**

तालुक्यातील म्हसावद- शहादा रस्त्यावर नवलपूर गावाजवळ पहाटे झालेल्या भीषण अपघातात २२ वर्षीय तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. समोरून येणाऱ्या वाहनाच्या प्रखर प्रकाशामुळे चालकाचा ताबा सुटल्याने कार पुलाजवळील दगडी खांबाला धडकल्याने हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (८ फेब्रुवारी) पहाटे साडेचारच्या सुमारास सोनवणे कुटुंब कारने प्रवास करत होते. म्हसावद ते शहादा रस्त्यावरील नवलपूर गावाच्या अलीकडे असलेल्या हनुमान मंदिराजवळील पुलापाशी कार आली असता, समोरून येणाऱ्या एका वाहनाचा प्रखर प्रकाश चालकाच्या डोळ्यावर पडला. यामुळे चालकाला रस्ता स्पष्ट न दिसल्याने कार रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडी खुणेला (मैलाचा दगड/खांब) जाऊन जोरात धडकली. या भीषण धडकेत कारमधील लक्ष्मी संजय सोनवणे (वय २२, रा. कुबेरनगर, म्हसावद) गंभीर जखमी होऊन तिचा जागीच मृत्यू झाला. तसेच कारमधील इतर तीन प्रवासी जखमी झाले आहेत. यात संजय मच्छिंद्र सोनवणे (वय ५५), मनीषा संजय सोनवणे (वय ३) व हर्षली संजय सोनवणे यांचा समावेश आहे.

या प्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता कलम १०६ (१), २८१, १२५ (बी) आणि मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश वावरे तपास करीत आहेत.

## म्हसावदमध्ये रिक्षा उलटून भीषण अपघात; मायलेकीचा जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ९ फेब्रुवारी**

भरधाव रिक्षा उलटल्याने झालेल्या भीषण अपघातात ३५ वर्षीय महिला आणि तीनवर्षीय चिमुकलीचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना म्हसावद गावात घडली. समाधान हॉटेलसमोर रविवारी (८ फेब्रुवारी) दुपारी तीनच्या सुमारास हा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, शहादा तालुक्यातील नांदे येथील रहिवासी अंतर बारसिंग पवार (वय ४०) हे रिक्षा (एमएच ३९, बी ३०७२) घेऊन चिखली फाटा ते राणीपूर फाटादरम्यान जात होते. समाधान हॉटेलजवळ आले असता, चालकाचे रिक्षावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव रिक्षा रस्त्याच्या कडेला जाऊन उलटली. अपघातात रिक्षामध्ये बसलेल्या दोन व्यक्तींचा गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला. यात चालकाची पत्नी हिनाबाई अंतर पवार (वय ३५) व चालकाच्या भावाची मुलगी जयश्री कालूसिंग पवार (वय ३) यांचा समावेश आहे.

याप्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्याचे कर्मचारी प्रवीण मधुकर पवार यांनी फिर्याद दिली. चालकाने रिक्षा भरधाव वेगात चालवून स्वतःच्या पत्नीच्या आणि पुतणीच्या मरणास कारणीभूत ठरल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार सुनील बागुल तपास करीत आहेत. या घटनेमुळे नांदे परिसरात शोककळा पसरली असून, वेगावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.




## एसटी बसच्या धडकेत तरुण ठार

### म्हसावद पोलिसांत चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ९ फेब्रुवारी**

रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव बस चालवून दुचाकीला समोरून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू झाला असून, एकजण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात म्हसावद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राणीपूर-साबलापाणी रस्त्यावरील वळणावर घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (७ फेब्रुवारी) सायंकाळी सहाच्या सुमारास रोहित रामा वास्कले (रा. राखीबुजुर्ग, ता. पानसेमल, जि. बडवाणी) आणि दिवान रूपसिंग मोरे (रा. सापखडकी, ता. पानसेमल) हे दोघे दुचाकीने (एमपी ४६, एमएच ४३०६) जात होते. दरम्यान, साबलापाणी गावाच्या पुढे रस्त्यावरील वळणावर समोरून येणाऱ्या एसटी बसने (एमएच २०, बीएल-२५९६) त्यांना जोरदार धडक दिली. धडकेत रोहित रामा वास्कले या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. दुचाकीचालक दिवान रूपसिंग मोरे गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातात दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे.

या प्रकरणी मृताचे वडील ठाणसिंग रामा वास्कले यांच्या फिर्यादीवरून एसटी बसचालक सुनील पांडुरंग पाटील (रा. नागझिरी, ता. शहादा, ह. मु. लोणखेडा) याच्याविरुद्ध म्हसावद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार नीलेश पाटील तपास करीत आहेत.

# टी-२० विश्वचषकाचा थरार




## महत्त्वाचे

### जम्मू-काश्मीर संघाने घडविला इतिहास



**इंदूर :** जम्मू काश्मीरने चौथ्या दिवशी मध्य प्रदेशवर ५६ धावांनी विजय नोंदवून प्रथमच प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. रणजी ट्रॉफीमध्ये पदार्पण केल्याच्या ६७ वर्षांनंतर आणि शेवटच्या वेळी बाद फेरीत पोहोचल्यानंतर सहा वर्षांनी, जम्मू आणि काश्मीरने इंदूरमध्ये मध्य प्रदेशवर ५६ धावांनी विजय मिळवून आपल्या पहिल्या उपांत्य फेरीत प्रवेश करत इतिहास रचला. या विजयात अकीब नबीने महत्त्वाची भूमिका बजावली, त्याने सामन्यात ११० धावांत १२ बळी घेऊन हा ऐतिहासिक विजय निश्चित केला. या रणजी करंडकात सर्वाधिक बळी घेणाऱ्या पहिल्या पाच गोलंदाजांच्या यादीतील एकमेव वेगवान गोलंदाज असलेल्या नबीने या हंगामातील आपली बळींची संख्या ४६ पर्यंत नेली आहे. तो ५२ बळी घेणाऱ्या उत्तराखंडच्या मयंक मिश्रानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२४-२५ च्या रणजी हंगामाच्या सुरुवातीपासून नबीने आतापर्यंत अविश्वसनीय ९७ प्रथम-श्रेणी बळी घेतले आहेत. मध्य प्रदेशने चौथ्या दिवसाची सुरुवात ५ बाद ८७ धावांवरून केली होती आणि विजयासाठी त्यांना आणखी २०४ धावांची गरज होती, परंतु पहिल्या अर्ध्या तासातच उपकर्णधार व्यंकटेश अय्यरची विकेट गमावल्याने त्यांना मोठा धक्का बसला. त्यानंतर अष्टपैलू खेळाडू सारांश जैनने ६४ धावांची वेगवान खेळी करत संघाच्या आशा कायम ठेवल्या आणि शुभम शर्मा व रामवीर गुर्जर यांच्यासोबत काही महत्त्वपूर्ण धावांची भागीदारी केली.

### बंगालचा ६२९ धावांचा डोंगर, आंध्र २७० धावांनी पिछाडीवर

**कल्याणी :** येथे सुरू असलेल्या रणजी करंडकाच्या तिसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात चौथ्या दिवशी आंध्र प्रदेशच्या २९५ धावांच्या प्रत्युत्तरात बंगालने १९९.१ षटकांत सर्वबाद ६२९ धावांचा डोंगर उभा केला. याबरोबरच बंगालने पहिल्या डावांत ३३४ धावांची भक्कम आघाडी मिळविली. दिवस अखेर आंध्र प्रदेशने २४ षटकांत ३ बाद ६४ धावा केल्या असून ते अजून २७० धावांनी पिछाडीवर आहे. उद्या सामन्याचा शेवटचा दिवस असून बंगालला डावाने विजय मिळविण्यासाठी तसेच उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित करण्यासाठी आंध्र प्रदेशला पिछाडी भरून काढण्याआधीच त्यांच्या उर्वरित सात फलंदाजांना झटपट बाद करणे आवश्यक आहे. बंगालच्या धावांच्या डोंगरात सुदीप कुमार घरामीने ५९६ चेंडूंत २९९ धावांचे योगदान दिले, यात त्याने ३१ चौकार व ६ षट्कार हाणले. सुमंता गुप्ता (८१), हबीब गांधी (९६) व मोहम्मद शमी (५३) यांनीही भरीव योगदान दिले.

### नेमबाज संभाजी पाटीलचा भीषण अपघातात मृत्यू

**मुंबई :** पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पालघर जिल्ह्यातील मनोरजवळ झालेल्या भीषण अपघातात आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी २७ वर्षीय शिवाजी पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. मनोरजवळील दुर्वेश गावाच्या हद्दीत त्यांची भरधाव फॉर्च्युनर कार एका अवजड वाहनावर पाठीमागून आदळल्याने हा अपघात झाला. ही धडक इतकी भीषण होती की कारचा पुढचा भाग अक्षरशः चेंदामेंदा झाला. या दुर्घटनेत संभाजी पाटील यांनी प्राण गमावले असून, त्यांचा सहकारी यश प्रशांत चौधरी हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील पालघर येथील दुर्वेश गावाच्या हद्दीत सकाळी १० वाजताच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. मित्र प्रणय प्रशांत चौधरी याने आपली भरधाव कार दुसऱ्या मार्गिकेतून पहिल्या मार्गिकेत घेताना समोरच्या हायवा ट्रकचा अंदाज न आल्याने ही जोरदार धडक बसली. या दुर्घटनेत संभाजी पाटील यांनी प्राण गमावले.

### कोहली, रोहितचा ब श्रेणीमध्ये समावेश

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सोमवारी २०२५-२६ हंगामासाठी वरिष्ठ पुरुष आणि महिला संघांसाठी वार्षिक खेळाडू करारांची घोषणा केली. तीस वरिष्ठ पुरुष क्रिकेटपटूंना केंद्रीय करार देण्यात आले, तर बीसीसीआयने ए-प्लस श्रेणी रद्द केली आहे. शिवाय, कसोटी आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेले भारताचे माजी कर्णधार विराट कोहली आणि रोहित शर्माला यादीत ब श्रेणी मध्ये स्थान देण्यात आले आहे. कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिल, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा हे पुरुषांच्या केंद्रीय करारांच्या यादीत अ श्रेणीमध्ये असलेले एकमेव खेळाडू आहेत.

## स्कॉटलंडचा इटलीवर ७३ धावांनी विजय

### अष्टपैलू मायकेल लीस्क सामनावीर

**कोलकाता, ९ फेब्रुवारी**

जॉर्ज मुन्सीच्या ५४ चेंडूंतील ८४ धावा, ब्रँडन मॅकमलेन व मायकल लीस्कच्या उपयुक्त खेळींची साथ, आणि त्यानंतर लीस्कच्या चार बळींच्या कामगिरीमुळे स्कॉटलंडने आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत इटलीचा त्यांच्या पदार्पणातील सामन्यात ७३ धावांनी पराभव केला. ५ चेंडूंत नाबाद २२ धावांची खेळी व १७ धावांत ४ बळी टिपणारा अष्टपैलू मायकेल लिस्क सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.



मायकेल लीस्क सामनावीर

इटलीने नाणेफेक जिंकून स्कॉटलंडला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. स्कॉटलंडच्या ४ बाद २०७ धावांना प्रत्युत्तर देताना इटलीचा संपूर्ण संघ १६.४ षटकांत १३४ धावांतच गारद झाला.

गत वेळी टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात इटलीविरुद्ध खेळताना स्कॉटलंडला जरी काहीसा धक्का बसला असला तरी, ईडन गार्डन्सवरच्या प्रभावी कामगिरीनंतर त्यांनी २०२६ च्या टी-२० विश्वचषक मोहिमेतील पहिले गुण मिळवले. दोन दिवसांपूर्वी कोलकाता येथे वेस्ट इंडीजकडून झालेल्या पराभवानंतर स्कॉटलंडने इटलावर ७३ धावांनी विजय मिळविल. या विजयाबरोबरच त्यांनी दोन गुणांची कमाई केली.

जॉर्ज मुन्सी स्कॉटलंडचा सर्वाधिक धावा काढणारा जॉर्ज मुन्सीने ५४ चेंडूंत १३ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने ८४ धावांची खेळी केली. मुन्सीने मायकेल जोन्स (३७) याच्यासोबत १२६ धावांची सलामी भागीदारी करून स्कॉटलंडच्या डावाची चांगली सुरुवात केली.

८४ धावांच्या कामगिरी बरोबरच जॉर्ज मुन्सी स्कॉटलंडकडून सर्वाधिक धावा काढणारा फलंदाज ठरला. मुन्सीने एकूण २४०५ धावा केल्या असून त्याने बेरिंग्टनच्या २३९२ धावांच्या विक्रमाला मागे टाकले.

पुढे ब्रँडन मॅकमुलेनने कर्णधार रिची बेरिंग्टन (१५), टॉम ब्रुस (१) व मायकल लिस्कच्या (नाबाद २२) साथीने स्कॉटलंडला २० षकांत ४ बाद २०७ धावांची नोंद करून दिली. ब्रँडनने १८ चेंडूंत ४ षट्कारांच्या मदतीने नाबाद ४१ धावांची खेळी केली.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना सलामीवीर जस्टीन मोस्का भोपळा न फोडताच बाद झाला, परंतु त्यानंतर ॲन्थोनी मोस्का (१३), जे. जे. स्मिट्स (२२), हॅरी मनेंटी (३७) व बेन मनेनीने (५२) संयमाने फलंदाजी करत संघाच्या विजयाचा आशा जीवंत ठेवल्या, परंतु तळाच्या फळीतील फलंदाज स्कॉटलंडच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरू शकले नाही आणि त्यांचा डाव १६.४ षटकांत १३४ धावांतच आटोपला.

स्कॉलंडकडून अष्टपैलू मायकेल लिस्कने १७ धावंत ४ बळी टिपले. मार्क वॅटने २ बळी, तर ब्रॅड करी, ब्रॅड व्हील व ऑलिव्हर डेव्हिडसनने प्रत्येकी एक बळी टिपला.

## नेदरलॅण्डचा सामना नामिबियाशी

**नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत गट अ मध्ये मंगळवारी नेदरलॅण्ड व नामिबिया यांच्यादरम्यान साखळी सामना खेळल्या जाणार आहे. पाकिस्तानला कडवी झुंज दिल्यानंतर नेदरलॅण्ड संघ धोकादायक असलेल्या नामिबियाविरुद्ध आपल्या क्षमतेची कसोटी लावेल.

आपण उच्च मानांकित प्रतिस्पर्धी संघांना अडचणीत आणू शकतो, हे नेदरलॅण्ड संघाने अलीकडेच पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातून दाखवून दिले. या सामन्यातून आत्मविश्वास घेत नेदरलॅण्ड संघ नवी दिल्लीत दाखल झाला आहे.आता ते आफ्रिकन संघ - नामिबियाविरुद्ध खेळताना त्या आत्मविश्वासाचे रूपांतर गुणांमध्ये करण्याचा प्रयत्न करेल.

याउलट, नामिबिया आपला अभियान एका अनुभवी संघाविरुद्ध सुरू करत आहे. परंतु नामिबियाच्या निसटत्या पराभवाने त्यांच्या काही कमकुवत बाजू देखील उघड झाल्या आहेत.

नेदरलॅण्डसाठी, पाकिस्तानविरुद्ध केलेल्या १४७ धावा एकाच खेळाडूच्या प्रभावी कामगिरीवर आधारित नसून, अनेक खेळाडूंच्या विखुरलेल्या योगदानावर उभारल्या होत्या.

स्कॉट एडवर्ड्सच्या ३७ धावांनी डावाला आधार दिला, तर बास डी लीड (३०) व कॉलिन ॲकरमनने (१४ चेंडूत २०) मधल्या षटकांमध्ये गती दिली. आमच्याकडे प्रमुख फलंदाजांच्या पलीकडे जाऊन गोलंदाजी आक्रमणाला आव्हान देण्याची क्षमता आहे, हे नेदरलॅण्ड संघाने दाखवून दिले आहे.




नामिबियाचा कर्णधार गेरहार्ड इरास्मस — नेदरलॅण्डचा कर्णधार स्कॉट एडवर्ड्स

नामिबियाच्या वैविध्यपूर्ण पण कमी अनुभवी गोलंदाजी आक्रमणासमोर, मधल्या षटकांचा तो टप्पा पुन्हा एकदा सामन्याचा निकाल ठरवू शकतो.

अनुभवी गेरहार्ड इरास्मसच्या नेतृत्वाखालील नामिबिया संघात युवा खेळाडू आणि अनुभवी खेळाडूंचा मिलाफ आहे, ज्यांनी विश्वचषकांमध्ये आपल्या क्षमतेपेक्षा सरस कामगिरी करण्याची सवय लावली आहे. इरास्मस, जॅन फ्रायलिंक आणि जेजे स्मिट हे एक मजबूत अष्टपैलू त्रिकूट असून ते फलंदाजी व गोलंदाजी दोन्हीने सामन्यांना कलाटणी देण्यास सक्षम आहेत. फ्रायलिंकची डावखुरी वेगवान गोलंदाजी आणि स्मिटची वैविध्यपूर्ण गोलंदाजी नवी दिल्लीच्या खेळपट्ट्यांवर विशेषतः उपयुक्त ठरू शकतात.

फलंदाजीच्या बाबतीत नामिबिया लॉरेन स्टिनकॅम्प व मालन क्रुगर यांच्याकडून वरच्या फळीत स्थैर्याची अपेक्षा करेल, तर यष्टिरक्षक झेन ग्रीन मधल्या फळीची जबाबदारी सांभाळेल.

जेसी बाल्ट व डिलन लीचरसारख्या युवा फलंदाजांच्या उपस्थितीमुळे संघात अनिश्चितता येते. गोलंदाजी ही नामिबियाची पारंपरिक ताकद राहिली आहे. रुबेन ट्रम्पेलमन व बर्नार्ड शॉल्ट्झसारखे अनुभवी गोलंदाज आहे.

### आजचे सामने

**कॅनडा वि. दक्षिण आफ्रिका**
**स्थळ :** नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून

**नामिबिया वि. नेदरलॅण्ड**
**स्थळ :** अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ :** सकाळी ११.०० वाजतापासून

**न्यूझीलंड वि. युएई**
**स्थळ :** एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून

**पाकिस्तान वि. अमेरिका**
**स्थळ :** सिंहली स्पोर्ट्स क्लब स्टेडियम, कोलंबो
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

## न्यूझीलंडचे अव्वल स्थान मजबूत करण्याचे लक्ष्य

**चेन्नई, ९ फेब्रुवारी**

न्यूझीलंडचा संघ मंगळवारी येथे टी-२० विश्वचषक सामन्यात संयुक्त अरब अमिरातीचा (यूएई) सामना करताना सलग दुसऱ्या विजयासह ड गटातील आपले अव्वल स्थान मजबूत करण्यास उत्सुक असेल.

न्यूझीलंडने रविवारी अफगाणिस्तानवर पाच गडी राखून विजय मिळवून महत्त्वाचे दोन गुण मिळवले, आणि आता तुलनेने सोप्या प्रतिस्पर्ध्याविरुद्धच्या सामन्यात आपल्या कामगिरीचा पुरेपूर फायदा घेण्याचा त्यांचा प्रयत्न असेल.

अफगाणिस्तानविरुद्धच्या विजयाने न्यूझीलंडच्या अनुभवी फलंदाजी फळीची उपयुक्तता दाखवून दिली. संथ खेळपट्टीवर १८३ धावांचा पाठलाग करताना १४ धावांवर दोन गडी गमावल्यानंतर त्यांनी प्रभावीपणे डाव सावरला.

परंतु मिचेल सॅण्टनरच्या नेतृत्वाखालील संघाला त्यांच्या फलंदाजीतील दोन महत्त्वाचे खेळाडू, फिन ॲलन व रचिन रवींद्रकडून आत्मविश्वास वाढवणारी कामगिरी अपेक्षित असेल.




न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सॅण्टनर — यूएईचा कर्णधार मोहम्मद वसीम

ॲलन व रवींद्र गत सामन्यात मुजीब उर रहमानच्या फिरकीच्या जाळ्यात अडकले होते, परंतु यूएईकडे तशाच दर्जाचे गोलंदाज नाहीत. त्यामुळे, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यापूर्वी हे दोन्ही आघाडीचे फलंदाज आखाती संघाविरुद्ध मोठी धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न करतील.

परंतु अफगाणिस्तानविरुद्धच्या न्यूझीलंडच्या विजयातील एक दिलासादायक बाब म्हणजे मुजीबच्या दुहेरी धक्क्यांनंतर डाव सावरताना ग्लेन फिलिप्सने दाखवलेली परिपक्वता.

फिलिप्स लय कायम ठेवण्यासाठी आणखी एक चांगली खेळी खेळेल, अशी न्यूझीलंडला आशा आहे.

यूएईच्या संघात कर्णधार मोहम्मद वसीम, आक्रमक फलंदाज अलीशान शराफू आणि अनुभवी वेगवान गोलंदाज जुनैद सिद्दीकी यांसारखे काही अनुभवी खेळाडू आहेत.

वसीमने केवळ ८४ डावांमध्ये ३००० टी-२० आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या. तो विराट कोहली व बाबर आझम यांच्यापेक्षा थोडाच मागे आहे.

सामन्याचा निकाल बऱ्यापैकी अपेक्षित असला तरी, यूएईचे खेळाडू न्यूझीलंडसारख्या दिग्गज संघाविरुद्ध खेळण्याच्या अनुभवातून शिकण्याची संधी साधतील. हाच त्यांच्यासाठी सर्वात मोठा फायदा असेल.

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
www.tarunbharat.net
वर भेट द्या!

## पाकने घेतली अमेरिकेची धास्ती

**कोलंबो, ९ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी पाकिस्तान आणि अमेरिका यांच्यादम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

नेदरलॅण्डविरुद्ध विजय मिळविताना पाकिस्तानला बराच संघर्ष करावा लागला. पाकिस्तान संघाला २० महिन्यांपूर्वी अमेरिकेकडून अपमानास्पद पराभव पत्करावा लागला होता, या पराभवाचा वचपा काढण्याचा आणि भुतकाळातील कटूस्मृतीला मूठमाती देण्याचा पाकिस्तानचा संघ प्रयत्न करेल.

२०२४ च्या विश्वचषकातील पदार्पणात अमेरिकेने पाकिस्तानी संघावर संस्मरणीय विजय मिळवून मोठ्या मंचावर आपल्या आगमनाची घोषणा केली होती.

२०२६ च्या सलामीच्या सामन्यात भारताकडून पराभव पत्करल्यानंतर अमेरिका संघ येथील सिंहली स्पोर्ट्स क्लबमध्ये सायंकाळच्या सामन्यात पाकिस्तानविरुद्ध त्याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्यासाठी अधिक प्रेरित असेल.




सलमान अली आगा — कर्णधार मोनांक पटेल

दोन्ही संघांना फलंदाजीच्या आघाडीवर खूप काम करायचे आहे.

नेदरलॅण्डविरुद्ध १४८ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ सहजपणे पुढे जात होता, पण त्यानंतर मधल्या फळीतील फलंदाजांनी आत्मघातकी खेळ केला. फहीम अश्रफमुळे त्यांना विजय मिळवता आला, पण या पडझडीमुळे संघ पूर्णपणे हादरला असेल.

वानखेडे स्टेडियमवर अमेरिकेने गतविजेत्या भारतावर दबाव आणला होता, परंतु त्यांच्या फलंदाजांना प्रभावी गोलंदाजीच्या कामगिरीला साथ देता आली नाही.

पाकिस्तानच्या पुनरागमन केलेल्या बाबर आझमवर सर्वांचे लक्ष असेल. सलामीवीर सईम अयुबकडूनही फलंदाजीत अधिक योगदानाची अपेक्षा असेल. अयुबने अलीकडच्या काळात फिरकी गोलंदाज म्हणून अधिक चांगली कामगिरी केली आहे.

पाकिस्तानच्या खेळाडूंनी नेदरलॅण्डविरुद्धच्या सामन्यापेक्षा दबावाला अधिक चांगल्या प्रकारे हाताळण्याची गरज आहे, असे कर्णधार सलमान अली आगाला वाटते.

### कर्नाटकने केले मुंबईला बाहेर

**मुंबई :** वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधील शरद पवार अकादमीमध्ये झालेल्या रणजी करंडक उपांत्यपूर्व सामन्यात के.एल. राहुलच्या १३० धावांच्या सर्वोच्च खेळीच्या जोरावर कर्नाटकने ३२५ धावांचे मोठे लक्ष्य गाठून मुंबईला स्पर्धेतून बाहेर केले.



कर्नाटकचा सामना १५ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या उपांत्य फेरीत प्रथमच सहभागी झालेल्या उत्तराखंड संघाशी होईल. पहिल्या डावांत मुंबईच्या १२० धावांच्या प्रत्युत्तरात कर्नाटकने १७३ धावा काढल्या आणि ५३ धावांची आघाडी घेतली. मुंबईने दुसऱ्या डावांत ३७७ धावा काढून कर्नाटक समोर विजयासाठी ३२५ धावांचे लक्ष्य ठेवले. कर्नाटकने चौथ्या दिवशी ७३.४ षटकांत ६ बाद ३२५ धावा केल्या. केएल राहुलने १८२ चेंडूंत १४ चौकार व एका षट्कारसह १३० धावांची विजयी खेळी केली.

## नक्वी सामन्यासाठी शरीफ यांची परवानगी घेणार

**कराची, ९ फेब्रुवारी**

पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी हे बांगलादेश क्रिकेट मंडळाच्या त्यांच्या समकक्षांनी केलेल्या विनंतीनंतर, भारतासोबतच्या टी-२० विश्वचषक सामन्यावरील बहिष्कार मागे घेण्यासाठी त्यांचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना विनंती करणार आहेत, अशी माहिती पीसीबीच्या एका सूत्राने दिली आहे. नक्वी सोमवारी नंतर या विषयावरील नवीनतम घडामोडींची माहिती शरीफ यांना देणार आहेत. भारतासोबतचा हा सामना १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणार आहे. नक्वी पंतप्रधान शरीफ यांना बांगलादेश, श्रीलंका आणि अमिराती क्रिकेट मंडळासोबत व आयसीसीसोबत झालेल्या संवादाबद्दल माहिती देतील, असे सूत्राने सांगितले.

बांगलादेश क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष अमीन उल इस्लाम हे रविवारी आयसीसीचे उपाध्यक्ष आणि स्वतंत्र संचालक इम्रान ख्वाजा यांच्यासोबत नक्वी यांनी केलेल्या चर्चेसाठी लाहोरमध्ये उपस्थित होते.

## आयपीएलनंतर काशीमध्ये होणार रिंकू-प्रियाचा विवाह सोहळा

**नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

क्रिकेटपटू रिंकू सिंग व सपा खासदार प्रिया सरोज याच वर्षी जूनमध्ये विवाहबंधनात अडकणार आहे. दोघांचा विवाहसोहळा काशीमध्ये होणार आहे.



गत वर्षी ८ जून रोजी लखनौमध्ये रिंकू आणि प्रियाचा साखरपुडा झाला होता. त्यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये लग्नाची तारीख निश्चित झाली होती. पण, लग्न होऊ शकले नव्हते. त्यानंतर फेब्रुवारी २०२६ ची तारीख ठरली होती. पण टी-२० विश्वचषक आणि आयपीएलमुळे आता ते जूनसाठी नियोजित करण्यात आले आहे.

विवाहासाठी आधी ११ व १२ जूनच्या तारखांवर चर्चा झाली होती, पण क्रिकेटच्या व्यस्ततेमुळे रिंकूने नवीन तारीख काढायला सांगितली आहे. २६ मार्च ते ३१ मे दरम्यान प्रस्तावित आहे. जेव्हा रिंकू मधून मोकळा होईल, तेव्हाच सनई वाजेल. लग्न काशीमध्ये होईल आणि स्वागत समारंभ अलीगढमध्ये ठेवले जाईल, असे रिंकूचे मोठे भाऊ सोनू सिंह यांनी सांगितले.

## झिम्बाब्वेचा ओमानवर ८ गड्यांनी एकतर्फी विजय

**कोलंबो, ९ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत येथे खेळल्या गेलेल्या ब गटाच्या साखळी सामन्यात अनुभवी झिम्बाब्वेने ओमानवर ३९ चेंडू शिल्लक ठेवित ८ गड्यांनी एकतर्फी विजय नोंदविला. १६ धावांत ३ बळी टिपणारा झिम्बाब्वेचा ब्लेसिंग मुझारबानीला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



ब्रायन बेनिटची नाबाद ८४ धावांची विजयी खेळी

झिबाब्वेने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला व ओमान संघाला १९.५ षटकांत १०३ धावांत गुंडाळले. त्यानंतर १३.३ षटकांत ३ गडी गमावित १०६ धावा काढून आपला विजय साकार केला. झिम्बाब्वेच्या गोलंदाजांनी प्रभावी मारा करत ओमनच्या फलंदाजांना झटपट बाद करून आपल्या फलंदाजांसाठी, परिणामी संघासाठी विजय सोपा केला. रिचर्ड नागरवा, ब्लेसिंग मुझारबानी व ब्रॅड इव्हान्सने प्रत्येकी ३ बळी घेतले, तर सिकंदर रझाने एक बळी घेतला आणि ओमना संघाला १०३ धावांत बाद केले. ओमानकडून सुफियान मेहमूद (२६), विनायक शुक्ला (२८) व नदीम खान (२०) हे तिघेच दोन अंकी धावा काढू शकले, तर इतर फलंदाज एक अंकी धावेवरच बाद झालेत.

झिम्बाब्वेला विजय मिळवून देताना सलामीवीर ब्रायन बेनिटने एकाकी झुंज देत नाबाद ४८ धावांची विजयी खेळी केली. त्याला तडीवनाशे मारुमणी (२१) व ब्रेंडन टेलरची (जखमी निवृत्त, ३१ धावा) व कर्णधार सिकंदर रझाची (नाबाद ५) उत्तम साथ मिळाली.

## सूर्याच्या शांत नेतृत्वामुळे काम सोपे : गंभीर

**नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

कर्णधार म्हणून प्रत्येक बाबतीत सरस असलेल्या सूर्यकुमार यादवच्या 'शांत नेतृत्वामुळे' टी-२० फॉरमॅटमध्ये माझे उच्च-दबावाचे काम थोडे सोपे झाले आहे, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर म्हणाले.

सध्या सुरू असलेल्या टी-२० विश्वचषकासाठी भारताला या धडाकेबाज खेळाडूच्या रूपात सूर्यकुमार यादवसारखा कर्णधार मिळाल्याने संघ भाग्यवान आहे, असेही ते म्हणाले.

या फॉरमॅटमध्ये सूर्याने माझे आयुष्य खूप सोपे केले आहे. तो खेळाडूंचा एक विलक्षण नेता आहे, मैदानावरील त्याच्या कामगिरीमुळे नाही, किंवा तो फलंदाज म्हणून कसा आहे किंवा या फॉरमॅटमध्ये त्याचे फटके कसे आहेत यामुळे नाही, तर त्याचे शांतपणे नेतृत्व कमालीचे आहे, असे गंभीर म्हणाले.




"त्या सर्व गोष्टी तुम्ही बाजूला ठेवू शकता, पण तो ज्या प्रकारे खेळाडूंशी संवाद साधतो, ज्या प्रकारे तो खेळाडूंशी बोलतो, ज्या प्रकारे तो खेळाडूंसोबत वेळ घालवतो, तो मैदानात किती शांत असतो. कधीकधी प्रशिक्षक म्हणून, तुम्ही इतर अनेक गोष्टींचा विचार करू शकता, कारण तुम्हाला माहित आहे की तो वातावरण खूप शांत ठेवणार आहे, जे कोणत्याही प्रशिक्षकाचे स्वप्न असू शकते," असे ते पुढे म्हणाले.

भारताने शनिवारी या स्पर्धेतील आपल्या पहिल्या सामन्यात अमेरिकेचा पराभव केला, यात सूर्यकुमारने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्याने ४९ चेंडूत ८४ धावांची खेळी करून एका जिगरबाज प्रतिस्पर्ध्याविरुद्ध आघाडीच्या फळी कोसळल्यानंतर संघाला सावरले. भारत आता गुरुवारी येथे नामिबियाविरुद्ध खेळणार आहे.

सूर्यकुमारने कर्णधार म्हणून, माझ्या मते त्याने प्रत्येक बाबतीत स्वतःला सिद्ध केले आहे. तो एक विलक्षण नेता आहे, त्यामुळे माझे आयुष्य खूप सोपे झाले आहे, याचा त्यांनी पुनरूच्चार केला.

दोन वर्षांपूर्वी टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग असलेल्या ३५ वर्षीय सूर्यकुमारने, रोहित शर्माने आंतरराष्ट्रीय स्तरावर टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर काही आठवड्यांतच कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतली होती.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**E-Tender Specification No:-** CE(C)-II/KRD/Tech/T-19/3000065400/2025-26.

**Name of work:** 2x660 MW Replacement Project - Work of construction of new Pre-fabricated STP 2 Nos. (20 KLD & 10 KLD) along with sewer pipeline & its allied works.

| | |
|---|---|
| **Estimated Cost :** Rs. 56,78,562.95 | **Time Limit:** 06 (Six) Month (Including monsoon period) |
| **Issue Period : -** 10.02.2026 to 17.02.2026 upto 17.30 Hrs | **Last Date of Submission –** 18.02.2026 upto 15.00 Hrs |
| **Tender Fee:** Rs. 1180.00 Rs. One Thousand One Hundred Eighty only. (By E-Payment) | **E.M.D.-** Rs. 56,800.00 (By E-Payment/RTGS/NEFT) |

**Contact Person:** Dy. Chief Engineer (Civil), O/o Chief Engineer (C) - II, M.S.P.G.C.L., Koradi. Tel. No.:- 8408889213, **E-mail** : cgmcivil2@mahagenco.in

*For further details visit our website :* **www.eprocurement.mahagenco.in.**
Agencies are requested to register themselves for future E-Tender.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### नाट्यलेखक, दिग्दर्शक सोमण यांची नगरवाचन मंदिरास भेट

**चोपडा :** येथील तालुका वाचनालय नगर वाचन मंदिरास नाट्य लेखक, दिग्दर्शक व सिने कलावंत योगेश सोमण यांनी सदिच्छा भेट दिली. व्याख्यानमालेप्रसंगी सोमण यांना येणे शक्य झाले नाही, परंतु त्यांनी आवर्जून भेट देत संस्थेच्या शतकोत्तर कार्याचा गौरव केला. त्यांच्या लिखीत पुस्तकांसह वंदेमातरमच्या सार्धशती निमित्ताने नॅशनल बुक ट्रस्ट दिल्लीने काढलेल्या आनंदमठ या कादंबरीचा मराठी अनुवाद भेट म्हणून दिला. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष आशिष गुजराथी यांनी सोमण यांचा सत्कार केला. यावेळी कार्यवाह गोविंद गुजराथी, संचालक श्रीकांत नेवे, प्रभाकर महाजन, केंद्रप्रमुख संजिव शेटे, ग्रंथपाल गोपाळ दांडेकर आदि उपस्थित होते.




### भूगोल विभागातर्फे बारीपाडा, मांगी-तुंगी येथे शैक्षणिक सहल

**चाळीसगाव :** भारत सरकार पद्मश्री पुरस्कार प्राप्त चैत्राम पवार यांच्या बारीपाडा येथे भेट देण्याची संधी चाळीसगाव बी.पी आर्ट्स महाविद्यालयातील भूगोल विभागातील विद्यार्थ्यांना मिळाली. तेथील रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रोजेक्ट, बांबूची लागवड, मोहाची फुले, विविध औषधी वनस्पती तसेच सुमारे अकराशे एकर परिसरात लोकसहभागातून उभारलेली पर्यावरणपूरक कामे पाहून सर्वांना प्रेरणा मिळाली. या प्रकल्पांची माहिती मार्गदर्शक दीपक पवार यांनी दिली. जैन धर्माचे पवित्र धार्मिक स्थळ असलेल्या मांगी-तुंगी येथे अनेकांनी मोठ्या जिद्दीने वरपर्यंत चढाई करून भगवान ऋषभदेवांचे दर्शन घेतले. या सहलीच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. मिलिंद बिल्दीकर, उपप्राचार्य डॉ. अजय काटे, डॉ. पूनम निकम, भूगोल विभाग प्रमुख डॉ. विजय बाविस्कर, डॉ. व्ही. डी. चौधरी, डॉ. के. डी. पाटील तसेच अर्थशास्त्र विभागाच्या प्रा. रहिले, कार्यालयीन प्रमुख हिंमत अंदोरे, सौरभ त्रिभुवन यांनी प्रशासकीय सहकार्य केले.

### नगरदेवळा येथे आधार केंद्र अखेर कार्यान्वित

**नगरदेवळा (ता. पाचोरा) :** नगरदेवळा येथील नागरिकांसाठी नगरदेवळा गावात आधार कार्ड केंद्र सुरू करण्यात आले आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून आधार केंद्र नसल्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीचा सामना करावा लागत होता. नगरदेवळा गावात एकही नियमित आधार केंद्र कार्यरत नव्हते. यामुळे नागरिकांना आधार नोंदणी, अपडेट, दुरुस्ती यासाठी पाचोरा, भडगाव किंवा चाळीसगाव येथे जावे लागत होते. माहिती अधिकार कार्यकर्ता इंद्रनील भामरे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा तसेच १० फेब्रुवारी २०२६ पासून आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आल्यानंतर प्रशासनाकडून आज नगरदेवळा येथे आधार केंद्र सुरू करण्यात आले आधार केंद्र सुरू झाल्यामुळे शेतकरी, महिला, वृद्ध, दिव्यांग, विद्यार्थी व गरीब नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाकडून कायमस्वरूपी आणि पुरेशा संख्येने आधार केंद्रांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, "उपोषणाची वेळ येण्याआधीच प्रशासनाने निर्णय घेतला, ही बाब स्वागतार्ह असली तरी भविष्यात नागरिकांना आंदोलन करावे लागू नये यासाठी स्थायी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे," असे मत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे.



### सारजाई कुडे- बालकवी विद्यालयाचे उत्कृष्ट प्रदर्शन

**धरणगाव :** जळगाव येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय हरित सेना वन विभाग जळगाव मार्फत घेण्यात आलेल्या पर्यावरण पूरक प्रदर्शनी मध्ये सा. दा.कुडे व बालकवी ठोंबरे विद्यालयाचे विद्यार्थी हर्षल दीपक भावसार व पायल आनंद फुलपगार या विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला. सहभागाबद्दल प्रमाणपत्र व स्कूल बॅग बक्षीस मिळाले.तसेच इको क्लब मार्फत चालवण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये शाळांना सुद्धा पारितोषिक वितरित करण्यात आले. त्यात सा.दा. कुडे विद्यालयाला दहा हजारांचे बक्षीस मिळणार आहे.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हेमलालशेठ भटिया, उपाध्यक्ष चिंतामण पाटील, सचिव ललित उपासनी सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक एस एस पाटील, मुख्याध्यापक जीवन पाटील व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले. सहभागी विद्यार्थ्यांना किशोर चौधरी, अनिल पाटील , किरण पाटील, यांनी मार्गदर्शन केले.



### डांभुर्णी येथे अजित पवार यांना श्रद्धांजली

**डांभुर्णी (ता. यावल) :** येथील ग्रामपंचायत समोर आज सकाळी आठ वाजेच्या सुमारात गावातील नागरिकांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी ग्रामपंचायत सरपंच कल्पना बाविस्कर यांचे हस्ते अजित पवार यांच्या प्रतिमेचे माल्यार्पण व पूजन करण्यात आले. प्रसंगी भगवान बाविस्कर, व बाळासाहेब चौधरी, नीता साठे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बाळासाहेब शेनफडू चौधरी, विठ्ठल कुंभार, सुरेश फालक, कांचन फालक, यतीन चौधरी, अनिल साठे, सचिन किरंगे, देवानंद फालक, ताराचंद फालक, समाधान कोळी, शरद साठे, हिरालाल कोळी, निबाजी पाटील, भानुदास यादनिक, सुरेश वाणी, राजेश चौधरी, पुरुषोत्तम सोनवणे, दत्तात्रय सोनवणे, सदाशिव साठे, किशोर पाटील, भारती साठे, मधुकर पाटील, छोटू पाटीलसह आदी उपस्थित होते.



### दादाजी धुनिवाले पालखीचे फैजपूरला स्वागत

**फैजपूर :** दादाजी धुनिवाले दरबार पायी पालखी चोपडा ते खंडवा जाणाऱ्या पायी पालखीचे सुभाष चौक फैजपूर येथे दादाजी धुनिवाले सत्संग परिवार भाविकांनी भक्तिमय जल्लोषात स्वागत करून आशीर्वाद घेतले. याप्रसंगी पूजा, आरती शुभम वैद्य यांनी केले. श्रीकांत फेंगडे, सुभाष वैद्य, राजेंद्र वैद्य, चंद्रकांत कोळी, पप्पू वैद्य, राजाभाऊ चौधरी, संजय सराफ, दादाजी धुनिवाले सत्संगी परिवार भाविक मोठया संख्येने सहभागी झाले होते.

# रस्ते, पाणी अन् भुईकोट किल्ल्यासाठी आमदार अमोल पाटील यांचा 'मास्टर प्लॅन'

## पारोळ्यात १५ कोटींच्या कामांचे भूमिपूजन; किल्ल्यासाठी १५ कोटींचा विशेष निधी प्रस्तावित

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, ९ फेब्रुवारी**

शहराच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी आणि शहराला आधुनिक विकासाची जोड देण्यासाठी आमदार अमोल पाटील यांनी विशेष 'मास्टर प्लॅन' आखला आहे. आमदार पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्व. मिनाताई ठाकरे व्यापारी संकुलात १५ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी पारोळ्याच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची ग्वाही त्यांनी दिली.

नगरपालिका प्रशासन शहरातील नागरिकांच्या हितासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर आहे. शहरात उद्भवणाऱ्या अडीअडचणींचे निराकरण करून विकासाची फळे सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम पालिकेच्या माध्यमातून वेगाने केले जाईल असे नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सांगीतले.



**नगरपालिका प्रशासनाचे कौतुक**
शहरातील विविध विकासकामांचा आढावा घेताना नागरिकांना येणाऱ्या समस्यांबाबत पालिकेने जी चपळता व 'चणूक' दाखविली, त्याबद्दल आमदार अमोल पाटील यांनी नगरपालिका प्रशासनाचे विशेष कौतुक केले.

**असा आहे विकासाचा आराखडा**

रस्त्यांचे जाळे : शहरातील रस्त्यांसाठी १५० कोटींचा डीपीआर तयार असून तो मंजुरीसाठी शासन स्तरावर पाठवण्यात आला आहे.

ऐतिहासिक वारसा : ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या मजबुतीकरणासाठी आणि परिसरात सुसज्ज उद्यान निर्मितीसाठी पुरातत्व विभागाकडे १५ कोटींच्या निधीचा प्रस्ताव पाठवला आहे.

स्वच्छता व आरोग्य : जलवाहिनी आणि भूमिगत गटारींचे काम पूर्ण करून शहराची आरोग्य व्यवस्था भक्कम करण्यावर भर दिला जाणार आहे.

**यांची होती उपस्थिती**

या सोहळ्याला मुख्याधिकारी तुषार नेरकर, उपनगराध्यक्ष ॲड. रोहन मोरे, स्वच्छता व आरोग्य सभापती डॉ. मंगेश तांबे, क्रीडा सभापती भूषण टिपरे, शिवसेना तालुकाप्रमुख मधुकर पाटील, नगरसेवक अमृत चौधरी, पंकज मराठे, नितीन सोनार, दीपक अनुष्ठान, मनोज जगदाळे, अशोक वाणी, रमेश मिस्तरी, प्रमोद कासार, दगडू पवार, विवेक पाटील, धीरज महाजन, सुदाम चौधरी, अमोल शिरोळे, विनोद पाटील, नरेंद्र पाटील, नजीरखान बेलदार, मनीष पाटील, राजेंद्र पाटील, राजेंद्र कासार, गोपाळ दाणेज, देवगावचे सरपंच समीर पाटील, मोहम्मद मास्टर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोकाट पशुधनांच्या प्रश्नावर विहिंप, बजरंग दल आक्रमक

## कारवाईची मागणीसाठी प्रशासनाला निवेदन

**अमळनेर :** शहर व परिसरात मोकाट पशुधनामुळे निर्माण झालेल्या गंभीर समस्येबाबत विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, अमळनेर प्रखंडाच्या वतीने प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी करण्यात आली. यासंदर्भात पोलिस प्रशासन व नगर परिषद यांना निवेदन देण्यात आले.

शहरात सार्वजनिक रस्त्यांवर वाहतुकीस अडथळे, अपघात आणि नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी गायी रस्त्यावरच पिल्लांना जन्म देत असल्याचे प्रकार घडत असून त्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम तसेच नगरपालिका अधिनियमनुसार सार्वजनिक ठिकाणी उपद्रव निर्माण करणाऱ्या मोकाट पशुधनावर कारवाई करणे बंधनकारक आहे. तसेच Cattle Trespass Act, 1871 नुसार मोकाट पशुधन पकडून अधिकृत कोंडवाड्यात ठेवण्याची तरतूद आहे. असे असतानाही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सार्वजनिक सूचना देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात त्वरित निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

**गोविंद' चित्रपटाच्या प्रदर्शनाची मागणी**
दरम्यान, ६ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झालेल्या 'गोविंद' या चित्रपटाचे अमळनेरमध्ये प्रदर्शन करण्यात यावे, अशी मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, अमळनेर प्रखंडाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात एस. एस. सिनेप्लेक्स, अमळनेर यांना निवेदन देण्यात आले. 'गोविंद' हा चित्रपट सत्य घटनांवर आधारित असून गो-संरक्षणासाठी बलिदान दिलेल्या हिंदू संतांच्या जीवनकार्यावर आधारित आहे. अमळनेर व परिसरातील नागरिकांना हा चित्रपट पाहण्याची संधी मिळावी, यासाठी शहरातील प्रमुख चित्रपटगृहात सदर चित्रपट प्रदर्शित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. चित्रपटास प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून अमळनेरमध्येही प्रदर्शन झाल्यास तो प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. याबाबत सिनेप्लेक्स प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.

# कुरंगीजवळील 'गिरणा'त वाळू उपसा बंद

## महसूल विभागाने जेसीबीव्दारे नदीपात्रात रस्त्यात चर खोदला

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, ९ फेब्रुवारी**

तालुक्यात गिरणा पट्ट्यातून होणाऱ्या बेकायदेशीर वाळू उपशाविरोधात महसूल विभागाकडून आक्रमक पावले उचलण्यात आली आहेत. कुरंगी येथील गिरणा नदीपात्रातून ट्रॅक्टरच्या साहाय्याने होणारी अनधिकृत वाळू वाहतूक रोखण्यासाठी महसूल पथकाने मुख्य रस्त्यांवर जेसीबीच्या साहाय्याने कोणतेही वाहन जाऊ शकणार नाही, असे खोल चर खोदले आहेत. या धडक कारवाईमुळे सद्यस्थितीत नदीपात्रातील वाळू वाहतूक पूर्णपणे बंद झाली असून, गिरणा पात्राचे पावित्र्य जपण्याच्या या निर्णयाचे ग्रामस्थांकडून स्वागत होत आहे.

**वाळू माफियांना रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाय**

गेल्या काही दिवसांपासून कुरंगी परिसरातून अवैधरित्या वाळूची वाहतूक सुरू होती. केवळ अवैध वाळू वाहतूकीची वाहने पकडण्याऐवजी वाळू चोरट्यांचे मार्गच बंद करण्यासाठी नांद्रा मंडळ अधिकारी वैशाली पाटील आणि कुरंगी तलाठी जिज्ञासा पाटील यांनी पुढाकार घेत महसूल विभागाच्या पथकाच्या सहाय्याने जेसीबीव्दारे नदीपात्राकडे जाणाऱ्या चोरट्या रस्त्यांवर खोल प्रमाणात चर (खड्डे) खोदून वाहनांना प्रवेश बंदी केली आहे.

**महसूल विभागाचा कडक पवित्रा**

या कारवाईमुळे वाळू चोरट्यांना आता नदीपात्रात वाहने नेणे अशक्य झाले आहे. महसूल विभागाच्या या नियोजनबद्ध कृतीमुळे अवैध वाळू उपशावर मोठा वचक बसला आहे. 'नदीपात्राचे नुकसान करणाऱ्यांवर आमची करडी नजर असून, अवैध वाहतूक रोखण्यासाठी यापुढेही अशाच उपाययोजना केल्या जातील,' असा इशारा महसूल प्रशासनाकडून देण्यात आला आहे. या मोहिमेत महसूल विभागाचे कर्मचारी आणि ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. चाऱ्या मारल्यामुळे गिरणा नदीपात्रातील पर्यावरणाचे रक्षण होण्यास मोठी मदत होणार आहे.



वारंवार होत असलेल्या अवैध वाळू वाहतूकीच्या तक्रारींना आळा घालण्यासाठी आम्ही या कुरंगी येथील गिरणा नदीपात्रात जे.सि.बी.च्या सहाय्याने चाऱ्या मारल्याने तूर्तास तरी वाळू वाहतूक बंद झालेली आहे. स्थानिक दक्षता समितींनीही महसुल विभागाला सहकार्य करावे.

**- वैशाली पाटील**
**मंडळ अधिकारी, नांद्रा ता. पाचोरा.**

# इंदिरा गांधी, आदर्श विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

## बक्षीस वितरण, कॉपीमुक्ती शपथ अन् समई भेट

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, ९ फेब्रुवारी**

इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व आदर्श माध्यमिक विद्यालय, धरणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. या समारंभात विद्यार्थ्यांना निरोप देताना वर्षभरात झालेल्या विविध शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे बक्षीस वितरण, कॉपीमुक्तीची शपथ तसेच कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून समई भेट देण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आदर्श माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष व इंदिरा गांधी विद्यालयाचे सचिव सी. के. पाटील, प्रमुख पाहुणे आदर्श विद्यालयाच्या सचिव व इंदिरा गांधी विद्यालयाच्या प्राचार्या सुरेखा पाटील उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थितीत आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे, इंदिरा गांधी विद्यालयाचे पर्यवेक्षक ए. एस. पाटील, माजी पर्यवेक्षक आर. एस. पडोळ तसेच सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षक एन. बी. पाटील यांचा समावेश होता.



प्रास्ताविक उपशिक्षिका ज्योती चौधरी, प्रमुख पाहुण्यांचा परिचय उपशिक्षक शशिकांत पाटील यांनी केले. वर्षभरात शालेय, तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे व बक्षिसे प्रदान करण्यात आली.

समारंभात विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान प्रामाणिकपणा व शिस्त पाळण्याचा निर्धार करत कॉपीमुक्त परीक्षेची शपथ देण्यात आली. डिंपल जावरे, वैष्णवी महाजन, अक्षदा इंगळे, उज्ज्वला धामोडे, आकांक्षा गुंजाळ, मिलिंद कोल्हे, चैताली सयाजी, जान्हवी पाटील व मिताली चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी आदर्श माध्यमिक विद्यालयाच्या दहावीच्या वर्गशिक्षिका वैशाली पाटील व विद्यार्थ्यांनी विद्यालयाला समई भेट दिली. आर. एस. पडोळ, ए. एस. पाटील व संदीपकुमार सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. सी. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी संस्कार, मूल्ये व सकारात्मक दृष्टिकोन यांचा कानमंत्र दिला.

सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक किरण चव्हाण यांनी केले, आभार ज्येष्ठ शिक्षिका किर्ती मराठे यांनी मानले.

# कॅन्सरला रोखण्यासाठी रोटरीचे 'सुरक्षा कवच'

## पारोळा येथील २०० महिलांची मोफत आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, ९ फेब्रुवारी**

महिलांच्या आरोग्याविषयीची सामाजिक बांधिलकी जपत, पारोळा शहर रोटरी क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत कर्करोग निदान शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बोहरा सेंट्रल स्कूलमध्ये संपन्न झालेल्या या शिबिरात शहरासह परिसरातील ४० ते ६० वयोगटातील सुमारे २०० महिलांनी आपली आरोग्य तपासणी करून घेत या 'सुरक्षा कवचा'चा लाभ घेतला.

वाढत्या कर्करोगाच्या धोक्याला वेळीच रोखण्यासाठी हे शिबिर अत्यंत महत्त्वाचे ठरले. विशेष म्हणजे, गुजरात मधील नवसारी येथील अलीपोरे हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉ. रेखाबेन पटेल आणि त्यांच्या नर्सिंग टीमने या शिबिरात सेवा दिली. महिलांमध्ये प्रामुख्याने आढळणाऱ्या स्तन कर्करोग आणि गर्भाशय कर्करोगाच्या निदानासाठी आधुनिक व अद्ययावत मशिनरीचा वापर करण्यात आला, ज्यामुळे अचूक तपासणी शक्य झाली.

शिबिराचा शुभारंभ मृणाल अमोल पाटील यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला. यावेळी नगरसेविका किरण पाटील, ॲड. कृतिका आफ्रे, अल्फा गुजराती, तृप्ती बोहरा, डॉ. सोनम बोहरा आणि डॉ. नम्रता बोहरा उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात मृणाल पाटील यांनी सांगितले की, अशा प्रकारचे प्रगत तंत्रज्ञान असलेले शिबिर पारोळ्यात प्रथमच होत आहे. महिलांनी स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ काढून तपासणी करणे हे कौतुकास्पद असून, रोटरी क्लबचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

यशस्वीतेसाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष सुरेंद्र बोहरा, सचिव जगदीश आफ्रे, खजिनदार मुकेश गुजराती यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांना डॉ. सुरेश पाटील, डॉ. सचिन करोडपती, डॉ. संभाजी पाटील, डॉ. विलय शहा, डॉ. उमेश पाटील, डॉ. गौरव बोहरा, डॉ. धीरज पाटील या वैद्यकीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

शरद वाणी, संदेश वाणी, विशाल पाटील, बी.जी. पाटील, योगेश वाणी, गणेश बिचवे व सुनील भालेराव यांनी सक्रिय सहभाग नोंदवत शिबिराचे नेटके नियोजन केले.




**शहरातून कौतुकाचा वर्षाव**
अत्यंत जटिल मानल्या जाणाऱ्या आजारांची मोफत आणि आधुनिक पद्धतीने तपासणी झाल्यामुळे सहभागी महिलांनी समाधान व्यक्त केले आहे. रोटरी क्लबच्या या उपक्रमामुळे कर्करोग जनजागृतीच्या मोहिमेला बळ मिळाले असून, उपक्रमाचे मृणाल पाटील, किरण पाटील, ॲड. कृतिका आफ्रे यांनी कौतुक केले आहे.

# अमळनेर येथे महिलेवर मुस्लिम युवकाचा अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, ९ फेब्रुवारी**

रेल्वेत भीक मागणाऱ्या महिलेवर अमानुष अत्याचार केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी ( ६ फेब्रुवारी) धार जवळील एका प्रार्थनास्थळाच्या मागील रस्त्यावरील झोपडीत घडली. या प्रकरणी आकिबखान गफ्फारखान (रा. कसली मोहल्ला, अमळनेर) याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मध्यप्रदेशातील २८ वर्षीय पीडिता रेल्वेत भीक मागून उदरनिर्वाह करीत होती. अमळनेर येथे तिची संशयित आरोपी आकिबखान याच्याशी ओळख झाली. त्यानंतर दोघांमध्ये वारंवार भेटी झाल्या. संशयित तरुण प्रत्येक वेळी पीडित महिलेस जेवण व पैसे देत असल्याचे तपासातातून समोर आले आहे.

शुक्रवारी सकाळी साडे नऊच्या सुमारास पीडिता बऱ्हाणपूरहून रेल्वेतून धार येथे आली असता संशयित आरोपीने तिला उतरवून घेतले. त्यानंतर मोटारसायकलवरून (एमएच-११, डीजे-२१५५) ने मित्रासह तिला धार जवळील एका प्रार्थनास्थळाच्या परिसरात नेले. मागील बाजुच्या रस्त्यावर असलेल्या पत्र्याच्या झोपडीत संशयिताने मद्यपान करून पीडितेकडून शरीरसुखाची मागणी केली. पीडितेने नकार दिल्यानंतर आरोपीने तिला मारहाण करून जबरदस्तीने अत्याचार केला. त्यानंतर तिला पुन्हा रेल्वे स्थानकावर आणून सोडून दिले. पीडितेने अमळनेर पोलिसांशी संपर्क साधून घडलेला प्रकार सांगितला.

घटनास्थळ मध्य प्रदेशातील मारवड पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने पीडितेच्या फिर्यादीवरून अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते तपास करीत आहेत.




### प्रा. डॉ. उमेश पाटील यांना 'बेस्ट रिसर्च पेपर ॲवॉर्ड

**रावेर :** येथील श्री. व्ही. एस. नाईक महाविद्यालयाचे प्रा. डॉ. उमेश पाटील यांना 'बेस्ट रिसर्च पेपर ॲवॉर्ड प्रदान करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व श्रीसंत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीयस्तरावरील क्रीडाविषयक परिषदेत डॉ. उमेश पाटील यांनी सादर केलेल्या संशोधन पेपरला 'बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. फिजिकल एज्यु. फाउंडेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. पीयूष जैन, उस्मानिया विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत राठोड, उस्मानिया विद्यापीठचे डॉ. राजेश कुमार, डॉ. नीरज जैन, द्रोणाचार्य पुरस्कार विजेते सुनील कुमार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रावेर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष हेमंत नाईक, प्राचार्य डॉ. अनील पाटील, डॉ. प्रतीक नाईक व खेळाडूंनी अभिनंदन केले.

# तामसवाडी आरोग्य केंद्रात ७७ रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, ९ फेब्रुवारी**

जागतिक कर्करोग दिनानिमित्त राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तामसवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. स्वप्नील सांगळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष उपक्रम 'कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन'द्वारे तपासणी शिबिर पार पडले.

या शिबिरात परिसरातील एकूण ७७ रुग्णांची सखोल तपासणी करण्यात आली. त्यापैकी एका संशयास्पद रुग्णाची मौखिक कर्करोगाच्या निदानासाठी जागीच बायोप्सी करण्यात आली आहे.

यावेळी पारोळा कुटीर रुग्णालयाचे दंत शल्यचिकित्सक डॉ. प्रशांत सोनवणे, तामसवाडी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतन करोडपती यांनी रुग्णांची वैद्यकीय तपासणी केली. तपासणीसोबतच कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम यावर उपस्थित रुग्णांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.




**वेळेत निदान, हाच बचाव**
ग्रामीण भागातील रुग्णांना कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे निदान आपल्या गावातच मिळावे, या उद्देशाने ही 'कॅन्सर व्हॅन' कार्यान्वित करण्यात आली आहे. आजच्या शिबिरात संशयास्पद वाटणाऱ्या एका रुग्णाची बायोप्सी घेण्यात आल्याने, वेळेत उपचार मिळण्यास मदत होणार आहे. या यशस्वी उपक्रमाबद्दल तामसवाडी आणि परिसरातील ग्रामस्थांनी आरोग्य विभागाचे आभार मानले आहेत.

जळगाव
तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com




# आपलं महानगर



## महत्त्वाचे

### मुलीस पळवून नेले

**जळगाव** : घरात मुलगी एकटीच असल्याची संधी हेरत संशयिताने अमिष दाखवून १७ वर्षीय मुलीस पळवून नेले. शनिवारी (७ फेब्रुवारी) रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास ही घटना धरणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाळधी खु. येथे घडली. कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला असता मुलीचा तपास लागला नाही. तक्रारीनुसार याप्रकरणी रविवारी (८ फेब्रुवारी) धरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक फौजदार सुनील लोहार हे तपास करीत आहेत.

### अनोळखी आढळला अत्यवस्थ

**जळगाव** : अंदाजे ५५ ते ६० वर्षीय अनोळखी पुरुष अत्यवस्थ अवस्थेत सोमवारी (९ फेब्रुवारी) दुपारी शहरात आढळुन आला. प्रत्यक्षदर्शीनी संपर्क साधुन रुग्णवाहिका बोलविली. त्यानंतर अनोळखीला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविण्यात आले. अनोळखीची अद्याप ओळख पटलेली नाही.

### अपघातात सात जण जखमी

**जळगाव** : रस्ता अपघाताच्या वेगवेगळ्या घटनेत सात जण जखमी झाली. जखमींना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. नितेश बाबुराव पाटील (वय ३२,रा. कुसुंबा), सोनु चंद्रकांत पाटील (वय २४, बिबानगर), बापू राजपूत (वय ४०) नारायण प्रजापत (वय २१,दोन्ही रा. प्रजापतनगर), निलेश कारागिर (वय ३८,रा.आसोदा), कन्हैय्या विनोद पाटील (वय २४,रा.कुसुंबा) तसेच आनंद विलास माळी (वय २०,रा. जळगाव) यांचा जखमींमध्ये समावेश आहे. जखमींवर उपचार सुरू असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

### अनोळखी आढळला अत्यवस्थ

**जळगाव** : अंदाजे ५५ ते ६० वर्षीय अनोळखी पुरुष अत्यवस्थ अवस्थेत सोमवारी (९ फेब्रुवारी) दुपारी शहरात आढळुन आला. प्रत्यक्षदर्शीनी संपर्क साधुन रुग्णवाहिका बोलविली. त्यानंतर अनोळखीला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविण्यात आले. अनोळखीची अद्याप ओळख पटलेली नाही.

### गोलाणीजवळ वाहनाची धडक

**जळगाव** : शिवाजी महाराज पुतळा कोर्ट चौककडून चित्राकडे चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर गोलाणी मार्केट परिसरात नेहमी वर्दळ असते. हे दिसत असतानाही वाहनधारक सुसाट वाहने नेत असल्याने लहान मोठे अपघाताच्या घटना घडतात. मोपेडला एका वाहनाने धडक दिली. या घटनेत मोपेडवरील दोघांना दुखापत झाली नाही. मात्र वाहनाचे पुढील भागाचे नुकसान झाले. सोमवारी (९ फेब्रुवारी) दुपारी पावणे पाच वाजेच्या सुमारास ही घटना गोलाणी मार्केटजवळ घडली. धडक दिल्यानंतर चालक वाहन घेऊन पसार झाला. भरधाव वेगातील वाहनांमुळे याठिकाणी रस्ता क्रॉस करताना भयभीत होतात.

### नाट्यगृह मार्ग वाहनांनी व्यापला

**जळगाव** : येथील बालगंधर्व नाट्यगृह परिसरात मालवाहू वाहनांची वर्दळ वाढल्याने शाळकरी विद्यार्थी तसेच पादचाऱ्यांना कसरत करावी लागत आहे. नाट्यगृहाच्यामागे आणि समोरील मार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा लागतात. तसेच कोणत्याही मार्गावरुन वाहने येत असल्याचे अचानक अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिसरातील रहिवाश्यांनी याबद्दल तक्रार केली.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क - (०२५७)
२२३६१६६, २२२३६९९

अंकासाठी संपर्क
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९०२३३४५५५०
९६२३६०४७१२

# कॉपी गैरप्रकार आढळल्यास केंद्र संचालकांवर होणार कारवाई

## विद्यार्थ्यांनी तणावमुक्त, पारदर्शक वातावरणात परीक्षा द्यावी : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

जिल्ह्यात बारावीची परीक्षा मंगळवारपासून (१० फेब्रुवारी) सुरू होत आहे. परीक्षेत कॉपी गैरप्रकार आढळून आल्यास संबंधित परीक्षा केंद्र संचालकांवर प्रशासनातर्फे जबाबदारीनुसार कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले. परीक्षांच्या पार्श्वभूमिवर जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून, यंदाची परीक्षा पारदर्शक आणि कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी कडक नियमावली जाहीर करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती कक्षात सोमवारी (९ फेब्रुवारी) दुपारी साडेबाराच्या सुमारास दहावी-बारावीच्या परीक्षेच्या अनुषंगाने कॉपीमुक्त अभियान राबविण्याबाबत घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी माहिती दिली. जिल्ह्यात बारावीसाठी मंगळवारपासून (१० फेब्रुवारी) तसेच दहावीसाठी २० फेब्रुवारीपासून परीक्षा होत आहेत. २०२३-२४ आणि २०२४-२५ या काळातील परीक्षांमध्ये ज्या परीक्षा केंद्रात गैरमार्गाची प्रकरणे आढळून आली आहेत, अशा परीक्षा केंद्रांत केंद्र संचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती समाविष्ट असणाऱ्या शाळांतील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर अन्य शाळा व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्यात येणार आहे.

**जिल्ह्यात दोन उपद्रवी केंद्रे**

जिल्ह्यात कुसुंबा येथे दहावीचे आणि गोपीचंद पुना पाटील विद्यालय कोळगाव ता. भडगाव येथे बारावीचे असे प्रत्येकी एक उपद्रवी केंद्र आहेत. अशा संवेदनशील परिक्षा केंद्रावर ड्रोनच्या माध्यमातून कडक नजर ठेवण्यात येणार असून कॉपीसारखा गैरप्रकार आढळून आल्यास संबंधीत परीक्षा केंद्र संचालकांवर जबाबदारी निश्चितीसह कारवाई करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी तणावमुक्त आणि पारदर्शक वातावरणात परीक्षा द्यावी, तसेच पालकांनी देखील सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी घुगे यांनी केले आहे.

**प्रत्येक केंद्रात पूर्णवेळ बैठेपथक**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समितीच्या अध्यक्षांना त्यांच्या जिल्ह्यात दहावी व बारावी परीक्षा पारदर्शकपणे होण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे नियोजन करण्याची मुभा राहणार आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सदस्य सचिव दक्षता समिती, विभागीय मंडळे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समिती अध्यक्षांच्या सहकार्याने परीक्षा कालावधीत प्रत्येक केंद्रात पूर्णवेळ बैठेपथक कार्यरत राहणार आहेत.

**मोबाइलद्वारे लाइव्ह स्ट्रीमिंग**

ज्या केंद्रांवर सीसीटीव्ही नाहीत, तिथे प्रत्येक वर्गातील पर्यवेक्षक आपल्या मोबाइलद्वारे झूम मीटिंगला जॉईन होतील. यामुळे जिल्हा नियंत्रण कक्षातून प्रत्येक वर्गाचे लाइव्ह चित्रीकरण पाहता येईल. नाशिक विभागीय मंडळाची ९ भरारी पथके आणि जिल्ह्याची विशेष भरारी व बैठी पत्रके पथके केंद्रांना आकस्मिक भेटी देतील.

**पोलिस बंदोबस्त अन् गुन्हे दाखल**

परीक्षा केंद्रावर गैरप्रकार करणाऱ्यांवर किंवा त्यांना मदत करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामिनपात्र गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना**

परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर परिसरात सर्व झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद राहतील. अखंडित वीज पुरवठ्याची जबाबदारी महावितरणवर सोपवण्यात आली आहे. बाह्य उपद्रव टाळण्यासाठी प्रत्येक केंद्रावर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिली.

### बारावीसाठी ८२; दहावीसाठी १४७ केंद्रे

जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेसाठी ८२ केंद्रांत विद्यार्थी बैठक व्यवस्था असून, १७ परिरक्षक कार्यालये आहेत, तर दहावीच्या परीक्षेसाठी १४७ केंद्रे आणि १८ परिरक्षक कार्यालये आहेत.

### गैरप्रकार आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द होणार

फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या दहावी व बारावी परीक्षा काळात ज्या केंद्रांत गैरप्रकार प्रकरणे आढळून येतील, त्या केंद्रांची मान्यता कायमची रद्द करण्याची कार्यवाही होणार आहे.

### कॉपीमुक्त अभियानासाठी कडक पावले

ड्रोन आणि व्हिडिओ शूटिंग : उपद्रवी व संवेदनशील परीक्षा केंद्रांवर यंदा ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. तसेच परीक्षा केंद्राबाहेर व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येईल.

### बारावीच्या ८२ केंद्रांत ४८ हजार २३२ परीक्षार्थी

बारावी परीक्षेसाठी ८२ परीक्षा केंद्रांवर २७ हजार ३१८ मुले व २०९१४ मुली असे एकूण ४८ हजार २३२ परीक्षार्थी प्रविष्ट होणार आहे. त्यात विज्ञान शाखेसाठी २६८८४ परीक्षार्थी, कला शाखेसाठी १५५१४ परीक्षार्थी, वाणिज्य शाखेसाठी ४८११ परीक्षार्थी, असतील.व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ९७८ परीक्षार्थी, तर आयटीआय साठी ४५ परीक्षार्थी प्रविष्ट होणार आहेत.

### दहावीसाठी १४७ केंद्रांत ५९ हजार ४२० परीक्षार्थी

दहावीच्या २० फेब्रुवारीपासून होणाऱ्या परीक्षांसाठी १४७ परीक्षा केंद्रांवर ३३ हजार ६५३ मुले व २५ हजार ७६७ मुली असे एकूण ५९४२० परीक्षार्थी प्रविष्ट होणार आहेत.

# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर!

# 'लाल परी'तून होईल मोफत प्रवास

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

एस.टी.तून प्रवास करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रशासकीय स्तरावर झालेल्या चर्चेअंती सरकारी कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर असताना एसटी बसने मोफत प्रवास करण्यासह काही नवीन मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आले आहेत. या निर्णयाने सरकारी इंधन आणि भत्त्याच्या खर्चात बचत होईल. तसेच कामाला गती येईल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दुर्गम परिसरात सरकारी काम करण्यासाठी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांचा प्रवास सहज आणि सुलभ व्हावा, तसेच कामाचा दर्जा सुधारला जावा, या संकल्पनेतून हा निर्णय घेण्यात आल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले. जे कर्मचारी अधिकृत सरकारी कामांसाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करतात, त्यांनी ओळखपत्र दाखवल्यावर त्यांना लालपरी बसमधुन विनामूल्य किवा सवलतेच्या दरात प्रवास करता येणार आहे.

**खासगी वाहनांचा वापर कमी**

खासगी वाहनांचा वापर कमी करुन एसटीने प्रवास केल्यास सरकारी इंधन आणि भत्त्यात खर्च बचत होईल. तसेच ग्रामीण व डोंगरी भागात रेल्वे सुविधा नसल्याने एसटी हा एकमेव पर्याय असेल अशा ठिकाणी काम करणाऱ्या शिक्षक अंडी ग्रामसेवकांसाठी ही सवलत मोठा दिलासा देणार आहे. कर्मचाऱ्याच्या प्रवासाचा खर्च सरकार थेट महामंडळाला येणार असून एसटीच्या उत्पन्नातही भर पडणार आहे.




**वैयक्तीक कामात सवलत नाही**

सध्या ही सवलत साधी आणि एशियाड बससाठी विचारात घेतली जात आहे. शिवनेरी आणि शिवशाही यासारख्या वाहन वातानुकूलित बससाठी प्रवाशांना अतिरिक्त शुल्क भरावे लागू शकतात. तसेच त्या प्रवासांची वेगळे पैसे द्यावे लागतील. वैयक्तिक प्रवासासाठी ही सवलत नसून ही केवळ कार्यालयीन कामासाठी आहे. शिवाय वैयक्तिक अथवा कौटुंबिक प्रवावासाठी ही सवलत लागू नसेल. त्यासाठी पूर्ण तिकीटाचे पैसे अदा करावे लागतील.

काही विभागात प्रवासाची नोंद करण्यासाठी विशेश ट्रॅव्हल अवचर किंवा डिजिटल करण्याचा वापर बंधनकारक केला जाऊ शकतो. या निर्णयाने सरकारी कामाची गती वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ८ जानेवारी २६ रोजी झालेल्या प्रशासकीय स्तरावरील झालेल्या चर्चेत हा निर्णय शासनाने घेतला आहे.

**या कर्मचाऱ्यांना प्रथम प्राधान्य**

गृह विभाग, आरोग्य विभाग आणि महसूल विभागातील मैदानी स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना या योजनेत प्रथम प्राधान्य असणार आहे. काही जिल्ह्यांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी मासिक पास अथवा ड्युटी पास देण्याची तरतूद केली जात आहे. याचा खर्च संबंधित विभाग एसटी महामंडळाला घेतला येईल, अशा हेतून या पास देण्यात येणार आहेत.



### नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यास प्राथमिकता : महापौर दीपमाला काळे

**जळगाव** : निवड झाल्यानंतर आता थेट समस्या जाणून घेण्याला माझी प्राथमिकता आहे, म्हणूनच आज मी आपल्या प्रभागात उपस्थित आहे,अशा शब्दात महापौर दीपमाला काळे यांनी नागरिकांशी संवाद साधला. नगरसेवक आणि प्रशासन यांच्यात योग्य समन्वय ठेवून, निधीचा वापर करत या प्रभागाला आदर्श प्रभाग बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. महापालिकेची दारे नागरिकांसाठी सदैव उघडी असून तुमच्या सूचनांचे नेहमीच स्वागत असेल, अशी ग्वाही महापौर काळे यांनी दिली. शहरातील छत्रपती शिवाजीनगर भागातील इंद्रप्रस्थ नगर येथे संत श्री गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त नवनिर्वाचित महापौर दीपमाला काळे आणि उपमहापौर मनोज चौधरी यांच्या हस्ते श्रींची महाआरती आणि पालखी पूजन करण्यात आली. उपमहापौर मनोज चौधरी यांनी यावेळी शहर विकासाचा संकल्प बोलून दाखवला. या सोहळ्यात योगीराज श्री गजानन महाराज बहुद्देशीय संस्थेच्या वतीने नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर व मान्यवरांचा केशर बाग आणि इंद्रप्रस्थ नगर पंचक्रोशीतील नागरिकांच्या उपस्थितीत भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्रभाग १ च्या नगरसेविका संगीता दांडेकर, नगरसेवक ॲड. दिलीप पोकळे, जिल्हा सरकारी वकील सुरेंद्र काबरा, मनोज काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष संतोष चव्हाण, उपाध्यक्ष प्रवीण पाटील, सचिव गणेश शेळके यांच्यासह योगेंद्र पवार, नरेंद्र पाटील, मनोज कपाटे, राहुल पाथरवट, राजेश पाटील, डॉ. सोपान पाटील, सतीश भोसले, वैभव जैन, हर्षा भोसले, छाया पाटील, प्रिया थोरवे, सुरेखा चव्हाण, वैशाली पाटील, राजेंद्र बडगुजर, सतीश वाणी, प्रकाश शेवाळे यांसह अनेक भाविक आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.



### मेहरूण तलावाची पाहणी; सांडपाणी प्रश्न मार्गी लावण्याचे संकेत

#### गोसेवेने महापौरांच्या पहिल्या दिवसाची सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

नवनियुक्त महापौर दीपमाला काळे यांनी सोमवारी आपल्या पदभाराच्या पहिल्या दिवसाची सुरुवात गोसेवा करून केली. त्यानंतर महापालिकेत येऊन त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर महापालिकेतील विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांच्या बैठका घेत त्यांच्याशी ओळखपरिचय करून घेतला. कामकाजात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी प्रशासन आणि नगरसेवक यांच्यात योग्य समन्वय असणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

महापौर काळे यांनी कर्मचाऱ्यांना प्रलंबित कामांकडे तातडीने लक्ष देण्याच्या सूचना केल्या. तसेच नगरसेवकांनी मांडलेल्या विकासकामांना प्राधान्याने मार्गी लावावे, असेही त्यांनी सांगितले. नागरिकांना तत्पर सेवा देणे हे महापालिकेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, दुपारी चारच्या सुमारास महापौरांनी मेहरून तलाव परिसराला भेट देत येथील परिस्थितीची पाहणी केली. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सांडपाण्याच्या समस्येवर संबंधित विभागासोबत बैठक घेऊन योग्य निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. सांडपाणी तलावात जाणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असून तलावाचे पाणी स्वच्छ राखण्यावर भर दिला जाईल. परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही आवश्यक पावले उचलली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी गणेश घाटावर साचलेल्या कचऱ्याची साफसफाई करण्याचे आदेश देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रत्येक प्रभागात स्वच्छता राखली जावी यासाठी कर्मचाऱ्यांना विशेष सूचना दिल्या जातील. जळगाव शहर स्वच्छतेच्या बाबतीत आदर्श बनविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. मेहरून तलाव परिसराला पर्यटनाचा दर्जा मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार असून, आपल्या कार्यकाळात हा प्रस्ताव पूर्णत्वास जाईल, अशी अपेक्षा महापौर काळे यांनी व्यक्त केली.

### भरधाव कारची दुचाकीला धडक; प्रौढाचा मृत्यू

**जळगाव** : भरधाव कार आणत चालकाने मागुन दुचाकीला धडक दिली. या अपघातात डोक्याला गंभीर इजा होऊन आलोक प्रभाकर चौधरी (वय ४८, रा. भुसावळ) यांचा मृत्यू झाला. गुरुवारी (५ फेब्रुवारी) रात्री सव्वादहाच्या सुमारास चोपडा- यावल मार्गावर लोणी गावाजवळ ही घटना घडली. तक्रारीनुसार याप्रकरणी रविवारी (८ फेब्रुवारी) गुन्हा दाखल करण्यात आला. आलोक चौधरी हे दुचाकी (एमएच १९ एएल १५८६) ने चोपडाकडून यावलकडे जात होते. लोणी गावाजवळुन दुचाकी जात असताना मागवुन कार (एमपी ०९ सीवाय ८२८४) रक्ताच्या थारोळ्यात जखमी रस्त्यावर पडला होता. दुचाकीचे नुकसान झाले होते. मदत न करता चालक कार घेऊन फरार झाला. किरण वसंत चौधरी (वय ४३,रा. भुसावळ) यांनी याप्रकरणी तक्रार दिली. सहायक फौजदार सुनील तायडे तपास करीत आहेत.

### राष्ट्रीय महामार्गावरील समांतर रस्त्यासाठी अतिक्रमण हटविण्याची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

राष्ट्रीय महामार्गावरील मुलींच्या आयटीआय परिसरातून प्रस्तावित समांतर रस्त्याच्या कामासाठी अखेर अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने सोमवारी कारवाई करत काही हॉकर्सच्या गाड्या जप्त केल्या. या कारवाईमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून मुलींच्या आयटीआय येथून समांतर रस्त्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. मात्र या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर हॉकर्सनी अतिक्रमण केल्याने कामात अडथळा निर्माण होत होता. हा अडथळा दूर करण्यासाठी न्हाई प्रशासनाने महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाला संबंधित अतिक्रमणे काढण्याबाबत पत्र दिले होते. त्या अनुषंगाने तीन दिवसांपूर्वी अतिक्रमण निर्मूलन विभागाचे अधीक्षक संजय ठाकूर यांनी सुमारे ७० ते ७५ हॉकर्सना स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याच्या तोंडी सूचना दिल्या होत्या. प्रशासनाने दिलेल्या सूचनेनुसार काही हॉकर्सनी स्वयंस्फूर्तीने आपली गाडी व साहित्य हटविले. सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी अतिक्रमण निर्मूलन पथकाने प्रत्यक्ष कारवाई करत आयटीआय मुलींच्या वसतिगृहापासून ब्रेन हॉस्पिटलपर्यंतचा परिसर तपासला. यावेळी अनेक हॉकर्सनी सहकार्य करत अतिक्रमण स्वतः काढून घेतले. मात्र प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या ६ ते ७ हॉकर्सच्या गाड्या जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती अधीक्षक संजय ठाकूर यांनी दिली. या कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. समांतर रस्ता तयार झाल्यास वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. आगामी काळातही अतिक्रमणाविरुद्ध अशीच कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.




### जिल्ह्यात युवक-युवतींना उद्योजक होण्याची संधी

#### अनुदानाची सुविधा; खादी ग्रामोद्योग मंडळाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

शासनाच्या वतीने राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी स्वयंरोजगार व रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध केल्या आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही महत्त्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून ही योजना जिल्हा उद्योग केंद्र व खादी ग्रामोद्योग मंडळ यांच्या मार्फत प्रभावीपणे अंमलात आणली जात आहे. यामाध्यमातून नवउद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे.

**उद्योगासाठी एक कोटी रुपये**

या योजनेअंतर्गत पात्र उत्पादन व सेवा उद्योगांसाठी अर्ज करता येईल. उत्पादन उद्योगासाठी १ कोटी रुपये व सेवा उद्योगासाठी ५० लाख रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणार आहे. १८ वर्षे पूर्ण झालेले, कोणतेही स्थायी उत्पन्न नसलेले व यापूर्वी शासनाच्या कोणत्याही अनुदानाधारित स्वयंरोजगार योजनेचा लाभ न घेतलेले स्थानिक रहिवासी या योजनेसाठी पात्र आहेत. तसेच ठराविक मर्यादेपेक्षा अधिक प्रकल्प रकमेच्या उद्योगासाठी अर्जदार किमान आठवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**जिल्हा उद्योग केंद्रात मार्गदर्शन**

योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक अर्जदारांनी संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र / खादी ग्रामोद्योग मंडळ, सदगुरु एज्युकेशन सोसायटी इमारत, ख्वाजामिया चौक, जळगाव येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल. ही योजना तसेच कार्यालयाकडुन राबविण्यात येणाऱ्या योजनेसाठी कोणत्याही खाजगी व्यक्तीची नेमणुक केलेली नाही. जिल्ह्यातील अर्जदारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पोर्टलवर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा,असे आवाहन जळगाव जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी केले आहे.

**विविध व्यवसायांचा समावेश**

योजनेत उत्पादन, सेवा, कृषीपूरक व कृषीआधारित उद्योग, ई-वाहतूक, ब्रँडआधारित साखळी विक्री केंद्रे, फिरते खाद्यान्न केंद्र, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल-ढाबा, होम-स्टे, क्लाऊड किचन आदी उद्योगांचा समावेश आहे. अनुसूचित जाती-जमाती, महिला, इतर मागासवर्ग, दिव्यांग, माजी सैनिक, विमुक्त व भटक्या जमाती तसेच अल्पसंख्याक प्रवर्गातील अर्जदारांना शहरी भागासाठी २५ टक्के व ग्रामीण भागासाठी ३५ टक्के अनुदान देण्यात येणार असून, इतर प्रवर्गातील अर्जदारांना शहरी भागासाठी १५ टक्के व ग्रामीण भागासाठी २५ टक्के अनुदान मिळणार आहे.

### पैशांसाठी विवाहितेचा छळ

**जळगाव** : भाड्याचे घरासाठी दोन लाख रुपये माहेरुन घेऊन आणण्याची मागणी करत पतीसह सासरच्या चौघांनी २७ वर्षीय विवाहितेचा मानसिक शारिरीक झळ करत मारहाण केली. हा त्रास असह्य झाल्याने पीडितेने तक्रार दिली. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

एप्रिल२५ पासुन माहेरी जळगाव येथील भाड्याच्या घरात तसेच सासरी मासरुळ (ता.बुलढाणा) येथे विवाहिता राहत होती. तेव्हा पती निवृत्ती कोथलकर (रा.मासरुळ) यासासरे तसेच अन्य दोघांनी भाड्याच्या घरात भरण्यासाठी दोन लाख रुपये माहेरुण घेऊन आणण्याची मागणी विवाहितेकडे केली. पैसे विवाहितेने आणले नाही,याकारणावरुन पतीसह सासरच्या लोकांनी पीडितेसह तिच्या माहेरील लोकांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांनतर विवाहितेला मारहाण केली. शारीरिक मानसिक छळ केला. हा त्रास वाढल्याने पीडितेने पोलिसात कैफियत मांडली. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात पतीसह चौघांवर स्त्री अत्याचार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र उगले हे तपास करीत आहेत.

**एक लाखासाठी त्रास**

बैलजोडी तसेच गाडी घेण्यासाठी माहेरुन एक लाख रुपये घेऊन आणण्याची मागणी करत पतीसह सासरच्या आठ जणांनी ३५ वर्षीय विवाहितेचा मानसिक शारिरीक छळ केला. सासरी पांगरा (ता.कन्नड) तसेच माहेरी वाडे (भडगाव) येथे १३ मार्च २०१३ ते ६ जून २५ दरम्यान विवाहितेने सासरचा त्रास सहन केला. पीडितेच्या तक्रारीनुसार याप्रकरणी पती इंद्रराज महेर (रा. पांगरा) सह आठ जणांविरोधात भडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक फौजदार अनिल अहिरे हे तपास करीत आहेत.

**पीडितेला मारहाण अन् शिवीगाळ**

पतीसह सासु सासरे यांनी संगनमताने २५ वर्षीय विवाहितेला शिवीगाळ व मारहाण करीत छळ केला. ८ जानेवारी २४ पासुन ते १५ नोव्हेंबर २४ दरम्यान वेळोवेळी पीडितेला सासरी त्रास दिला. पती किर्तीराज पाटील तसेच सासु-सासरे (रा. विखरण) यांच्याविरुद्ध यावल येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# मान्सून समाधानकारक, तरी पाचशे गावांवर टंचाईचे सावट!

## जिल्हा प्रशासनाकडून सव्वापाच कोटींचा आराखडा मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

जिल्ह्यात २०२३ वगळता गेल्या चार-पाच वर्षांपासून मान्सून समाधानकारक आहे. त्यात २०२५ च्या मान्सूनमध्ये अतिवृष्टीमुळे नदी-नाल्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याने शेतीसह जनजीवन विस्कळित झाले होते. तसेच जिल्ह्यातील लहान-मोठ्या ९६ प्रकल्पांमध्ये सरासरी ७१ टक्के जलसाठा आहे. असे असले, तरी यावर्षी मार्चनंतर जळगाव जिल्ह्यात सुमारे पाचशेपेक्षा अधिक लहान-मोठ्या गावांना पाणीटंचाईचे सावट जाणवण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हा परिषद प्रशासनाने पाच कोटी २३ लाख ७० हजारांच्या अंतिम आराखड्याला मंजुरी दिली आहे.

जिल्ह्यात यावर्षी मान्सूनदरम्यान अतीवृष्टीमुळे १३ तालुक्यातील सुमारे अडीच लाख हेक्टर बाधीत झाले असले तरी यामुळे शेतशिवारातील भूजलपातळीत वाढ होण्यास मदत झाली आहे. तसेच ऑक्टोबर ते डिसेंबर अखेर जिल्हा प्रशासनाकडून संभाव्य पाणीटंचाई आराखडा पाहता बरीच गावे टंचाईपासून लांब आहेत.

### एप्रिल ते जूनदरम्यान टंचाईची शक्यता

२०२५ दरम्यान एप्रिलच्या तिसऱ्या सप्ताहात अमळनेर तालुक्यात डांगर बुद्रुक येथे दोन आणि भडगाव तालुक्यात तळबंद तांडा येथे एक अशा तीन टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला होता. त्यानुसार एप्रिल ते जून दरम्यान शेवटच्या टप्प्यात पाचोरा, पारोळा, अमळनेर आणि अतिदूर्गम डोंगराळ परिसरातील चोपडा आदी तालुक्यात पाणीटंचाईची शक्यता जिल्हा प्रशासनाने वर्तविली आहे.

**पाच कोटींच्या आराखड्यास मंजुरी**

जिल्हा परिषद पाणीपुरवठा प्रशासनाने पाणीटंचाई निवारण उपाययोजना आराखडा तयार केला आहे. यात खासगी विहिर अधिग्रहण अंतर्गत २ कोटी ११ लाख, टँकर वा बैलगाडीने पाणीपुरवठा १ कोटी ५ लाख, विंधन विहिरी वा कुपनलिकांसाठी १ कोटी ४० लाख अशा पाच कोटी २३ लाख ७० हजारांच्या आराखड्यास मंजुरी दिली.

**'गिरणा'मधून आवर्तनामुळे काही गावांना दिलासा**

असे असले तरी जिल्ह्यातील लहान मोठया वस्ती पाड्यांसह सुमारे १५०० गावांपैकी ५०६ गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार असल्याचा अंदाज प्रशासनाने वर्तविला आहे. त्यात पाचोरा चाळीसगाव, पारोळा अमळनेर आणि जामनेर आदी चार ते पाच तालुक्यांतील गावांचा समावेश आहे. जामनेर, पाचोरा, चाळीसगाव, पारोळासह अमळनेर तालुक्यापैकी चाळीसगाव तालुक्यात मन्याड आणि गिरणा प्रकल्पातून मिळणाऱ्या आवर्तनामुळे काही प्रमाणात टंचाई कमी होण्यास मदत होणार आहे.

### जलजीवन मिशनची कामे रखडली, टंचाईच्या गावांच्या संख्येत वाढ

तत्कालीन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अंकीत तसेच मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनातून जिल्ह्यात जलतारा तसेच जलजीवन मिशन अंतर्गत ४५० पेक्षा अधिक योजना कार्यान्वित झाल्या आहेत. त्यामुळे पाणी टंचाईवर काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. परंतु काही ठिकाणी मान्सूनपूर्व काळात व नंतर आतापर्यत जलजीवनची कामे रखडली असून अपूर्ण अवस्थेत असल्याने टंचाई जाणवणाऱ्या गावांच्या संख्या ५०० च्यावर पोचली आहे. ती कामे पूर्ण झाली असती, तरी पाणीटंचाई समस्येवर काही प्रमाणात मात करता आली असती.

# शिवजयंतीनिमित्त १८, १९ फेब्रुवारीला प्रशासनातर्फे जिल्हास्तरीय कार्यक्रम

## विविध सांस्कृतिक, शैक्षणिक अन् स्पर्धात्मक उपक्रमांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**



छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जिल्ह्यात १८ व १९ फेब्रुवारीला उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे वतीने दोन दिवसीय जिल्हास्तरीय कार्यक्रम होणार आहेत. यात विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व स्पर्धात्मक उपक्रमांचा समावेश असल्याची माहिती जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रमासंदर्भात आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी रोहन घुगे, महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण, माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी सकाळी प्रभात फेरी, त्यानंतर किल्ले बनविण्याची स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, पराक्रम, विचार व कार्य यांची ओळख करून देण्यात येणार आहे. यानुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचा संपूर्ण जीवनपट उलगडणारा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम व नाट्यप्रयोग छत्रपती संभाजीराजे नाट्यगृह जळगाव येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात नाट्य व सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंत कलाकार सहभागी होणार असून, शिवचरित्रावर आधारित सादरीकरणातून उपस्थितांना प्रेरणादायी अनुभव मिळणार आहे. किल्ले बनविण्याच्या स्पर्धेसाठी आवश्यक माती, बॅरिकेडिंग व मार्किंगची व्यवस्था तसेच चित्रकला स्पर्धेसाठी लागणाऱ्या कागदाची व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात येईल. मात्र, किल्ले सजावटीसाठी लागणारे साहित्य तसेच चित्रकलेसाठी आवश्यक रंग व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणणे अपेक्षित आहे. या सर्व स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देण्यात येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांचा जिल्हास्तरावर सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी विविध मान्यवरांना निमंत्रित करण्यात येत असून, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले. दरम्यान, विद्यार्थ्यांची नाव नोंदणी जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येणार असून, यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कल्पना चव्हाण यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सर्वांनी एकत्र येऊन शिस्तबद्ध, प्रेरणादायी व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मधुमेही रुग्णांनी पायाची अधिक काळजी घ्यावी

## डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील डॉ. हमदुल्ले यांचा सल्ला

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**



मधुमेह हा दीर्घकाळ चालणारा आजार असून त्यातून उद्भवणाऱ्या गंभीर गुंतागुंतींपैकी एक म्हणजे मधुमेही पाय (डायबेटीक फुट). मधुमेह असलेल्या रुग्णांच्या पायांवर जखमा, फोड, संसर्ग किंवा पाय काळा पडणे (गँग्रीन) अशी लक्षणे दिसून येतात. वेळेवर उपचार न झाल्यास ही समस्या गंभीर स्वरूप धारण करून पाय कापण्याची वेळ देखील येऊ शकते. मात्र योग्य वेळी काळजी आणि उपचार घेतल्यास ही समस्या मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकते, असे मत डॉ. सेहर हमदुल्ले (एम.एस. सर्जरी) यांनी व्यक्त केले.

डॉ. हमदुल्ले यांनी सांगितले की, मधुमेहामध्ये अनेक वर्षे रक्तातील साखर नियंत्रणात नसल्यामुळे पायांतील नसांचे नुकसान होते. याला न्युरोपथी असे म्हणतात. त्यामुळे पायाला वेदना, उष्णता किंवा जखम जाणवत नाही. काटा टोचला, चप्पल घासली किंवा फोड पडला तरी रुग्णाला त्याची जाणीव होत नाही.त्याचबरोबर मधुमेहामुळे पायांमध्ये रक्तपुरवठा कमी होतो. कमी रक्तपुरवठ्यामुळे जखमा लवकर भरून येत नाहीत व संसर्ग होण्याचा धोका वाढतो. परिणामी, सुरुवातीला किरकोळ वाटणारी जखम हळूहळू मोठ्या आणि गंभीर समस्येत रूपांतरित होते.मधुमेह असलेल्या व्यक्तींनी दररोज पाय स्वच्छ धुवून तपासणे, अनवाणी चालणे टाळणे, योग्य पादत्राणे वापरणे आणि रक्तातील साखर नियंत्रणात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. पायावर जखम, फोड, रंग बदल किंवा सूज दिसून आल्यास त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.घरगुती उपाय, दुर्लक्ष किंवा उपचारांना विलंब केल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. योग्य वेळी जागरूकता, नियमित तपासणी आणि वैद्यकीय उपचार घेतल्यास पाय आणि जीवन दोन्ही सुरक्षित ठेवता येऊ शकते, असे डॉ. सेहर हमदुल्ले यांनी स्पष्ट केले.



# तेली प्रीमियर लीगचा समारोप उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

तेली समाज प्रीमियर लीगच्या ४थ्या पर्वाचा समारोप उत्साहात झाला. तेली समाजाच्या क्रिकेट स्पर्धेचे मागील तीन वर्षांपासून यशस्वीरित्या आयोजन करण्यात येते. तेली प्रीमियर लीगचे हे चौथे वर्ष असून या पर्वाचा समारोप मान्यवरांच्या उपस्थित व उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जळगाव शहराचे नवनिर्वाचित उपमहापौर मनोज चौधरी हे होते. त्यांच्या समवेत संचालक विजय चौधरी पुरुषोत्तम चौधरी, संतोष चौधरी, रामचंद्र चौधरी, नंदू चौधरी, डॉ.मनीलाल चौधरी, आरोग्यदूत शिवाजी पाटील, भावेश चौधरी, विनोद चौधरी, भरत चौधरी, कैलास चौधरी, हितेश चौधरी, दीपक चौधरी, नितीन चौधरी, पंकज चौधरी, राहुल चौधरी, तन्मय चौधरी, नितीन चौधरी, चंदन वालझाडे, मयूर चौधरी आदींची उपस्थिती होती.

यावर्षी हॉटेल स्टार पॅलेसचा संघ विजेता तर भारत प्रिंटरचा संघ उपविजेता ठरला. मान्यवरांच्या हस्ते संघांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. या स्पर्धांसाठी प्रायोजकत्व उपमहापौर मनोज चौधरी व प्रदेश तेली महासंघाचे प्रदेशाध्यक्ष विजय चौधरी यांनी स्वीकारले होते.

स्पर्धा यशस्वितेसाठी राहुल चौधरी, जितेंद्र चौधरी, रवींद्र तायडे, सागर चौधरी, मयूर चौधरी, प्रशांत सुरळकर, चेतन चौधरी, मोहित चौधरी, कुणाल चौधरी, नयन चौधरी, भिकन चौधरी, तुनेश चौधरी, आशिष चौधरी, पंकज चौधरी, उमेश चौधरी, प्रदीप चौधरी, दीपक चौधरी, विशाल पाटील, भूषण चौधरी, प्रितेश चौधरी, बंटी चौधरी, भैय्या चौधरी, मनोज चौधरी, पंकज चौधरी, विशाल चौधरी व तेली प्रीमियर लीगच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

# केसीई अभियांत्रिकी, व्यवस्थापन महाविद्यालयाचे एकांकिका स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**

खान्देश कॉलेज ऑफ एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेन्ट स्वायत्त महाविद्यालयाने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत घवघवीत यश मिळविले आहेत.

नागपूर येथे जी. एच. रायसोनी करंडक २०२६ स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते. राज्यभरातील संघानी यात सहभाग घेतला होता. महाअंतिम फेरी नागपूर येथे थाटात पार पडली. या वर्षीच्या पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या महाअंतिम स्पर्धेत केसीई अभियांत्रिकी महाविद्यालयाने 'नो सिग्नल' एकांकिका सादर केली.

या एकांकीचे दिग्दर्शक अमृता करोडपती, निर्मिती प्रा यश चौधरी, लेखन लोकेश मोरे तर समन्वयक प्रा यश चौधरी व प्रा रेवती पाटील यांनी केले. या स्पर्धेत उत्कृष्ट दिग्दर्शन उत्तेजनार्थ अभिनय पुरुष उत्तेजनार्थ, सर्वोत्कृष्ट निर्मिती उत्तेजनार्थ द्वितीय म्हणून पारितोषिक मिळाली.

या यशाबद्दल संघाचे केसीई संस्थचे अध्यक्ष प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, संचालक, सदस्य मंडळ व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय सुगंधी, अकॅडमिक डीन प्रा राहुलकुमार पटेल, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डीन प्रा. गणेश पाटील, पॉलीटेकनिक समन्वयक सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



# औद्योगिक भेटीत विद्यार्थिनींना राजस्थानी पोषाखांनी घातली भुरळ

## डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ९ फेब्रुवारी**




डॉ. वर्षा पाटील वुमन्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर एप्लीकेशन महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थिनींसाठी राजस्थान येथे शैक्षणिक व औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.येथील पोशाखांनी विद्यार्थीनींना भुरळ घातली.

या दौऱ्यातर्गत राजस्थानी कॉटेज इंडस्ट्रीज, राजस्थान खादी उद्योग, जयपूर या ठिकाणी कुर्ता, साडी, पारंपरिक पोशाख, प्रिंटिंग, कलर प्रिंटिंग, डिझाईन कपडा, हँडलूम अशा विविध प्रकारच्या वस्त्रनिर्मितीची प्रक्रिया तसेच मॅन्युफॅक्चरिंग, सप्लाय आणि होलसेल स्तरावर होणारे कामकाज कसे चालते, याची सविस्तर माहिती देण्यात आली. या ठीकाणच्या पोशाखांनी विद्यार्थीनीना भुरळ घातल्याचे दिसून आले. तसेच अरावली पर्वतरांगांतील खाणी परिसरात कार्यरत राजस्थानच्या वैशिष्ट्यपूर्ण गुलाबी दगडावर प्रक्रिया व कटिंगचे काम करणाया दिव्या स्टोन, जोधपूर येथे मार्बल, ब्लॉक्स, टाइल्स, ग्रॅनाईट ब्लॉक्स व स्टोन मॅन्युफॅक्चरिंग,खाणीतून दगड काढण्यापासून ते अंतिम उत्पादनापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची संधी विद्यार्थिनींना मिळाली. दौर्यामुळे विद्यार्थिनींना विविध औद्योगिक प्रकल्प, उत्पादन प्रक्रिया, व्यवस्थापन पद्धती तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळाली.

उद्योगातील तज्ज्ञांशी संवाद साधत विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष कामकाज समजून घेतले. शैक्षणिक अभ्यास प्रत्यक्ष अनुभवाशी जोडणे, हा या औद्योगिक भेटीचा मुख्य उद्देश होता. दौर्यादरम्यान विद्यार्थिनींसोबत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीलिमा वारके, डॉ. प्राजक्ता पाटील, प्रा. चंद्रकांत डोंगरे तसेच इतर शिक्षकवृंद उपस्थित होते. या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थिनींच्या ज्ञानात भर पडून त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन अधिक व्यापक झाला, अशी प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

# केसीई पॉलिटेक्निक संगणक विभागात कार्यशाळा

**जळगाव** : खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेन्ट स्वायत्त महाविद्यालयातील पॉलीटेकनिकमध्ये संगणक विभागाचे वतीने जावा व पायथॉन विषयावर एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचा उद्देश जावा आणि पायथॉनच्या मूलभूत संकल्पना, वाक्यरचना आणि वास्तविक जगाच्या अनुप्रयोगांचा परिचय करून देणे हा होता.दोन्ही भाषांची मूलभूत वाक्यरचना आणि रचना स्पष्ट करणे, जावामध्ये ऑब्जेक्ट-ओरिएंटेड प्रोग्रामिंग संकल्पनांशी विद्यार्थ्यांना परिचित करणे, पायथॉनची साधेपणा आणि वास्तविक जगातील अनुप्रयोगांमध्ये त्याचा वापर परिचय करून देणे, साध्या कोडिंगद्वारे प्रत्यक्ष सराव प्रदान करणे, प्रोग्रामिंगमध्ये पुढील शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे, जावा आणि पायथन प्रोग्रामिंगची मूलभूत तत्त्वे समजून घेणे, कौशल्ये सुधारणे कार्यशाळा द्वितीय वर्षाला डिप्लोमाला असलेले विद्यार्थ्यांकरिता आयोजित होती. कार्यक्रमाचे अतिथी वक्ते म्हणून मनोज कुमावत यांनी या सत्राची सुरुवात केली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. सुगंधी, पॉलिटेक्निक विभागाचे समन्वयक प्रा. बी. जे. लाठी तसेच याच विभागाचे एक्स्पर्ट प्रा. के. पी. अकोले उपस्थित होते. संगणक विभाग प्रमुख प्रा स्नेहल पवार, प्राध्यापक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा युक्ता उपासनी व प्रा माधुरी रायसिंगे यांनी केले .



## थोडक्यात महत्त्वाचे...



### नूतन मराठा महाविद्यालयात 'मेरा युवा भारत'तर्फे बजेटवर परिचर्चा

**जळगाव** : भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या 'मेरा युवा भारत' उपक्रमांतर्गत नूतन मराठा महाविद्यालय, जळगाव येथे राष्ट्रीय अर्थसंकल्प २०२६ वर युवक-युवतींसाठी चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्राचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एल.पी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा युवा अधिकारी अभिषेक चवरे यांच्या उपस्थितीत पार पडले. परिचर्चेत जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील युवकांनी सहभाग नोंदवून कृषी, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, तंत्रज्ञान व युवक कल्याण क्षेत्रांतील अर्थसंकल्पीय तरतुदींवर आपली मते मांडली. येणाऱ्या काळात युवकांच्या सर्जनशीलता व मानसिक आरोग्यासाठी २००० क्रिएटर्स लॅब व राष्ट्रीय मेंटल हेल्थ इन्स्टिट्यूट स्थापन करण्याच्या तरतुदींना सकारात्मक प्रतिसाद दिला. प्रा. आर. बी. देशमुख यांनी सहकार्य केले. स्वयंसेवक कमलेश सोनवणे व चेतन पाटील यांनी परिश्रम घेतले.




### प्रगती विद्यामंदिरात तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी कॅलिग्राफी रांगोळी अक्षरलेखन उपक्रम

**जळगाव** : प्रगती विद्यामंदिराता तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी कॅलिग्राफी रांगोळी अक्षरलेखन हा उपक्रम उत्साहात घेण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या साहाय्याने सुंदर व रेखीव अक्षरलेखन सादर केले. अक्षर लेखनामध्ये विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव, भारत माझा देश तसेच स्वतःची नावे आकर्षक व कलात्मक पद्धतीने लिहिली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या हस्तकौशल्याला, सर्जनशीलतेला व अक्षरांच्या सौंदर्याची जाणीव होण्यास चालना मिळाली. हा उपक्रम इयत्ता तिसरीच्या वर्गशिक्षिका दिपाली भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेचे चेअरमन प्रेमचंद ओसवाल यांनी विद्यार्थ्यांनी कलात्मक होणे व विद्यार्थ्यांचे सुंदर अक्षर असणे त्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात मोलाचे ठरते असे मत मांडले. अध्यक्षा मंगला दुनाखें यांनी विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यात या उपक्रमचा नक्कीच फायदा होईल असे म्हटले. संस्थेचे सचिव सचिन दुनाखे यांनी विद्यार्थी व शिक्षक यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आनंद व्यक्त केला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते, असे मत शाळेच्या मुख्याध्यपिका संगीता गोहील यांनी मांडले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे उपस्थित होते.



### मध्य प्रदेशात रवाना होणाऱ्या खेळाडूंचा सत्कार

**जळगाव** : डॉ.अण्णासाहेब.जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालयातील खेळाडू नम्रता अस्वार, निकिता बाविस्कर यांची मध्य प्रदेश रेवा येथे होणाऱ्या अखिल भारतीय पातळीवरील आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव फुटबॉल महिला संघात निवड झालेली आहे. सदर स्पर्धा ९ ते १३ रोजी अवाधश प्रतापसिंह प्रताप विद्यापीठ, रेवा येथे होत आहे. यात सहभागी होण्यासाठी विद्यापीठाचा संघ रवाना होत आहे. नम्रता आस्वार व निकिता बाविस्कर यांचा प्राचार्य डॉ आर के नारखेडे तसेच उपप्राचार्य डॉ पी एन तायडे, उपप्राचार्य डॉ सत्यजित साळवे, क्रीडा संचालक डॉ अनिता कोल्हे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.



### दासनवमीला दासबोध पारायणाची सांगता

**जळगाव** : येथील रेल्वेकॉलनीतील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात दासबोध पारायण करण्यात आले. सुरवातीला श्रीराम जयराम जय जयरामचा मंत्रजप करण्यात आला. त्यानंतर मनाचे श्लोक, नंतर दासबोध वाचन करण्यात आले. ह्यावेळी सुरभी महिला मंडळाच्या अध्यक्षा स्वाती कुळकर्णी ह्यांच्या हस्ते गणपतीची व समर्थांची आरती करण्यात आली. शारदा चौधरी, मंगला अमृतकर, शुभदा राव, चारूलता जोशी, नीलमा नाईक, रोहिणी कुळकर्णी, पद्माबाई पाटील, लताताई झवर, वसंतरावं पाटील ह्यांनी दासबोधाचे पारायण केले. दासबोध पारायणाचे हे १३ वे वर्ष आहे. यावेळी सुनीता सातपुते, अश्विनी जोशी उपस्थित होत्या. पारायणाची सांगता ११ रोजी दुपारी १२ वाजता दासनवमीच्या दिवशी शोभायात्रेने होणार आहे.



### मातोश्री वृद्धाश्रमात सुधर्मातर्फे 'जगू या आनंदे'

**जळगाव** : सुधर्मा ज्ञानसभेच्या वतीने नुकताच मातोश्री आनंदाश्रमात '' जगू या आनंदे''या सुंदर सकारात्मक कार्यक्रम पार पडला. सुधर्माच्या कार्याची ओळख जमलेल्या आजी आजोबांना व्यवस्थापक राजेंद्र कुंवर यांनी करून दिली.त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली.सुधर्माचे अध्यक्ष हेमंत बेलसरे यांनी जीवनात आनंद आहेच,मात्र त्याला भोगता आले पाहिजे, अनुभवता आले पाहिजे असे सांगितले. ज्ञानेश्वरीच्या ९ व्या अध्यायातील श्लोक वाचून त्याचा अर्थ विशद केला. आजी आजोबांनी या कार्यक्रमाची प्रशंसा केली. राजेंद्र कुंवर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुनिता बेलसरे, श्रेयस बेलसरे व नितीन तायडे यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### नंदुरबार येथे साडेआठशेवर विद्यार्थ्यांना विश्व मानव रुहानी केंद्रातर्फे साहित्य वाटप

**नंदुरबार** : नवानगर (हरियाणा) विश्व मानव रुहानी केंद्राच्या येथील शाखेतर्फे तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या साडेआठशेपेक्षा अधिक गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तालुक्यातील सुंदर्दे येथील १८५, गुजरजांभोली येथे ११६, नळवा येथे १३५, पातोंडा येथे १२९, राजापूर येथे ९७ व व्याहन येथील जिल्हा परिषद शाळेतील ८६, अशा साडेआठशेपेक्षा अधिक गोरगरीब विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांच्या हस्ते दप्तर, वही, पेन, कंपास आदी साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी विश्व मानव रुहानी केंदाचे सर्व सेवादार उपस्थित होते. गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केल्याबद्दल मुख्याध्यापकांनी विश्व मानव रुहानी केंद्र नवानगर (हरियाणा) व परमसंत बलजितसिंह महाराज यांचे आभार मानले. गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांना शिक्षणासाठी मदत होईल, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे



### नंदुरबारमधील के. आर. पब्लिक स्कूलमध्ये दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**नंदुरबार** : शहरातील श्री स्वामी समर्थ विद्यानिकेतन संचलित के. आर. पब्लिक स्कूलमध्ये दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे चेअरमन किशोरभाई वाणी, व्हाइस चेअरमन सिद्धार्थभाई वाणी, प्राचार्या डॉ. छाया शर्मा, उपप्राचार्य व समन्वयक आणि शिक्षकांची उपस्थिती होती. सर्वप्रथम देवी सरस्वतीमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर नृत्य, खेळ, विनोद, भाषणे झाली. किशोरभाई वाणी यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात यशप्राप्तीसाठीचा कानमंत्र दिला. प्राचार्या डॉ. छाया शर्मा यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी प्रामाणिक, मेहनत, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून अभ्यास करावा व निश्चित ध्येय गाठण्यासाठी मार्गदर्शन केले. किशोरभाई वाणी यांनी शाळेतर्फे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू दिल्या.

### नंदुरबारमधील डॉ. समिधा नटावदकर यांना शिवकन्या महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर

**नंदुरबार** : नाशिक येथील शिवपुत्र छात्रपती संभाजीराजे बहुउद्देशीय



संस्थेतर्फे प्रतिवर्षी शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय, आरोग्य, औद्योगिक क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना शिवकन्या महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यंदाचा राज्यस्तरीय प्रतिष्ठेचा पुरस्कार आरोग्य व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल नंदुरबार येथील रेवा फाउंडेशनच्या अध्यक्षा, सामाजिक कार्यकर्त्या व भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा बालरोगतज्ज्ञ डॉ. समिधा सुहास नटावदकर यांना घोषित झाला असून, फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात नाशिक येथील महाकवी कालिदास नाट्यगृहात पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे, असे संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील यांनी पत्राद्वारे कळवले आहे. डॉ. समिधा नटावदकर या रेवा फाउंडेशनच्या माध्यमातून विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, गरजूंना कपडे तथा जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, जनजागृतीपर व्याख्याने असे अनेक उपक्रम राबवीत असतात.



### तऱ्हाडी केंद्रातील बारावी परीक्षेची बैठक व्यवस्था

**शिरपूर** : तालुक्यातील तऱ्हाडी येथील कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील उच्च माध्यमिक परीक्षेच्या केंद्र क्रमांक ०४७९ केंद्रात बारावीच्या परीक्षेसाठी कला, व विज्ञान शाखेची बैठक व्यवस्थेची तयारी पूर्ण झाली आहे. परीक्षा केंद्रात २३२ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांनी वेळेआधी परीक्षा केंद्रात उपस्थित राहावे, ओळखपत्र व प्रवेशपत्र सोबत ठेवावे, असे आवाहन केंद्र संचालक नितीन पाटील यांनी केले आहे.

### शिंदखेडा केंद्रात बारावी परीक्षेची बैठक व्यवस्था

**शिरपूर** : शिंदखेडा येथील एस. एस. व्ही. पी. एस. महाविद्यालयाच्या उच्च माध्यमिक परीक्षेच्या केंद्र क्रमांक ५०५ केंद्रात बारावीच्या परीक्षेसाठी तयारी करण्यात आली असून, कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांची बैठक व्यवस्थेची घोषणा करण्यात आली आहे. परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांनी वेळेआधी केंद्रात उपस्थित राहावे, ओळखपत्र व प्रवेशपत्र सोबत ठेवावे, असे आवाहन केंद्र संचालक एस. टी. राऊळ यांनी केले आहे.




### उद्योजक विनायक पाटील यांचे मार्गदर्शन

#### बामखेडे महाविद्यालयात ड्रीमिंग बीग कार्यक्रम

**नंदुरबार** : बामखेडे त. त. (ता. शहादा) येथील ग्रामविकास संस्था संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी आयोजित पीएम उषा स्कीमचा भाग म्हणून सॉफ्ट स्किल प्रशिक्षण कार्यशाळेंतर्गत ड्रीमिंग बीग या कार्यक्रमात उद्योजक विनायक पाटील यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

या वेळी विनायक पाटील यांनी फुटपाथवर उपाशीपोटी काढलेले जीवन ते मुंबई, लंडन व दुबई येथील कार्पोरेट जगतात स्वतःची कार्यालये उभारण्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखवला. जीवनात यशस्वी होण्यासाठी निष्ठा, निश्चय आणि अथक परिश्रम यांची कास धरली पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे शैक्षणिक व समाजोपयोगी कार्य पाहून प्रभावित झालेल्या विनायक पाटील यांनी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करावे या हेतूने महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी पाच लाख रुपयांची उदार देणगी दिली. ही देणगी त्यांनी संस्थेच्या अध्यक्षांकडे सुपूर्द केली.

संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष पी. बी. पटेल अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी संस्थेचे सचिव बी. व्ही. चौधरी प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील, रिसन्स प्रा. लि. (पुणे) येथील अरुंधती काटदरे व संगीता कळसकर यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोप प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांनी केला. डॉ. वाय. आर. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# मुकेशभाई पटेल प्राथमिक शाळा स्वच्छ विद्यालय पुरस्कारात प्रथम

## सैनिकी शाळा द्वितीय; धुळे येथे शिक्षक, अधिकाऱ्यांचा गौरव

**शिरपूर** : केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे आयोजित 'स्वच्छ एवं हरित विद्यालय मूल्यांकन २०२५-२६'मध्ये श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ (मुंबई) संचलित तांडे (ता. शिरपूर) येथील मुकेशभाई आर. पटेल इंग्लिश मीडियम प्रायमरी स्कूलने बाजी मारली. जिल्ह्यामध्ये स्वच्छतेच्या सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करत शाळेने ९६.६७ टक्के गुणांसह जिल्ह्यात प्रथम स्थान पटकाविले. तसेच मुकेशभाई पटेल सैनिकी शाळेने द्वितीय स्थान पटकाविले असून, '५-स्टार' मानांकन मिळवणारी जिल्ह्यातील प्रमुख शाळा ठरली आहे.



या देदीप्यमान यशाबद्दल धुळे येथील जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात विशेष गौरव सोहळा झाला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख, शिरपूरचे गटविकास अधिकारी प्रदीप पवार, धुळे डायटचे अधिव्याख्याता जे. एस. पाटील व मान्यवरांच्या हस्ते शिरपूरच्या गटशिक्षणाधिकारी डॉ. नीता सोनवणे, शिक्षणविस्तार अधिकारी अनिल बाविस्कर, शाळेचे शिक्षक शशिकांत जाधव, शरद पवार, सुवर्णा माळी यांना शाल, पुष्पगुच्छ आणि प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

हे यश प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली प्राप्त झाले आहे. यासाठी शशिकांत जाधव, शरद पवार, चैताली बागुल, सुवर्णा माळी या शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. शाळेने जलव्यवस्थापन, स्वच्छता आणि पर्यावरणपूरक उपक्रम (मिशन लाइफ) या विभागात जिल्ह्यात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. शाळेने जिल्ह्यात मिळविलेल्या या प्रथम स्थानासह यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री, आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समितीचे सदस्य राजगोपाल भंडारी, संचालिका गिरिजा मोहन, स्कूल कमिटीचे चेअरमन वाय. पी. बाविस्कर, विजय अग्रवाल यांनी विद्यालयाचे व सन्मानित शिक्षक-अधिकाऱ्यांचा गौरव केला. तांडे येथील शाळेने जिल्ह्यासमोर स्वच्छतेचा एक नवा आदर्श निर्माण केल्याने पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.




## दुबईतील आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषदेत डॉ. सुभाष भामरेंचा गौरवशाली सहभाग

### भारत-सहकार्याच्या नव्या संधींवर केले मार्गदर्शन

**धुळे** : दुबई येथे जीएमबीएफ ग्लोबल आणि सावा हेल्थकेअर लिमिटेड यांच्यातर्फे आयोजित नववी आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषद महाबिझ-२०२६ झाली. परिषदेत माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री आणि माजी खासदार डॉ. सुभाष भामरे प्रमुख पाहुणे होते. आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषदेच्या उद्घाटनासाठी डॉ. सुभाष भामरे यांना निमंत्रित केले, हा मोठा बहुमान धुळ्याच्या भूमिपुत्राला मिळाला.

दुबई येथे ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी या दोन दिवसांच्या परिषदेत ३८ पेक्षा जास्त देशांतील १००० पेक्षा जास्त उद्योजक, गुंतवणूकदार आणि उद्योग नेते सहभागी झाले. 'कॉन्ट्रॅक्ट्ससाठी संपर्क' (Contacts to Contracts) या संकल्पनेवर आधारित या परिषदेत नेटवर्किंग, दोन बैठका आणि आंतरराष्ट्रीय व्यापार संधींवर भर देण्यात आला. डॉ. भामरे यांनी भारताच्या संरक्षण क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधी, संशोधन व विकासातील प्रगती तसेच जागतिक भागीदारीच्या संधींवर विचार मांडले. त्यांनी भारत- व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देणाऱ्या या व्यासपीठाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाला यूएईचे विदेशमंत्री थानी बिन अहमद अल झेयौडी, गुंतवणूक संचालक हुसेन यासलाम, जीएमबीएफ ग्लोबलचे अध्यक्ष ॉ. सुनील व्ही. मांजरेकर आदी उपस्थित होते. महाराष्ट्रातील दुबई येथे राहणारे बहुसंख्य उद्योजक उपस्थित होते. तसेच महाराष्ट्रातील उद्योजक दुबई येथे राहत असलेल्या नागरिकांनी आपुलकीने डॉ. सुभाष भामरे यांच्याशी संवाद साधला.

डॉ. भामरे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विश्वासातील नेते असून, त्यांनी यापूर्वी माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्यासोबत इस्राईल, पॅलेस्टाईन, नार्वे आदी देशांच्या यशस्वी दौऱ्यात सहभाग घेतला होता. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातर्फे डॉ. सुभाष भामरे यांना विविध देशांत शांतता बैठकीस भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान दिला.

# आदिवासी समाजातील प्रश्नांसह युवकांसाठी संधींवर विचारमंथन!

## नंदुरबारमधील पाटील महाविद्यालयात राज्यस्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ९ फेब्रुवारी**

आदिवासी समाजातील सामाजिक व आर्थिक प्रश्न, विविध शैक्षणिक अभ्यासक्रम, उद्योजकतेची बीजे आणि आदिवासी युवकांसाठी संधी, कौशल्ये आणि आव्हाने, जीवनकौशल्य विकास आदी विषयांवर शहरातील जी. टी. पाटील महाविद्यालयात आयोजित आदिवासी समुदाय विकास कार्यशाळेतील चार सत्रांमध्ये विचारमंथन करण्यात आले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) आणि जी. टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (नंदुरबार) यांच्यातर्फे आणि केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (पीएम-उषा)च्या विशेष साहाय्यातून आदिवासी समुदाय विकास कार्यशाळा घेण्यात आली. विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य तथा प्राचार्य प्रा. डॉ. एम. जे. रघुवंशी अध्यक्षस्थानी होते. कार्यशाळेचे उद्घाटक नंदुरबार तालुका विधायक समितीचे समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. रघुवंशी होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ अधिसभा सदस्या प्रा. डॉ. मंदा गावित, माजी उपकुलसचिव जी. एन. पवार, प्रा. डॉ. मोहन पावरा, प्रा. डॉ. खुमानसिंग वळवी उपस्थित होते.

प्राचार्य प्रा. डॉ. एम. जे. रघुवंशी यांनी आदिवासी विद्यार्थ्यांनी न्यूनगंडाची भावना सोडून प्रत्येक क्षेत्रात पुढे येण्यासाठी संघर्ष करावा. मोबाइलचा वापर करून सबंध विश्वाला समजून घेण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन करताना विविध खेळात जिद्द, चिकाटीच्या जोरावर, कौशल्याच्या बळावर यशस्वी होणाऱ्या आदिवासी युवकांचे कौतुक केले.

प्रा. डॉ. एम. एस. रघुवंशी यांनी आदिवासी युवकांनी विविध संधींचा उपयोग करून स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन करताना आदिवासी युवकांनी आपल्या अंगी असलेल्या क्षमतांचा, कौशल्याचा विकास करावा, असे प्रतिपादन केले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. जी. एस. ठाकरे यांनी कार्यशाळेविषयीची भूमिका मांडली. डॉ. माधव कदम यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दिनेश देवरे यांनी आभार मानले.

दरम्यान, समारोपप्रसंगी कणिका वळवीने मनोगत व्यक्त केले. प्रातिनिधिक स्तरावर काही सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. डॉ. सुभाष ठाकरे, डॉ. सुलतान पवार, डॉ. विजय चौधरी, डॉ. वसीम मक्राणी, प्रा. श्याम पवार, प्रा. सचिन आढावे, प्रा. प्रमेश वसावे, प्रा. राहुल पाटील, प्रा. महेंद्र गावित, प्रा. प्रल्हाद वसावे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

**विविध विषयांवर विचारमंथन**

दरम्यान कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रा. डॉ. मंदा गावित यांनी आदिवासी समाजातील सामाजिक व आर्थिक प्रश्न या विषयावर मांडणी करताना आदिवासी युवकांनी पुढाकार घेऊन समाजातील अंधश्रद्धा नाहीशा करण्यासाठी प्रयत्न करताना निसर्गाशी संबंधित असलेल्या लोकपरंपरा व लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन करावे, असे आवाहन केले. दुसऱ्या सत्रात माजी उपकुलसचिव जी. एन. पवार यांनी 'शिक्षणातून परिवर्तन' या विषयावर मांडणी करताना विविध शैक्षणिक अभ्यासक्रमातून आदिवासी युवक आणि आदिवासी समाज यांचा विकास साधता येईल, असे प्रतिपादन केले. तिसऱ्या सत्रात प्रा. डॉ. मोहन पावरा यांनी 'उद्योजकतेची बीजे : आदिवासी युवकांसाठी संधी, कौशल्ये आणि आव्हाने' या विषयावर मांडणी करताना जीवनातील संघर्षात्मक अनुभव सादर करीत विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधींचे सोने करण्याचे आवाहन केले. चौथ्या सत्रात प्रा. डॉ. खुमानसिंग वळवी यांनी आदिवासी विद्यार्थ्यांचे जीवनकौशल्य विकास या विषयावर मांडणी करताना आधुनिक जगात स्वतःला सक्षम करण्यासाठी आदिवासी युवकांनी भाषिक कौशल्ये आणि संवादकौशल्यांचा विकास साधला पाहिजे, असे आवाहन केले आहे.

**क्रीडा वृत्त**

# जिल्हा हॉकी प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंना सरावासाठी मोफत साहित्य

## नंदुरबारला क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ९ फेब्रुवारी**

शहरासह जिल्ह्यातील खेळाडूंना गौरव दर्जेदार क्रीडा सुविधा या बाबी केंद्रबिंदू मानून क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंना सरावासाठी मोफत हॉकी साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा प्रशिक्षण केंद्रातील हॉकीच्या राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कारही करण्यात आला.



राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे, हे जाणून क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्य क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य राहावे, नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी, तसेच राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामे कामगिरी करण्यासाठी क्रीडाविषयक तंत्रशुद्ध प्रशिक्षण, खेळाच्या दर्जात सुधारणा, खेळाडूंना गौरव दर्जेदार क्रीडा सुविधा या बाबी केंद्रबिंदू मानून खेळाडूंसाठी हितावह योजना राबविण्यात येत आहेत. त्यानुसार क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंना सरावासाठी मोफत हॉकी साहित्य वाटप करण्यात आले.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रातर्फे जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांच्या उपस्थितीत नियमित सराव करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना हॉकी स्टिक, ट्रॅक सूट (किड्स) हॉकी बॉल, गोलकिपर किट, तसेच स्पोर्ट शूज, असे क्रीडा साहित्य वितरित करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील विविध शाळांनी आपल्या खेळाडूंना जिल्हा क्रीडा हॉकी प्रशिक्षण केंद्रात सहभागी करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले. जिल्हा क्रीडा हॉकी प्रशिक्षण केंद्र हे जिल्हा क्रीडा संकुल व शासकीय इंग्रजी माध्यमिक शाळा या दोन्ही ठिकाणी सुरू असून, राज्य क्रीडा मार्गदर्शक भगवान पवार यांच्यामार्फत प्रशिक्षण दिले जाते, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

साहित्य वाटपप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांनी राज्यस्तरावर पदकप्राप्त १४ वर्षांआतील मुलींच्या संघाचा गौरव केला, तसेच राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या मुला-मुलींच्या संघातील दहा राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. प्रशिक्षण केंद्रातील ५४ खेळाडूंनी राज्यस्तरावर सहभाग नोंदविला. १४ वर्षांआतील मुलींच्या संघाने राज्यस्तरावर कांस्यपदक प्राप्त केले. प्रशिक्षण केंद्रातील १७ वर्षांआतील मुले-मुली तसेच चौदा वर्षांआतील मुलींचा संघ, असे तीन संघ राज्यस्तरावर सहभागी झाले. यातून चार खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. तसेच खेलो इंडिया ट्रायबल गेम्समध्ये राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नेतृत्व करण्यासाठी सहा मुलींची निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी तालुका क्रीडा अधिकारी महेश पाटील, क्रीडा अधिकारी ओमकार जाधव, संजय बेलोरकर, राज्य क्रीडा मार्गदर्शक भगवान पवार, क्रीडा कार्यालयाचे मुकेश बारी, कल्पेश बोरसे, दिगंबर चौधरी आदी उपस्थित होते.

# बोराडीत तपनभाई पटेल क्रिकेट स्पर्धेत पळासनेरचा ग्रामीण स्टार संघ विजेता

## खेळाडूंचा जोश, प्रेक्षकांचा जल्लोष अन् क्रीडाभावनेचा संगम

**शिरपूर** : तालुक्यातील बोराडी येथे (स्व.) तपनभाई पटेल प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धा प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात झाली. स्पर्धेत खेळाडूंचा जोश, प्रेक्षकांचा जल्लोष आणि क्रीडाभावनेचा संगम पाहायला मिळाला. स्पर्धेत पळासनेर येथील ग्रामीण स्टार संघाने विजेतेपद पटकावले.



स्पर्धेत सातपुडा ग्रामीण परिसरातील ७० संघांनी सहभाग नोंदविला. बक्षीस वितरण सोहळा शिरपूरचे लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्यासह बोराडीचे उपसरपंच राहुल रंधे, पंचक्रोशीतील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी कर्मवीर फायटर (बोराडी) व ग्रामीण स्टार्स (पळासनेर) यांच्यातील रंगलेल्या अंतिम सामन्याचा आनंद घेतला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी आमदार काशिराम पावरा, धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, सांगवीचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, बोराडीचे उपसरपंच राहुल रंधे, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव प्रीतेश पटेल, पालिका बांधकाम सभापती वासुदेव देवरे आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे प्रथम पारितोषिक ५१ हजार रोख व करंडक पळासनेर येथील विजेता ग्रामीण स्टार संघाने पटकावले. चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते या पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. द्वितीय पारितोषिक ३१ हजार रुपये व प्रमाणपत्र उपविजेता कर्मवीर फायटर्स (बोराडी) संघाने प्राप्त केले. बोराडीचे उपसरपंच राहुल रंधे यांच्या हस्ते या संघाला हे पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेत मालिकावीरचे २१०० रुपयांचे रोख बक्षीस व करंडक भुराभाऊ लोहार (पळासनेर) याने प्राप्त केले. उत्कृष्ट फलंदाज पंकज पावरा, उत्कृष्ट गोलंदाज अनिल पवार, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक राहुल पावरा यांना ११०० रुपये रोख व करंडक देऊन गौरविण्यात आले. जे. पी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मनजित पवार यांनी आभार मानले.

अंतिम सामन्यात प्रवेश झालेल्या पळसनेर व बोराडी येथील दोन्ही संघांना आयोजकांकडून टी-शर्टचे वाटप करण्यात आले. स्पर्धेसाठी शिरपूर तालुका क्रिकेट असोसिएशन व (स्व.) तपनभाई पटेल युवा मंच (बोराडी) यांचे सहकार्य लाभले. त्यांच्यामार्फत पंचव्यवस्था, मैदान सज्ज करणे, खेळाडूंसाठी सुविधा, वैद्यकीय सेवा व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती तयारी करण्यात आली होती.

# धुळे जिल्ह्यातील ८८ शाळांमध्ये मुलींना आत्मरक्षण प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**शिरपूर, ९ फेब्रुवारी**

मुलींच्या सशक्तीकरणासाठी मंत्री दादा भुसे यांनी ऐतिहासिक उपक्रम सुरू केला आहे. या योजनेंतर्गत धुळे जिल्ह्यातील ८८ शाळांमधील मुलींना आत्मरक्षण प्रशिक्षण देण्यात आले. राज्यात २०२५-२०२६ मध्ये इतिहास घडविणाऱ्या या क्रांतिकारी पावलात, महाराष्ट्र शिक्षण परिषद मंडळातर्फे राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रभरातील सुमारे १५ लाख मुलींना प्रशिक्षण देऊन विश्वविक्रम प्रस्थापित केला जाणार आहे. मंत्री दादा भुसे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली राबविल्या जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे राज्यभरातील मुलींच्या सशक्तीकरण आणि सुरक्षेत महत्त्वपूर्ण वाटचाल होणार आहे.



या उपक्रमाबद्दल मंत्री भुसे म्हणाले, ''आमच्या मुलींचे सशक्तीकरण आणि सुरक्षा हे आमचे प्राधान्य आहे. या उपक्रमातून महाराष्ट्र देशासमोर आदर्श ठेवणार आहे.'' हा कार्यक्रम राज्यात राबविलेला आत्मरक्षण प्रशिक्षणाचा सर्वात मोठा उपक्रम असून, युवतींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करतो.

# राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत नंदुरबार संघ द्वितीय

## शिक्षक-अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज

**नंदुरबार** : राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागांतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेतर्फे (पुणे) आयोजित पहिल्या शिक्षक अधिकारी व कर्मचारी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत खो-खो प्रकारात नाशिक विभागातील नंदुरबार संघाने द्वितीय स्थान मिळवीत उपविजेतेपदाचा मान मिळवला. संघाने प्रत्येक सामन्यात प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज देत संघाने आपली गुणवत्ता सिद्ध केली.

राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत खो-खोमध्ये कोल्हापूर विभागातील सातारा संघ आणि नाशिक विभागातील नंदुरबार संघ यांच्यात अंतिम सामना चुरशीचा व रंगतदार झाला. अंतिम लढतीत सातारा संघाने उत्कृष्ट सांघिक खेळ, चपळता व तांत्रिक कौशल्याच्या जोरावर विजेतेपद, तर नाशिक विभागातील नंदुरबार संघाने द्वितीय स्थान मिळवीत उपविजेतेपदाचा मान मिळवला. नंदुरबार संघाने संपूर्ण स्पर्धे दरम्यान शिस्तबद्ध खेळ संघभावना आणि जिद्दीचे प्रभावी प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. प्रत्येक सामन्यात प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज देत संघाने आपली गुणवत्ता सिद्ध केली. अंतिम सामन्यात पराभव पत्करावा लागला असला, तरी नंदुरबार संघाची कामगिरी सर्वत्र कौतुकास्पद राहिली.




खो-खो संघात डी. आर. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक प्रा. नितीन कबाडे यांनी सातारा अंतिम सामन्यात एक मिनिट ३० सेकंद पळून व दोन गडी बाद करून संघाला उपविजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली. उपउपांत्य सामन्यादरम्यान संघाबरोबर उत्कृष्ट खेळ दाखवला आणि मुंबई व संभाजीनगरविरुद्धच्या सामन्यामध्येही उत्कृष्ट खेळ करत संघाला अंतिम सामन्यापर्यंत पोहोचवण्यात यश मिळवले. या उल्लेखनीय यशाबद्दल प्रा. नितीन कबाडे यांचा नंदुरबार एज्युकेशन सोसायटी संस्थेचे अध्यक्ष राहुल पाठक, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र पाटील, चेअरमन नरेंद्र सराफ, सचिव प्रशांत पाठक, कार्यकारिणी सदस्य अ. बा. टेंभेकर, पंकज पाठक, श्रीराम मोडक, प्राचार्य मोहन अहिरराव, उपप्राचार्य दीपक सोनवणे आदींनी गौरव केला.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : १०/०२/२०२६ **वार** : मंगळवार **शके** : १९४७
**अयन** : उत्तर **ऋतू** : शिशिर **मास** : माघ **पक्ष** : कृष्ण **महिना** : जानेवारी
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-२६ **तिथी** : अष्टमी **नक्षत्र** : विशाखा
**योग** : ध्रुव **करण** : कौलव **सूर्योदय** : ७-११ **सूर्यास्त** : १८-३५
**चंद्रराशी प्रवेश** : वृश्चिक **शुभाशुभ** : शुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल.
**वृषभ** : घरात वाद निर्माण होण्याची संभावना.
**मिथून** : लहान मोठी जखम होण्याची संभावना.
**कर्क** : संततीकडे लक्ष द्यावे लागेल.
**सिंह** : मातृस जखम होण्याची संभावना.
**कन्या** : मेहनतीची कामे करून लाभ शुन्य.
**तुला** : पैश्यांचे व्यवहार जपून करावे.
**वृश्चिक** : जो मनात विचार येईल. तो सफल होईल.
**धनू** : आजचा दिवस नको असा राहील.
**मकर** : भाग्य काय असते ते आज कळेल.
**कुंभ** : वडिलांशिवाय संकट निवारण होणार नाही.
**मीन** : देव धर्माबद्दल अधिक विचार कराल.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे.....

### इंग्रजी विषयाच्या परीक्षेसाठी बैठक व्यवस्थेत बदल

**भुसावळ** : महात्मा गांधी विद्यालय, वरणगाव (केंद्र क्रमांक ७५५) येथे १० फेब्रुवारी मंगळवार रोजी होणाऱ्या इयत्ता बारावी इंग्रजी विषयाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे. विज्ञान शाखेतील एस.ओ. ७७१८० ते एस.ओ. ७७६७६ तसेच कला शाखेतील एस.ओ. १३८९६८ ते एस.ओ. १३९०९९ या सर्व विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था महात्मा गांधी विद्यालय, वरणगाव येथे करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित कला शाखेतील एस.ओ. १३९१०० ते एस.ओ. १३९२५५, वाणिज्य शाखेतील एस. १६७४९१ ते एस. १६७५७३ आणि किमान कौशल्य विभागातील एस. १७२२५६ ते एस. १७२२८२ या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था गंगाधर सांडू चौधरी विद्यालय येथे करण्यात आलेली आहे. ही बैठक व्यवस्था फक्त इंग्रजी विषयाच्या परीक्षेसाठी असून, उर्वरित सर्व विषयांचे पेपर महात्मा गांधी विद्यालय, वरणगाव येथेच होणार आहेत. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे केंद्र संचालक सी. जे. तायडे आणि उपप्राचार्य पी. एस. पाटील यांनी कळविले आहे.



### फैजपूर येथे गजानन विजय पारायण उत्साहात

**फैजपूर** : जय गजानन गृपतर्फे श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रकट दिनानिमित्त फैजपूर येथील शिवाजी नगरात ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते दुपारी २ वाजे पर्यंत श्रीगजानन विजय ग्रंथाचे सामूहिक महापारायण आयोजित करण्यात आलेले होते. या पारायणाचे मुखोद्गत वक्ते कराड येथील संजीवनी मराठे आणि जयंतराव मराठे हे दांपत्य होते. या पारायणासाठी महाराष्ट्र मध्य प्रदेश गुजराथ, कर्नाटक येथील भाविक उपस्थित होते. यावेळी ७८० भाविक पारायणासाठी बसलेले होते. या पारायला ओंकारेश्वर येथील पूज्य शंकरानंद सरस्वती यांनी सदिच्छा भेट दिली.त्यांनी राष्ट्रनिर्मिती, मानसिक शांती साठी तसेच अध्यात्मिक उन्नती साठीअसे सामूहिक उपक्रम होणे गरजेचे आहे असे सांगितले. मागील ७ वर्षांपासून सामूहिक पारायणाचे आयोजन माऊली दीपक होले सर, योगराज नारखेडे ,गिरीश नेमाडे, दिनकर नारखेडे, संजय नारखेडे हे करीत आहेत कार्यक्रमानंतर लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजे पत्रकार यांचा जय गजानन ग्रुपतर्फे ओळख परिचय व जयवंत मराठे यांचे शुभहस्ते आशीर्वाद रुपी भक्तीची शाल देवून सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार संजय सराफ, अरुण होल, उमाकांत पाटील, मालक शाकिर, राजू तडवी, सलीम पिंजारी उपस्थित होते.



### रांगोळी कलाकार राजेंद्र साळी सन्मानित

**फैजपूर** : येथे कृषिधन -२०२६ आयोजित कृषी प्रदर्शन व केळी महोत्सव टाकाऊ पासून टिकाऊ वस्तुपासून नैसर्गिक भव्य रांगोळी काढून राजेंद्र साळी यांनी काढून सर्वांचे लक्ष वेधले. याप्रसंगी माजी आमदार शिरीष चौधरी, जैन इरिगेशन तज्ञ मार्गदर्शक डॉ. के.बी. पाटील, धनंजय चौधरी व इतर मान्यवरांच्या हस्ते राजेंद्र साळी यांना सन्मानित करण्यात आले.

### सी. जी. निकम यांना धम्मभूषण पुरस्कार

**भुसावळ** : तालुक्यातील महाबोधी बहुउद्देशीय वरणगाव, आयुध निर्माणी येथील सी.जी.निकम यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळ, समाजप्रबोधन आणि गीतांमधून जनमानसापर्यंत पोहचविलेल्या कार्याबद्दल सार्वजनिक बुद्धविहारात त्यांच्या सहपाठींकडून धम्मभूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी श्रावण जगताप, संदीप साळवे, आशिष वारके, सुमेध आचारे, विशाल तायडे, संतोष वानखेडे, पी.जी. सोनवणे, जे.डी. तायडे, अंजु भालेराव, पुष्पा तायडे, सुनंदा इंगळे, संजू भालेराव आणि अजाबराव मोरे. विविध सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवार उपस्थित होते.



### साई समर्थ कॉलनीत गजानन माऊलींचा प्रकट दिन उत्साहात

**नशिराबाद** : साई समर्थ कॉलनी येथे गजानन महाराजांचा प्रकट दिन मोठ्या भक्तिभाव उत्साहात पार पडला. साई समर्थ कॉलनीमधील गजानन महाराजांच्या मंदिरात गावातील तसेच पंचक्रोशीतील शेकडो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. 'जय गजानन माऊली, गण गण गणात बोते' या गजराने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांसह सायंकाळी माऊलींची महाआरतीनंतर महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष योगेश पाटील, उपनगराध्यक्ष पंकज महाजन, नगरसेवक, नगरसेविका यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी मंदिर समिती व भाविकांना प्रकट दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी साई समर्थ कॉलनी गजानन महाराज मंदिर मित्र मंडळातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. मंदिर मित्र मंडळातर्फे भाविकांचे व सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले.

## सावदा येथे विशेष सभेत नगराध्यक्षच अनुपस्थित

### पीठासीन अधिकारी म्हणून रंजना भारंबे यांनी बघितले काम; अजितदादांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**सावदा, ९ फेब्रुवारी**

सावदा पालिकेची वाचनालय समिती, वृक्ष संवर्धन समिती, शाळा समन्वयक समिती आदी विषयांवरील विशेष सभा ९ फेब्रुवारी रोजी पालिका सभागृहात आयोजित करण्यात आली. या सभेत नगराध्यक्षा रेणुका पाटील व उपनगराध्यक्ष फिरोजखान पठाण हे दोन्ही प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणाने उपस्थित राहू न शकल्याने ऐनवेळी सभा बरखास्तीची वेळ आली होती. तथापि, राष्ट्रवादी गटनेते राजेश वानखेडे व नगरसेवक शाम अकोले यांचे संयमी व अनुभवी भूमिकेतून भाजप गटनेत्यांना सर्वानुमते या सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून अनुमती मिळाली.

सभेच्या सुरवातीसच अध्यक्ष व उपाध्यक्ष हे उपस्थित नसल्याने सभा स्थगित करण्याचा विषय समोर आल्यावर राष्ट्रवादी गटाचे गट नेते राजेश वानखेडे यांनी ही सभा असे असते तर अगोदरच स्थगित करावयास हवी होती आता सभागृहात सदस्य उपस्थित झाल्यावर असे करणे योग्य नाही असे सांगत एक जुन १९९४ सालाचा दाखला समोर ठेवला. त्यावेळी अध्यक्ष व उपाध्यक्ष सभेस गैहजर होते त्यावेळी हाजी अय्युब खान यांना





त्यावेळी पीठासीन अधिकारी बनविण्यात येऊन सभा चालवली असल्याचा दाखला दिला. त्याच प्रमाणे आज देखील आपण हे करू शकतो असे सुचविले.

नंतर नगरसेवक शाम अकोले यांनी देखील चर्चेत भाग घेत हाच विषय पुढे नेला व या नंतर राजेश वानखेडे, शाम अकोले यांचे सूचनेनुसार सर्व समितीने भाजपा गट नेत्या रंजना भारंबे यांना पीठासीन अधिकारी म्हणून संमती मिळाल्यावर नगरसेवक शाम अकोले यांनी त्यांना अध्यक्षीय आसना पर्यन्त नेऊन विराजमान केले.

यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली तर राष्ट्रवादी गटातर्फे सर्व नगरसेवक यांनी पीठासीन अधिकारी रंजना भारंबे यांना एक निवेदन सादर करून सदर सभागृहात स्व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे तैलचित्र लावण्याची मागणी केली.

स्व अजितदादा यांना श्रद्धांजली म्हणून सभेचे कोणतेही विषय पटलावर न घेता ते पुढील सभेत घेण्यात येतील असे पीठासीन अधिकारी रंजना भारंबे यांनी सांगत सदर सभा वंदे मातरम नंतर बरखास्त केली. सभेस भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी गटाचे नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते

## संत मुक्ताबाई फिरता नारळी सप्ताह महोत्सवात होणार तरुणाईसाठी ज्ञानेश्वरी चिंतन!

### महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, ९ फेब्रुवारी**

यावर्षीचा आदिशक्ती मुक्ताबाई फिरता नारळी सप्ताहाचे यजमान पद सकल हिंदू समाज यावल व रावेर तालुका यांनी घेतले असून या महोत्सवात तरुणाई साठी ज्ञानेश्वरी चिंतन होणार असल्याचे माहिती म हामंडलेश्वर जनार्दन हरिजि महाराज यांनी दिली.

यामहोत्सव नियोजन संदर्भात बैठक जनार्दन हरीजी महाराज यांचे अध्यक्षतेखाली कुंभारखेडा येथे पार पडली. प्रास्तविक डिंगम्बर महाराज मठाचे अध्यक्ष नरेंद्र नारखेडे यांनी केले कार्यक्रमाचे नियोजन व आवश्यक समित्यांच्या संदर्भात माहिती दिली. फिरता नारळी सप्ताह १७ ते २४ मार्च दरम्यान सातपुडा पर्वताचे पायथ्याशी असलेल्या कुंभारखेडा गावात होणार असून दररोज ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी व रात्री महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार यांची कीर्तने, दररोज दुपारी ३ ते ५ तरुणाई साठी ज्ञानेश्वरी चिंतन, गुरुवर्य चैतन्य महाराज देगलूरकर व ॲड. जयवंत बोधले हे तरुणांना विशेष मार्गदर्शन करणार आहेत. या महोत्सवात महंत रामगिरी महाराज अधिपती सद्गुरु गंगागिरी महाराज सरला बेट यांची विशेष उपस्थिती



राहणार आहे. महोत्सवामुळे दोन्ही तालुक्यात चैतन्य निर्माण झाले आहे. हा कार्यक्रम भव्यदिव्य स्वरूपात पार पाडण्याचा कार्यकर्त्यांनी संकल्प केला असून सुमारे १५० कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उस्फुर्त सहकार्य करण्याचे आवाहन महामंडलेश्वर जनार्दन महाराज, रवींद्र महाराज हरणे, ॲड. रवींद्र पाटील, मुक्ताई संस्थान अध्यक्ष व नरेंद्र नारखेडे, उद्धव महाराज जुनारे, भरत महाराज, दुर्गादास महाराज नेहते, धनराज महाराज, ऋषिकेश महाराज, मुकेश पाटील, उमाकांत मावळे, कुंभारखेडा ग्रामस्थ, सकल हिंदू समाज व रावेर यावल तालुका भाविक भक्तांनी केले आहे. सभेस कुंभारखेडा सह पंवचक्रोशीतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धनाजी नाना कनिष्ठ महाविद्यालयात बारावी परीक्षेची बैठक व्यवस्था

**फैजपूर** : शहरात १० फेब्रुवारीपासून सुरू होत असलेल्या एचएचसी बारावीच्या परीक्षेची बैठक व्यवस्था धनाजी नाना कनिष्ठ महाविद्यालय फैजपूर येथे जाहीर करण्यात आली आहे. शाळेत सुध्दा बैठक व्यवस्था सूचना फलकावर लावण्यात आलेली आहे.

यात धनाजी नाना कनिष्ठ महाविद्यालय केंद्र ०८१५ येथे एकूण विद्यार्थी ५६१ असून यात विज्ञान शाखा एस ०८३३४७ ते एस ०८३७२८, कला शाखा एस १४२९२१ ते एस १४३०२१, वाणिज्य शाखा एस १६८५४६ ते एस १६८६२४ असे विद्यार्थी बैठक क्रमांक आहेत. कॉपी मुक्त अभियान राबवण्यासाठी केंद्रावर सर्व वर्गांमध्ये तसेच महाविद्यालय परिसरात कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्याच्या आधी सकाळी १०.१५ वाजात केंद्रावर उपस्थित राहावे, विद्यार्थ्यांनी विषयनिहाय बैठक व्यवस्था ९ फेब्रुवारी या दिवशी दुपारी २ वा. विद्यालयाच्या प्रांगणात लावण्यात येणार आहे, असे केंद्र संचालक प्रा. हरीश नेमाडे यांनी कळवले आहे.

## मुक्ताईनगरच्या चार विद्यार्थ्यांची बालवैज्ञानिक पुरस्कारासाठी निवड

**मुक्ताईनगर** : डॉ. होमी भाभा फाउंडेशन (मुंबई), भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो), श्रीहरीकोटा तसेच मुक्ताईनगर येथील मंगेश निळे यांच्या श्री समर्थ सायन्स क्लासेस निळे कोचिंग अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय बालवैज्ञानिक स्पर्धेत मुक्ताईनगर येथील चार विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातून तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या शौर्य वराडे तसेच भुसावळ विभागात इयत्ता आठवीतील समर्थ वंजारी, मुलींच्या गटातून जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त प्रांजल महाजन व द्वितीय क्रमांक प्राप्त कृष्णाली पालवे या चार विद्यार्थ्यांची बाल वैज्ञानिक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. यात शौर्य वराडे याची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो), श्रीहरीकोटा येथे शैक्षणिक भेट देण्यासाठी निवड झाली. या यशामागे डॉ. होमी भाभा फाउंडेशन, इस्रो श्रीहरीकोटा तसेच मंगेश निळे यांचे मार्गदर्शन मिळाले असून, या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे, पालकांचे व मंगेश निळे यांचे अभिनंदन होत आहे.



### चुंचाळे येथे भगवान महाराजांच्या पादुका दिंडीचे स्वागत

**यावल** : जामनेर तालुक्यातील महर्षी वाल्मीक आश्रम, चिंचखेडा येथून भगवान महाराज व रावसाहेब महाराज यांच्या पादुका दिंडीचे चुंचाळे येथील श्री समर्थ वासुदेव बाबा दरबारात स्वागत करण्यात आले. यावेळी मंदिराच्या पटांगणात दिडीतील भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. भजन, आरतीनंतर पायी दिंडीचे प्रस्थान भालशिव प्रिंप्री येथे झाले. गेल्या अनेक वर्षापासून दिंडी सोहळा होत असल्याची माहिती दिंडी प्रमुख राष्ट्रीय कीर्तनकार गजानन महाराज धानोरेकर यांनी दिली. या पायी दिंडीत प्रकाश चौधरी, प्रल्हाद पाटील, देवचंद कोळी, चंद्रकांत चौधरी, किरण तेली, संजय चौधरी, नथ्थु धनगर, मयाराम धनगर, पंडित कोळी, वाय. वाय. पाटील, हिरालाल राजपूत, अरुण कोळी, सजय कोळी, समाधान राजपूत आदी ग्रामस्थांसह शेकडो महिला, पुरुष भाविक सहभागी झाले होते.



### नाहाटा महाविद्यालयात विज्ञान मंडळाचे उद्घाटन

**भुसावळ** : येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य म हाविद्यालयात विज्ञान मंडळाचे उद्घाटन उपप्राचार्य प्रा. डॉ. जी. आर. वाणी, प्रमुख वक्ते रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. उमेश फेगडे आदी मान्यवरांच्या हस्ते पार पडले. 'साहित्य आढावा आणि प्रकल्प लेखन' या विषयावर व्याख्यानात संशोधन प्रकल्प किंवा व्यावसायिक अहवालात 'साहित्य पुनरावलोकन' आणि एक उत्तम 'प्रोजेक्ट रिपोर्ट' तयार करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रा. डॉ. उमेश फेगडे यांनी तसेच प्राचार्य प्रा. डॉ. बी. एच. बऱ्हाटे यांनी मार्गदर्शनात सांगीतले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. चंद्रकांत सरोदे यांनी केले. आभार डॉ. प्रा. व्ही एन महिरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ विद्या पाटील, प्रा. डॉ. गौरी पाटील, प्रा. डॉ. एस. डी. येवले, प्रा. डॉ. सचिन कोलते, प्रा. डॉ. नीलिमा पाटील, प्रा. डॉ. पूनम महाजन, प्रा. डॉ. संगीता भिरूड, प्रा. डॉ. अजय क्षिरसागर आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त प्रसाद वाटप

**मुक्ताईनगर** : जेष्ठ नागरिक मंडळ मुक्ताईनगर, संत मुक्ताई महिला मंडळ, श्री संत गजानन महाराज मंदिर समिती आणि रामरोटी आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने प.पु.गुरुवर्य संत रामभाऊ पुजारी बाबा सेवाभावी ट्रस्ट अंतर्गत रामरोटी आश्रमा व्दारा श्रीसंत गजानन महाराज मंदिर मुक्ताईनगर येथे सालाबादप्रमाणे १९ वे वर्षी सुद्धा संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्ताने शहरातील रामरोटी आश्रमा कडुन गजानन महाराज मंदिर येथे ६१ किलो मोतीचूर लाडू व प्रसादाचे वाटप करण्यात आले. श्री क्षेत्र मुक्ताईनगर शहरात अखंड १९ वर्षांपासुन संत महापुरुषांच्या विचार कार्यांवर चालू असलेली मानवसेवा हिच ईश्वरसेवा हि सेवाभावी वृत्ती जोपासत दानदाते, आश्रमाचे आधारस्तंभ डॉ एन जी मराठे (गायत्री हॉस्पिटल), श्रीकांत पाटील, मुक्ताई इलेक्ट्रिकल्स (५१ किलो लाडू), जी के महाजन (बँक), रामदास काठोके (पोस्ट मास्तर), यांच्याकडुन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच आमदार चंद्रकांत पाटिल यांची कन्या प्रियंका पाटील व मुलगा हर्षराज पाटील यांच्या हस्ते महाआरती व पूजन करण्यात आले. यावेळी श्री गजानन महाराज प्रकट दिन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## सोशल मीडियावर महापुरुषास अपशब्द प्रकरणी भुसावळमध्ये नागरिकाची पोलीस ठाण्यात तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ९ फेब्रुवारी**

फेसबुकवर महापुरुषाबद्दल अपशब्दाचा प्रयोग केला. यामुळे धार्मिक आणि जातीय भावनांना ठेच पोहोचली, अशा आशयाची तक्रार नागरिकाने पोलीस ठाण्यात दिली.




भुसावळ येथील नागरिक विनोद अशोक सोनवणे (वय ४८) यांच्या तक्रारीनुसार फेसबुकवर एका व्यक्तीने एका महापुरुषाच्या जातीबद्दल उल्लेख केला. तसेच समाजाच्या लोकांबद्दल अश्लील आणि अपशब्दाचा प्रयोग करत त्याने धार्मिक आणि जातीय भावना दुखावल्या आहेत. तक्रारदार हे हॉटेल व्यवसायातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात आणि एका संघटनेचे जळगाव जिल्हाध्यक्ष असुन ते सामाजिक कार्य करतात. ७ रोजी रात्री १२.२३ वाजता मित्रांसोबत असताना भुषण पाटील नावाच्या व्यक्तीने फेसबुक लाईव्हवर महापुरुषांवर, पोलीस अधिकारी व नागरिकांवर अपशब्द वापरले. याचे स्क्रीन रेकॉर्डिंग त्यांच्या मित्रांनी तयार करून सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करत समाजात व्देष निर्माण करण्याचा प्रयत्न केला,असे तक्रारीत नमुद केले आहे. या कृत्याप्रकरणी संशयितावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

## हुंड्यासाठी विवाहितेला काढले घराबाहेर

### पतीसह सासरच्या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ९ फेब्रुवारी**

हुंडाच्या पैशांसाठी विवाहितेचा सासरी मानसिक व शारीरिक छळ केला. हा त्रास असह्या झाल्याने पीडितेच्या तक्रारीनुसार पतीसह सासरच्या सहा जणांविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

पीडित महिलेचा विवाह ३ मे २०२३ रोजी विशाल सुरेश दाभाडे (रा. बोराडा, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा) यांच्याशी बौद्ध पद्धतीने झाले.

पीडितेच्या तक्रारीनुसार , लग्नप्रसंगी तिच्या वडिलांनी स्त्रीधन म्हणून दोन लाख रुपये रोख व सुमारे एक लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने दिले होते. लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस सासरी चांगली वागणूक मिळाली, त्यानंतर सासू, सासरे, दिर व नणंदांनी घरकाम येत नाही, हुंडा कमी दिला अशा कारणांवरून छळ करण्यास सुरुवात केली. पती विशाल दाभाडे यानेही वारंवार शिवीगाळ व म ारहाण केली.

गर्भवती असतानाही सासरकडून दुर्लक्ष करण्यात आले. बाळंतपणानंतर त्रास वाढत गेला. पतीने शेअर मार्केटसाठी माहेरून दोन लाख रुपये आणण्याची मागणी केली. पैसे आणले नाही म्हणून विवाहितेला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. पाच म हिन्यांपूर्वी पीडितेच्या मुलास ठेऊन पीडितेला घराबाहेर काढुन दिले.

२७ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी पतीसह सासरच्या मंडळींनी भुसावळ येथील माहेरच्या घरी येऊन पुन्हा पैशांची मागणी करत मारहाण केली.या प्रकरणी पती विशाल दाभाडे, सासू उषाबाई दाभाडे, सासरे सुरेश दाभाडे, दिर परमेश्वर दाभाडे तसेच नणंद वर्षा नाईक व दिक्षा नाईक यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बैठकीदरम्यान पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री फडणवीसांच्या प्रतिमा लावा

### भाजपचे गटनेते युवराज लोणारी यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ९ फेब्रुवारी**

नगरपरिषदेच्या वतीने प्रधानमंत्री शहरी आवास योजना अंतर्गत लाभार्थ्यांना घरबांधणीसाठी अनुदान उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने योजनेसाठी नियुक्ती केलेल्या सर्वेक्षण संस्थेच्या अध्यक्षा अंकिता लोखंडे यांनी या बैठक घेतली. दरम्यान, या बैठकीत भुसावळ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा गायत्री भंगाळे यांच्या उपस्थितीत चर्चा करण्यात आली.

मात्र, या बैठकीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि म हाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे फोटो किंवा प्रतिमा लावण्यात आल्या नव्हत्या. असा आरोप भाजपचे गटनेते युवराज लोणारी यांनी केला असून यापुढे घरकुल योजना राबविण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रत्येक बैठकीत किंवा शिबिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी



आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमा अनिवार्यपणे लावण्यात याव्यात, अशी मागणी भुसावळ नगरपरिषदेतील भाजपचे गटनेते युवराज लोणारी यांनी केली आहे.

भुसावळ शहरातील ७/१२ सिटी सर्व्हे तसेच झोपडपट्टीधारक असलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री घरकुल योजनेतून घरबांधणीसाठी दोन लाख पन्नास हजार रुपये अनुदान उपलब्ध करून दिले जाते. ही योजना गरजू कुटुंबांना पक्के घर मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांतून राबवली जात आहे. योजनेच्या प्रचारात आणि बैठकीत राज्यस तसेच केंद्रांतील नेतृत्वाच्या प्रतिमा लावणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. तसेच याची अंम लबजावणी न करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी नगरसेवक युवराज लोणारी यांनी केली आहे

या मागणीचा उल्लेख आज वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्षा शैलजा नारखेडे, उपगटनेते परीक्षित बऱ्हाटे, सभापती अनिता सपकाळे, नगरसेवक राजेंद्र आवटे, शोभा इंगळे, सीमा नरवाडे, माजी नगरसेवक पुरूषोत्तम नारखेडे, सतिश सपकाळे आणि भाजपचे शहराध्यक्ष संदीप सुरवाडे आदी उपस्थित होते.

भाजप नेत्यांनी योजनेतील लाभार्थ्यांना अधिकाधिक मदत मिळावी आणि योजनेचा प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या सूचना आणि मागण्या मांडल्या. ही योजना भुसावळ शहरातील अनेक गरजू कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरत असून, पात्र लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी नगरपरिषदेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### फैजपूरला माता रमाई जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, ९ फेब्रुवारी**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक निर्णयात खंबीर साथ देणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ वी जयंतीनिमित्त शिव कॉलनी येथे विनम्र अभिवादन करण्यात आले

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास नगरसेवक महेंद्र (बंटीभाऊ) मंडवाले व सम ाजातील जेष्ठ तसेच प्रतिष्ठितांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. मिरवणुकीत शहरातील सर्व समाजातील घटकांनी सहभाग नोंदवला. यात बौद्ध उपासक, उपासिका, भिम सैनिक उपस्थित होते. यशस्वीतेसाठी मातोश्री रमाई आंबेडकर जयंती उत्सव समिती, समस्त बौद्ध पंच ट्रस्ट, पारमिता महिला मंडळ, भिमशक्ती युवा संघ पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. माता रमाई यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करून त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि समतेच्या, न्यायाच्या वाटेवर चालण्याचा संकल्प केला.

याप्रसंगी नगरसेवक महेंद्र मंडवाले, माजी नगरसेवक संजय रल, अशोक भालेराव, पप्पू मेढे, विजय तायडे, अभिजित मेढे, गोलू मेढे यासह समाज बांधव सहभागी झाले होते.